

■ महिलांची पाण्यासाठी जीवघेणी भटकंती /- शेवटचे पान

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



■ दिंडोरीत धरणांनी तळ गाठल्याने तीव्र टंचाई ..../- शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१८ ■ नाशिक, बुधवार, दि. ७ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे ▶▶▶▶

### क्वाडमधील देशांचा भारताला पाठिंबा

**नवी दिल्ली :** अमेरिका, जपाननंतर ऑस्ट्रेलियादेखील भारताला सहकार्य करणार असल्याने क्वाडचे हे सर्व सदस्य भारताच्या बाजूला आहेत. त्यामुळे चीन आगामी काळात पाकिस्तानला मदत करताना शंभर वेळा विचार करेल. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बनीज यांच्यात फोनवर चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी आपआपसातील सहकार्य अन्रणनीती भागीदारी याद्वारे पुढे जाण्यासाठी एकत्रित काम करण्यावर सहमती दाखवली. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बनीज यांनी या चर्चेत प्रत्येक पावलावर भारताला साथ देण्यास तयार असल्याचे म्हटले. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बनीज यांच्या राजकीय पक्षाने पुन्हा सत्ता मिळवली आहे. तर, गेल्या २१ वर्षात सलग दुसरा कार्यकाळ मिळवणारे ते पहिले पंतप्रधान बनले आहेत.

### राहुल गांधींच्या वक्तव्यावरून वाद

**मुंबई :** अमेरिकेतील ब्राऊन विद्यापीठात दिलेल्या मुलाखतीदरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भगवान राम यांना पौराणिक व्यक्ती संबोधल्याने वाद निर्माण झाला आहे. विश्व हिंदू परिषदेने या वक्तव्याचा तीव्र निषेध केला आहे. विहिंपचे राष्ट्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी नागपूरमध्ये पत्रकार परिषद घेत राहुल गांधींवर टीकास्त्र सोडले आणि त्यांनी राहुल गांधी यांनी तत्काळ माफी मागावी, अशी मागणी केली. हिंदू समाजाच्या आस्थेच्या मूळाशी संबंधित असलेल्या प्रभू रामचंद्रांना पौराणिक म्हणणे ही अत्यंत लज्जास्पद बाब आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

### कराड, चाटेचा सुटकेसाठी अर्ज

**बीड :** संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड आणि विष्णू चाटेने न्यायालयात सुटकेसाठी अर्ज केला आहे. गेल्या काही दिवसांपासून संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी या प्रकरणातील सर्व आरोपींना वेगवेगळ्या कारागृहांत ठेवण्यात यावे, अशी मागणी केली आहे. हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याची मागणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. बुधवारी (दि. ७) या प्रकरणाची बीडच्या विशेष मकोका न्यायालयात पाचवी सुनावणी होणार आहे. दरम्यान, धनंजय देशमुख व कुटुंबीयांनी याआधीही कारागृहाच्या कार्यपद्धतीवर अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत.

### मुंबई उपनगरात पावसाच्या सरी

**मुंबई :** उकाड्याने हैराण झालेल्या मुंबईकरांना गारव्याचा अनुभव आला असून मुंबई उपनगरात वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी बरसल्या. मुंबईच्या पश्चिम उपनगरात दहा ते पंधरा मिनिटे वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची मात्र धावपळ उडाली. ठाणे, कल्याण, भिवंडीसह राज्यातल्या अनेक भागांत पावसाने हजेरी लावली. ठाणे शहरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे ठाणेकरांची तारांबळ उडाली. भिवंडी शहरासह ग्रामीण भागात वादळी वाऱ्यांसह जोरदार पावसाने हजेरी लावली. पालघर जिल्ह्यातही पावसाने हाहाकार माजवला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या

## सर्वोच्च न्यायालय : चार आठवड्यांत अधिसूचना निघणार

**नवी दिल्ली : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पुढील चार आठवड्यांत अधिसूचना निघाली पाहिजे. राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला सप्टेंबर महिन्यापर्यंत राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे जवळपास पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपंचायत निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**




महाराष्ट्रात पंचायत निवडणुकीतील ओबीसी आरक्षण प्रकरणावर सुनावणी करताना न्या. सूर्यकांत म्हणाले की, देशात आरक्षण हे रेल्वेच्या डब्यासारखे झाले आहे. जे लोक त्यात चढले आहेत, ते दुसऱ्यांना आत येऊ द्यायला तयार नाहीत. न्या. सूर्यकांत म्हणाले की, फक्त काही विशिष्ट वर्गांनाच आरक्षण का मिळावे? सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या इतर लोकांना आरक्षण का मिळू नये? यावर विचार करणे ही राज्यांची जबाबदारी आहे. याचिकाकर्त्यांतर्फे इंदिरा जयसिंह यांनी सुप्रीम कोर्टाकडे महाराष्ट्रात पंचायत निवडणुका घेण्याची मागणी केली. इंदिरा जयसिंह म्हणाल्या की, निवडून आलेल्या स्थानिक संस्था अस्तित्वात नाहीत, त्यांच्या जागी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, या निवडणुका अडवून ठेवण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही, ओबीसी आरक्षणाबाबत २०२२ च्या आधीची परिस्थिती होती, ती परिस्थिती कायम ठेवावी. २०२२ मध्ये अहवाल आला त्यामध्ये ओबीसींच्या जागा कमी करण्यात आल्या. त्यामुळे न्यायालयाने २०२२ पूर्वीची परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

### ओबीसींच्या आरक्षणाला धक्का नाही

ओबीसींच्या जागा कमी न करता या निवडणुका घेण्याचे आदेश सरकारला देण्यात आले आहेत. राजकीय आरक्षणाला धक्का न लागता या निवडणुका आता होणार आहेत. त्यामुळे ओबीसींसाठी हा मोठा दिलासा आहे. बांठिया आयोगाने २०२२ मध्ये कोर्टात अहवाल सादर केला होता. आयोगाचे अध्यक्ष जयंतकुमार बांठिया यांनी मागासवर्गीय आयोगाच्या पूर्वीच्या अहवालातील त्रुटी पूर्ण करुन हा अहवाल तयार केला होता. ज्यामध्ये २७ टक्के आरक्षणाची शिफारस न करता प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांत लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची शिफारस केली. आणि ३४ हजार जागा कमी करण्यात आल्या. याविरोधात याचिकाही करण्यात आल्या. त्यावर कोर्टाने ओबीसींच्या जागा कमी न करता निवडणुका घेण्याचे आदेश दिले.

मात्र, २०२१ साली महाराष्ट्र निवडणूक आयोगाने वाशिम, अकोला, नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये ओबीसी आणि एससी/एसटींना ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देणारे नोटिफिकेशन जारी केले होते. याविरोधात नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण रद्द करत इथल्या ओबीसी उमेदवारांसाठीची निवडणूकही रद्द केली होती. यानंतर २७ टक्के आरक्षणानुसारच जिल्हा परिषदेच्या निवडणुका घ्या, असे आदेशही न्यायालयाने दिले होते. या निर्णयाला ठाकरे सरकारने आव्हान दिले हाते. /-...४

# जिल्ह्याला अवकाळीने झोडपले

**नाशिक : प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने मंगळवारी (दि. ६) जिल्ह्याला झोडपले. ऐन उन्हाळ्यात होत असलेल्या पावसामुळे उष्णतेपासून दिलासा मिळाला असला, तरी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

अवकाळी पावसामुळे कांदा, गहू, टोमॅटो, ऊस, भाजीपाला, द्राक्षबागा, आंबा, सीताफळ, डाळिंब या फळबागांचेदेखील नुकसान झाले आहे. पावसासह वादळ व गारपीट जिल्ह्याच्या काही भागांत झाल्याने पिकांचे मोठे नुकसान होऊन शेतकरी हवालदिल झाले आहेत. नांदगाव, बागलाण, पेठ व निफाड तालुक्यांत काही भागांत वादळी वाऱ्यासह हलक्या व मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला आहे. सुरगाणा तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. सुरगाणा तालुक्यातील चिंचले येथे वादळी वाऱ्याने घरांचे नुकसान झाले आहे. वाघदोंड येथे अंगणवाडी केंद्राचे वादळी वाऱ्यामुळे पडझड झाली आहे. त्याचप्रमाणे तालुक्यातील आंब्याचे व घरांचे नुकसान झाले आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यात वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला आहे. कळवण तालुक्यातील नांदुरी व सप्तशृंगगड येथे वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला आहे. मालेगाव तालुक्यातही वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे.

जिल्ह्यात झालेला अवकाळी पाऊस व वादळामुळे ग्रामीण भागात दिवसभर विजेचा लपंडाव सुरू होता. अनेक ठिकाणी काही तासांसाठी वीजपुरवठा खंडित झाला होता. नाशिक शहरातही सायंकाळनंतर वादळी वाऱ्याचा परिणाम जाणवला. त्यानंतर वातावरणात बदल होऊन गारवा पसरला होता. हलक्या स्वरूपाचा पाऊसही काही भागांत झाला.



### चांदवडच्या दक्षिण पूर्व भागात गारपीट

दिघवद : चांदवड तालुक्यातील दक्षिण पूर्व भागात दुपारी चारपासून जोरदार गारपीट व पाऊस झाल्याने कांदा बियाणांसाठी लावलेले डोंगळ्यांचे नुकसान झाले. बियाण्यांसाठी डोंगळे काढणीस आले होते. तसेच काही भागांत कांदा काढून शेतात उन्हात खराब होऊ नये म्हणून झाडाखाली टाकला होता. पावसाने तो ओला झाला आहे. काही भागात अर्ली द्राक्षबागेचे कोवळे शेंडे मोडले. काही ठिकाणी चारा व जनावरांना मका पावसाने भिजला. काही ठिकाणी भाजीपाला आदींचे नुकसान झाले आहे. कांदा बियाण्यांचे भाव वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरी शासनाने तत्काळ भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मंगळवारी वाहेगावसाळ, काळखोडे, पाटे, कोलटेक, येडगाव खुर्द, पन्हाळे, सोनीसांगवी, विकावे, काझीसांगवी, दिघवद, दहिवद, वडगाव पंगु, साळसने, वाकी, निंबाळे आदी दक्षिण पूर्व भागात गारपीट व जोरदार पाऊस झाला आहे.

जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, बीड, पुणे व सातारा या जिल्ह्यांना मुंबई वेधशाळेने पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार होण्याची शक्यता मुंबई वेधशाळेने व्यक्त केली आहे.

# राज्यात आज युद्धाचे मॉकड्रिल

## सरावादरम्यान सायरन वाजणार, ब्लॅकआउट होणार

**मुंबई :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारत पाकिस्तान यांच्यातला तणाव कमालीचा वाढला आहे. दहशतवाद्यांविरोधात भारत मोठी कारवाई करण्याची शक्यता आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानही कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे लक्षात घेता नागरी क्षेत्रात हल्ले झाल्यास कसे वागावे, काय उपाययोजना कराव्या यासाठी नागरी संरक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. केंद्रीय गृहखात्याने सर्व राज्यांना बुधवारी (दि. ७) मॉकड्रिल घेण्याचे आदेश दिले आहेत.

केंद्र सरकारच्या मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार हाय अलर्ट मोडवर आहे. प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना अलर्ट राहण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारकडून अंतर्गत पातळीवर हालचालींना वेग आला आहे. पालकमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांना प्रशासनासोबत संपर्कात राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. /-...४



**नाशिक : देशात बुधवारी होणाऱ्या मॉकड्रिलसाठी नागरी संरक्षण कक्षात विविध प्रकारचे बॉम्ब, सायरन दाखल झाले होते.**
**(छायाचित्र : रविकांत ताम्हणकर)**

# चीनचा पाकिस्तानला पाठिंबा; रशिया धावला भारताच्या मदतीला

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये वाढलेल्या तणावानंतर भारताचा जुना मित्र असलेला रशिया भारताच्या बाजूने धावून आला आहे. चीनने आपला खरा रंग दाखवत पाकिस्तानला पाठिंबा दिला आहे.

दहशतवादाविरोधातल्या लढ्यात रशिया भारतासोबत असल्याची ग्वाही, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी दिली. व्लादिमीर पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी फोनवरून बातचीत केली आणि पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध केला.

या हल्ल्यातील दोषींना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना शिक्षा मिळायलाच हवी, यावर पुतीन यांनी जोर दिला. दुसरीकडे भारत-पाकिस्तानच्या तणावादरम्यान चीनने स्थिरतेसाठी पाकिस्तानला पाठिंबा देऊ, असे जाहीर केले.



पाकिस्तानचे राष्ट्रपती असिफ अली झरदारी यांनी इस्लामाबादमध्ये चीनच्या राजदूतांची भेट घेतली. त्यावेळी चीनंन ही ग्वाही दिली. तसेच जपानने भारताला पाठिंबा जाहीर केला आहे. तर तुर्कस्तानने पाकिस्तानला /-...४

# भारताला दहशतवादाविरुद्धच्या लढाईत पूर्ण सहकार्य : अमेरिका

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृहाचे अध्यक्ष माइक जॉन्सन यांनी भारताला एक अतिशय महत्त्वाचा भागीदार म्हणत पाठिंबा दिला आहे. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

कॅपिटल हिल काँग्रेसला माहिती देताना माइक जॉन्सन म्हणाले की, भारत आमच्यासाठी महत्त्वाचा भागीदार आहे. दहशतवाद्यांच्या विरोधातील या लढाईत पाठिंबा देण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत. माइक जॉन्सन यांनी दिलेल्या विधानामुळे भारत-अमेरिका राजनैतिक संबंधांना नवीन बळकटी मिळाली आहे. या लढाईत अमेरिकेचा पाठिंबा महत्त्वाचा मानला जात आहे.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने तातडीने प्रतिसाद दिला आणि भारताला पाठिंबा देण्याचा पुनरुच्चार केला. २३ एप्रिल रोजी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी फोनवर संवाद साधला आणि पीडितांप्रती तीव्र संवेदना व्यक्त केल्या. ट्रम्प यांनी एक्सवरील एका पोस्टद्वारे म्हटले आहे की दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत आणि अमेरिका एकत्र उभे आहेत. हा एक भयंकर हल्ला होता आणि त्याच्या गुन्हेगारांना शिक्षा होईल. ट्रम्प प्रशासनाचा हा प्रतिसाद भारताच्या दहशतवादविरोधी धोरणांबद्दलची त्यांची सहानुभूती आणि पाठिंबा /-...४

# त्र्यंबकेश्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी मंजूर

## चौंडीच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाच्या कायद्याला मंजुरी

**अहिल्यानगर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी, चौंडीमध्ये पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळासाठी ६८१ कोटींच्या आराखड्यास मान्यता दिली. तसेच अहिल्यानगरमध्ये वैद्यकीय महाविद्यालय, तर मुलींसाठी विशेष आयटीआय सुरू करण्यात येणार आहे. तसेच त्र्यंबकेश्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटींना मंजुरी देण्यात आली आहे. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाच्या कायद्याला मंजुरीदेखील देण्यात आली आहे.**



अहिल्यादेवी होळकरांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त चौंडीमध्ये मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेण्यात आली. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच ग्रामीण भागात मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. अहिल्यादेवी होळकर याचे जन्मगाव चौंडीचा तीर्थस्थळ म्हणून विकास करणार असल्याचा निर्णय मंत्रिमडळ बैठकीत झाला. यासोबतच तुळजाभवानी मंदिरासाठी १८६५ कोटी, ज्योतिबा मंदिरासाठी २५९ कोटी, महालक्ष्मी मंदिरासाठी १४४५ कोटी, अष्टविनायक मंदिरासाठी १४७ कोटी रुपये, त्र्यंबकेश्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी, विदर्भातील माहूरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी रुपये, असे एकूण ५ हजार ५२० कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली.

दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोबतच मुलींचे स्वतंत्र आयटीआयची देखील घोषणा करणत आली.

राज्यात महिला सक्षमीकरणासाठी सरकार आदिशक्ती अभियान राबवणार आहे. अहिल्यादेवींचे जीवन आणि कार्याचा सन्मान झाला पाहिजे, यासाठी बहुभाषिक चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश द्यायचा यासाठी यशवंत योजना सुरू केली आहे. यातून १० हजार विद्यार्थी शिकवणार आहेत.

सोबतच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजना सुरू करत आहोत, अशी घोषणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या विहिरींसाठी जलसंधारण विभागाने हाती काम घेतले आहे. ज्यामध्ये १९ विहिरी, ६ कुंड, ३४ जलाशयाच्या संवर्धनाचे काम करणार आहोत. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरला मेळावा होतो. त्यात कुंभमेळा प्राधिकरणाच्या कायद्याला मंजुरी दिली आहे. अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दीनिमित्ताने डाक तिकिटासह प्रेरणा गीतदेखील जारी केल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्यावसायिक मराठीसह बहुभाषिक चित्रपटाची शासनामार्फत निर्मिती करणार.

२) राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविणार/आदिशक्ती पुरस्कार प्रदान करणार.

३) धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव. यशवंत विद्यार्थी योजना म्हणून ही योजना आता राबविणार.

४) धनगर समाजातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या ठिकाणी वसतिगृह बांधण्याच्या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना असे नाव.

५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या घाट, विहिरी, पाणीवाटप प्रणालीचे सर्वेक्षण करून त्यांच्या जतनासाठी विशेष योजना राबविणार. ✼ राज्यात असे तीन ऐतिहासिक तलाव (चांदवड, त्र्यंबकेश्वर, मल्हार गौतमेश्वर, जेजुरी). ✼ राज्यात अशा १९ विहिरी. ✼ राज्यात असे एकूण सहा घाट. ✼ राज्यात असे एकूण सहा कुंड. अशा एकूण ३४ जलाशयांची दुरुस्ती, गाळ काढणे, पुनरुज्जीवन, सुशोभीकरण इत्यादी कामे करणार. यासाठी ७५ कोटी रुपये खर्च करणार.

६) अहिल्यानगर जिल्ह्यात १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करणार.

७) राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या मंदिर पुनर्निर्माणाच्या कामाला अभिवादन म्हणून ५५०३.६९ कोटी रुपयांचे मंदिर विकास आराखडे.

८) ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (व्हीएसटीएफ) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या मिशन महाग्राम कार्यक्रमाचा कालावधी २०२२-२५ ऐवजी २०२८ पर्यंत वाढविण्याचा निर्णय.

महत्त्वाचे



## भाजप लासलगाव मंडलाध्यक्षपदी सालकाडे

**विंचूर :** भारतीय जनता पार्टीच्या लासलगाव मंडलच्या अध्यक्षपदी येथील निष्ठावान कार्यकर्ते नीलेश बाजीराव सालकाडे यांची एकमताने निवड करण्यात आली. विंचूर प्लाझामध्ये आयोजित बैठकीत सालकाडे यांची बिनविरोध निवड केली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रभारी रवींद्र आहेर, सुवर्णा जगताप, कैलास सोनवणे, ॲड. वाल्मीक गायकवाड, किरण कुलकर्णी, राजेंद्र राणा, संजय शेवाळे, डॉ. रमेश सालगुडे, नवनाथ जाधव, बापू जाधव, समीर समदडिया, मनोज धनवटे, जालिंदर सानप, शेखर बागूल, अंबादास घोटेकर, विनायक केंद्रे, ज्ञानेश्वर शिरसाट, भाऊसाहेब सोनवणे, बापूसाहेब दरेकर, दशरथ आहेर, धनंजय गांगुर्डे, किशोर जेऊघाले, नीलेश जेऊघाले आदींसह भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळवाटप

**येवला :** भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय संरक्षक महाउपासिका मीराताई यशवंतराव आंबेडकर यांचा ९० वा वाढदिवस भारतीय बौद्ध महासभेतर्फे विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा केला. महासभेचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब जाधव, येवला तालुकाध्यक्ष दीपक गरुड यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळे व मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी डॉ. सोनवणे, रामभाऊ केदारे, प्रवीण खळे, रवींद्र सोनवणे, श्रावण गरुड, सखाहारी गरुड, अरुण घोडेराव, भीमराव वाघ, शशिकांत जगताप, अर्जुन डोखे, विजय गायकवाड, अमोल गायकवाड, अजित पानपाटील, भाऊसाहेब झाल्टे, रवींद्र संसारे, अमोल सोनवणे, बाबूराव पगारे, पंचशीला पानपाटील, सरला वाघ आदी उपस्थित होते.

## नांदगावला परप्रांतीय मजुरांची आत्महत्या

**नांदगाव :** नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती आवारामध्ये परप्रांतीय मजुराने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी ( दि. ५ ) घडली. मध्य प्रदेश येथील दिलीप भीमसिंग चव्हाण (३३) नांदगाव बाजार समितीमध्ये कांदा भरण्याचे काम करत उदरनिर्वाह करत होता. आवारातील कांदा शेडमध्ये या मजुराचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती बाजार समितीच्या वतीने नांदगाव पोलिसांना कळविण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी हजर होत घटनेचा पंचनामा करत शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविला. बाजार समितीचा कांदा, धान्य लिलाव सोमवारी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. पोलीस हवालदार राजू मोरे तपास करीत आहेत.

## राजबारीनजीक अपघातात पतीचा मृत्यू

**पेठ :** पेठ - सुतारपाडा रस्त्यावर कापराडा येथे नातेवाइकाच्या लग्नासाठी जाणाऱ्या दुचाकीस्वार पती-पत्नीचा अपघात होऊन पती ठार, तर पत्नी गंभीर जखमी झाली. गायखास (ता. अहवा, जि. डांग) येथील पुन्याभाई लासूभाई कुवर पत्नीसह दुचाकीने गुजरातकडे जात असताना राजबारीनजीक अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. त्यात पुन्याभाई कुवर (वय ५१) जागीच ठार झाले, तर पत्नी उर्मिलाबेन (वय ४८) गंभीर जखमी झाल्या. याबाबत मृताचा मुलगा अरविंदभाई याच्या फिर्यादीवरून पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनाविरुद्ध गुन्ह्याची नोंद झाली. हवालदार जे. एस. जाधव, आर. पी. टोपले तपास करीत आहेत.

## खासगी बाजार समिती स्वीकृत संचालक निवड

**कसबे-सुकेणे :** हिवरगाव (ता. सिन्नर) येथील खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्वीकृत संचालकपदी भाऊसाहेब पडोळ, रविराज बोराड, प्रवीण वाघ, अन्वर सय्यद व प्रतीक्षा कातकाडे यांची नुकतीच निवड करण्यात आली. जुलै २०२४ मध्ये हिवरगाव येथे खासगी मार्केटद्वारे कांदा व भुसार मालाचे लिलाव सुरू करण्यात आले. सिन्नर, निफाड, नाशिक, कोपरगाव तालुक्यांतील शेतकरी शेतीमाल विक्रीसाठी आणत आहे. हिवरगाव खासगी मार्केटचा वाढता आलेख व भविष्यात होणारी भरभराट यांचा अंदाज घेऊन विद्यमान संचालक मंडळाने पाच स्वीकृत संचालक नेमण्याचा निर्णय घेतला. सदर संचालकांना नियुक्तीचे पत्र चेअरमन नवीनकुमार सिंह, व्हा. चेअरमन सुनील ठक्कर यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी संचालक गणेश कांडेकर, दिलीप आहेर, सागर दौंड, पंकज मवाळ, विकी ठक्कर, व्यापारी कैलास गायकवाड, ऋषिकेश वेताळ, मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बाजारे आदी उपस्थित होते.

# दिंडोरीत धरणांनी तळ गाठल्याने तीव्र टंचाई

### ग्रामीण भागात पाणीबाणी; महिलांवर भटकंतीची वेळ, नियोजन गरजेचे

**दिंडोरी : प्रतिनिधी**

तालुक्यात तापमान वाढल्याने पारा प्रतिदिन उच्चांक गाठताना दिसत आहे. त्यात भीषण पाणीटंचाईची समस्या उभी ठाकली असून, पिण्यासाठी पाणी उपलब्ध करण्यासाठी पाणीपुरवठा योजनांवर मर्यादा पडल्या आहेत. त्यात पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशा महिलांना भटकावे लागत आहे.

तालुक्यातील सर्वच धरणांचा जलसाठा आटल्याने प्रशासनाची यामध्ये कसोटी लागली आहे. तालुक्याला धरणांची काशी म्हटली जाते. करंजवण, ओझरखेड, पुणे-गाव, वाघाड, तिसगाव, पालखेड ही धरणे असून, सध्या सर्वच धरणांनी तळ गाठण्यास सुरुवात केल्याने सद्यस्थिती चिंताजनक ठरत आहे.

ग्रामीण भागात सर्वाधिक टंचाईचे संकट निर्माण झाले असून, तालुक्याच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर पट्ट्यामध्ये पाणीटंचाई हा एकच आणि एकच प्रश्न निर्माण झाला आहे. मागील वर्षी पाऊस काहीअंशी शेवटच्या टप्प्यात बरसल्याने तालुक्यातील सर्वच धरणांनी १०० टक्क्यांचा आकडा पार केला होता. मात्र, दिंडोरी तालुक्यातील धरणांवर काही तालुके हे राखीव असल्याने सध्या तालुक्यावरच टंचाईचे संकट ओढावले आहे.

त्यात धरणांनी तळ गाठण्यास सुरुवात केल्याने जनतेला कृत्रिम पाणीटंचाईची झळ सोसावी लागत आहे. शेतकऱ्यांना पिकांना पाणी कसे द्यावे, असा प्रश्न पडला आहे. अनेक ठिकाणी धरणातून पिण्यासाठी पाण्याची पाइपलाइन विविध ग्रामपंचायतींनी उपलब्ध करूनही पाणीटंचाईचे ग्रहण सुटता सुटेनासे झाले आहे. धरणातच पाणी नाही तर गावासाठी पाणी उपलब्ध कसे करायचे, हा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे.

दिंडोरी तालुक्यातील काही भाग हा आदिवासी, डोंगराळ असल्याने महिलावर्गाला काही किलोमीटर पायी प्रवास करून डोक्यावरून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. संबंधित खात्यातील लोकांनी पाणीटंचाईचे संकट दूर करण्यासाठी योग्य ते नियोजन करावे, अशी मागणी आहे.



**पाणी समस्या दूर व्हावी**

दिंडोरी हा सहा धरणांचा एकमेव तालुका आहे. मात्र, सद्य:स्थिती पाहता भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, याचा फटका शेतकरीवर्गाबरोबर महिलांना बसत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पाण्याबाबत योग्य नियोजन करून पाणीटंचाई दूर व्हावी, अशी अपेक्षा महिलावर्गाकडून व्यक्त होत आहे.

**पाण्याबाबत योग्य नियोजन अपेक्षित**

धरणांचा तालुका म्हणून दिंडोरीकडे पाहिले जात आहे. तालुक्यात सहा धरणे असूनही दिवसागणिक पाण्याची गरज निर्माण होऊन व पाण्याबाबत मागणी वाढत आहे. धरणातील जलसाठा अग्रक्रमाने पिण्यासाठी राखीव ठेवण्याचे आव्हान भविष्यात संबंधित विभागापुढे असणार आहे. त्या दृष्टिकोनातून योग्य तो नियोजनात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**– नामदेव गावित,** उपाध्यक्ष, निर्भय महाराष्ट्र पार्टी, नाशिक

## लुल्ले सोसायटी चेअरमनपदी ॲड. विनोद चव्हाण बिनविरोध

**मालेगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील लुल्ले येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी ॲड. विनोद चव्हाण, तर व्हा. चेअरमनपदी दिनकर चव्हाण यांची अविरोध निवड करण्यात आली. विकास सोसायटीची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली.

चेअरमन व व्हा. चेअरमनपदाच्या निवडणुकीसाठी बैठक बोलाविली होती. यावेळी अर्ज दाखल करण्याच्या निर्धारित वेळेत चेअरमनपदासाठी ॲड. विनोद चव्हाण, तर व्हा. चेअरमनपदासाठी दिनकर चव्हाण यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची अविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी साहेबराव चव्हाण, भाऊसाहेब चव्हाण, भागवत ठाकरे, शांताराम साळुंके, विजय चव्हाण, समाधान चव्हाण, सागर चव्हाण, प्रभाकर लाडके, जवाहरलाल चव्हाण, नंदू चव्हाण, सुदर्शन चव्हाण, संदीप चव्हाण, तेजस चव्हाण, पप्पू साळुंके, जनार्दन जाधव, सुनील चव्हाण, अमोल चव्हाण, विठाबाई चव्हाण, किरण चव्हाण, संस्थेचे सचिव दीपक गुरव आदी उपस्थित होते. या निवडीनंतर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. चेअरमन चव्हाण यांनी संस्थेच्या माध्यमातून केलेल्या कर्जवाटपाची वसुली करून सभासदांना बँकेकडून कर्जपुरवठा उपलब्ध करून देऊ, असे सांगितले.





इगतपुरी : आंबेवाडी येथे झिऱ्यातून पाणी भरून दोनशे फूट उंच चढून डोक्यावर पाणी आणताना महिला. ( छायाचित्र : ओंकार गवांदे)

# महिलांची पाण्यासाठी जीवघेणी भटकंती

### इगतपुरी तालुक्यात टंचाई, लोकप्रतिनिधींसह प्रशासनाचे दुर्लक्ष

**इगतपुरी : प्रतिनिधी**

कोणत्याना कोणत्या निवडणुकीच्या काळात अनेक आश्वासने देऊन निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी आदिवासी तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या समस्या सोडल्या नसल्याने धरणांच्या तालुक्यातच पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण फिरण्याची वेळ आली आहे. पाण्यासाठी भटकंती कधी थांबणार, हा प्रश्न नागरिकांनी केला आहे.

तालुक्यातील आंबेवाडी शिवारात सध्या भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. स्थानिक आदिवासी महिलांना अक्षरशः जीव धोक्यात घालून दोनशे फूट खाली उतरून पाणी भरावे लागत आहे. परिसरातील पाझर तलाव आटले असून, एकमेव झिरा उरलेला आहे, जो तलावाच्या एका कोपऱ्यात पाझरत आहे. या झिऱ्यातून एक हंडा पाणी भरायला सुमारे २० मिनिटे लागतात.

मात्र, पाणी भरून एवढ्यावरच महिलांचा त्रास संपत नाही. त्यानंतर त्यांना खडकाळ, अरुंद व दोनशे फूट उंच चढणाऱ्या पायवाटेने टेकडी चढत १ ते १.५ किमी अंतरावर पाणी वाहून न्यावे लागते. हा जीवघेणा, धोकादायक प्रवास आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा महिला पाणी वाहून नेत असताना तोल जाऊन पडल्याने जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, लोकप्रतिनिधी किंवा प्रशासनाकडून अद्यापही योग्य उपाययोजना केलेल्या नाहीत.

विशेष म्हणजे, गावात जलजीवन मिशनअंतर्गत पाण्याची टाकी व पाइपलाइनचे काम पूर्ण झाले असले तरी नियोजनाअभावामुळे त्या टाकीत अद्याप पाणीच आलेले नाही. परिणामी, ही योजना केवळ कागदावरच मर्यादित राहिली आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीवर प्रशासक राज असल्याने अधिकारी वर्ग त्यांच्या मर्जीप्रमाणे वागत आहे. त्यामुळे नागरी समस्या कायमच राहत आहे. या समस्या सोडविण्यासाठी निवडणुका घेणे गरजेचे आहे. किमान स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी तरी यावर तोडगा काढतील.

**– रमेश शिंदे,** सामाजिक कार्यकर्ते

या गंभीर समस्येमुळे ग्रामस्थांत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

विशेषतः महिलांना दररोज त्रास सहन करावा लागत असून, आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहिला आहे. प्रशासनाने पाण्याची व्यवस्था करण्यासह जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीची चौकशी करावी, अशी मागणी आहे.

# खरेदी केलेला भात गुजरातला विक्री केल्याची चौकशी करा

### आदिवासी विकास महामंडळ संचालक महालेंची मागणी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

आदिवासी विकास महामंडळाने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला भात गुजरातला विकल्याच्या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महामंडळाचे संचालक माजी आमदार धनराज महाले यांनी केली आहे. या प्रकारात काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची मिलिभगत असल्याचा आरोपही महाले यांनी केला आहे,

माजी आमदार महाले यांनी सांगितले आहे की, सुरगाणा तालुक्यात उघडकीस आलेला प्रकार हा गंभीर असून, भात गुजरातमधील मिलमध्ये जात असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी उघडकीस आणले आहे. चांगल्या दर्जाच्या तांदळाच्या बदल्यात खराब, कमी प्रतीचा तांदूळ बदली केला जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करण्याची मागणी आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांच्याकडे केली आहे. एकीकडे व्यवस्थापकीय संचालक बनसोड आदिवासी विकासासाठी चांगले काम करत असताना, इतर अधिकारी चुकीची कामे करून खेळखंडोबा करत आहे. प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक उपव्यवस्थापक आदी काही अधिकारी-कर्मचारी हे संगनमताने मनमानी करत आहे, असा आरोप महाले यांनी केला आहे.

या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची गरज आहे. असाच प्रकार अन्य कुठे झाल्याची शक्यता असून, त्याचीही चौकशी करावी. काही अधिकारी, कर्मचारी गेली अनेक वर्षे एकाच जागेवर असून, त्यातील काही मनमानी कारभार करत आहे. त्यांच्याही बदल्या कराव्यात, अशीही मागणी माजी आमदार महाले यांनी केली.

# तांडावस्ती सुधार योजनेची मंजूर कामे अन्यत्र

### पाचोरे बुद्रुक येथील आंधळेंचा आरोप, चौकशीची मागणी

**पाचोरे बुद्रुक : वार्ताहर**

वसंतराव नाईक तांडासुधार योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये पाचोरे बुद्रुक (ता. निफाड) येथील सहापैकी चार वस्त्यांमध्ये खडीकरण, तर दोन वस्त्यांमध्ये स्ट्रीट लाईट अशी कामे शासनाने मंजूर केलेली होती. त्यातील केवळ तीन कामे मंजूर वस्तीत केली. उर्वरित कामे ठेकेदारांनी अंदाजपत्रक तयार करताना त्यात ग्रामपंचायत अधिकारी यांच्या बनावट नकाशाच्या आधारे अन्यत्र दाखवून ग्रामस्थांसह शासनाची फसवणूक केली, अशी तक्रार विकास सोसायटीचे संचालक विलास आंधळे यांनी केली आहे. संबंधित तक्रार लालफितीत' अडकल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून १३ मार्च २०२४ च्या आदेशानुसार निफाड तालुक्यातील पाचोरे बुद्रुक गावात आंधळे वस्ती रस्ता खडीकरण, तर सानप वस्ती, उगले वस्तीत स्ट्रीट लाईट, आंधळे वस्ती व नागरे वस्तीत रस्ता खडीकरण असे सुमारे अठ्ठेचाळीस लाखांची कामे मंजूर आहे. उर्वरित तीन कामांची तक्रार करूनही संबंधितांनी दखल घेतली नाही. संबंधित अधिकारी ठेकेदारांना पाठीशी घालत ग्रामस्थ व शासनाची फसवणूक केल्याची तक्रार विलास आंधळे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी आदींकडे केली आहे. याबाबत कारवाई न झाल्यास अनोख्या पद्धतीने आंदोलन करून लक्ष वेधून घेतले जाईल, असे मत तक्रारदाराने व्यक्त केले आहे.

# बेपत्ता बालकांच्या शोधासाठी आता ऑपरेशन शोधमोहीम

**मालेगाव : प्रतिनिधी**

महिला व लहान बालके हरविण्याचे प्रमाण वाढले आहे. अचानकपणे बेपत्ता किंवा हरवलेल्या महिला व बालकांच्या शोधासाठी आता ऑपरेशन शोध ही मोहीम पोलिस प्रशासनाने हाती घेतली आहे. १७ एप्रिलपासून सुरू झालेली मोहीम १५ मेपर्यंत राबवली जाणार आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक सूरज गुंजाळ यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात या मोहिमेंतर्गत अधिकाऱ्यांची बैठक घेत सूचना केल्या.

महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या अपर पोलिस महासंचालकांची ऑपरेशन शोध ही मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू यांनी मोहीम अंमलबजावणीच्या सूचना केल्या होत्या. गुंजाळ यांनी शहर व कॅम्प विभागात प्रत्येकी तीन मिसिंग सेल स्थापन केले आहेत. एका सेल पथकात एक महिला व पुरुष असे प्रत्येकी दोन पोलिस कर्मचारी नियुक्त केले आहेत. या पथकांच्या कामकाज देखरेखीसाठी एक उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. मिसिंग सेलमार्फत हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेतला जाणार आहे. कर्मचाऱ्यांना ऑपरेशन शोधमोहिमेची माहिती देण्यात आली.

**मदतीसाठी हेल्पलाइन**

रेल्वे स्टेशन, बसस्थानके, पर्यटनस्थळे, धार्मिक स्थळांच्या परिसरात फिरणाऱ्या अल्पवयीन बालकांची चौकशी केली जाईल. भीक मागणारे, वीटभट्टी, हॉटेल्स अशा ठिकाणी हरवलेल्या बालकांची चौकशी केली जाणार आहे. कार्यवाही करताना बालकल्याण समिती, महिला व बालविकास विभाग, जिल्हा बालसुरक्षा कक्ष, नारी निकेतन, महिला सुरक्षा गृह तसेच अशासकीय संस्थांची मदत घेतली जाणार आहे. ११२, ८६५७२२७७७ व ९८७७७७७९८० हे हेल्पलाइन नंबर देण्यात आले आहेत.

# ग्रामसभेचा ठराव झुगारून भेंडाळी ग्रामपंचायतीची मनमानी


### शाळेजवळ पोल्ट्री व्यवसायास परवानगी दिल्याने कार्यालयास ठोकले टाळे

**निफाड : प्रतिनिधी**

तालुक्याच्या गोदाकाठ परिसरातील भेंडाळी ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ पोल्ट्री व्यवसायासाठी ग्रामपंचायतीने परवानगी दिल्याने संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकले. सदर परवानगी तत्काळ रद्द करावी, अशी मागणी केली.

भेंडाळी ग्रामपंचायत हद्दीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाळोटी माथा या वस्ती शाळेजवळ जमील शेख यांनी पोल्ट्री व्यवसायासाठी परवानगी मिळण्याबाबत ग्रामपंचायतीकडे दोन वर्षांपूर्वी अर्ज केला होता. परंतु, या ठिकाणी शाळा असून, आजूबाजूला शेतकरी राहत असल्याने पोल्ट्री व्यवसायाला परवानगी देऊ नये, असा लेखी अर्ज दिला होता. तसा ठराव ग्रामसभेत केला होता. ग्रामसेवक युसूफ शेख आणि सरपंच भारती खालकर, उपसरपंच किसन खालकर, ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामस्थांना अंधारात ठेवत परस्पर परवानगी दिल्याने ग्रामस्थ संतप्त झाले. ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात आवाज उठवला. सरपंच भारती खालकर यांनी मात्र या परवानगीच्या कागदांवर स्वाक्षरी माझी नसून, ग्रामसेवकांनी परस्पर केल्याचा दावा केला, तर उपसरपंच किसन खालकर यांनी मात्र हे प्रकरण आपल्याला माहीत नसून, ग्रामसेवकांनी परस्पर परवानगी दिल्याचा दावा केला. परंतु, ग्रामसेवकांनी हा दावा फेटाळला. या प्रकरणात आर्थिक देवाण-घेवाण झाल्याने सर्वांच्या संमतीने परवानगी दिल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्य करत आहे. सरपंच आणि उपसरपंचांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता परस्पर अशा प्रकारची परवानगी देत असतील तर ग्रामसेवकाविरोधात तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी केली.

ग्रामसेवक, सरपंच यांचे समाधानकारक उत्तर न आल्याने ग्रामस्थांचा संताप अनावरण झाला. ग्रामपंचायत सदस्य गणेश मोगल, शांताराम शिंदे, सागर खालकर, मधुकर आढाव, संदीप सातपुते रामदास शिंदे, दीपक शिंदे, माधव शिंदे, बबन आढाव, दिलीप आढाव, श्याम आढाव आदींसह परिसरातील नागरिकांनी ग्रामपंचायतीवर मोर्चा नेत कार्यालयाला टाळे ठोकले. सदर परवानगी रद्द करावी, अशी मागणी केली.



निफाड : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेलगत पोल्ट्री व्यवसाय परवानगी दिल्याने संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयास कुलूप लावले.

पोल्ट्री व्यवसायाच्या परवानगीसंदर्भात ग्रामस्थांनी वारंवार ग्रामसभेत चर्चा केली आणि त्यास ग्रामसभेत विरोध करण्यात आला. यासंदर्भात ग्रामसभेत ठरावही केला, परंतु या ग्रामसभेला केराची टोपली दाखवत ग्रामसेवक, सरपंच यांनी परस्पर परवानगी दिली आहे. शाळा जवळ असल्याने आमचा विरोध आहे. येथे पोल्ट्री व्यवसाय सुरू करायचा असेल तर परिसरातील मुलांनी शिक्षण कुठे घ्यायचे आणि त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास जबाबदार कोण?

**– सागर खालकर,** सदस्य, ग्रामपंचायत

जिल्हा परिषद शाळेजवळ पोल्ट्री व्यवसायाला परवानगी देणे म्हणजे आमच्या मुलांच्या आरोग्याची खेळण्यासारखे आहे. त्यामुळे आम्ही सदर जागेत पोल्ट्री व्यवसायास परवानगी देऊ नये, यासंदर्भात अर्ज केला होता. ग्रामपंचायतीने आम्हाला आश्वासनही दिले होते. परंतु, परवानगी दिली गेल्याने आम्ही आमच्या मुलांना शाळेत कुठे पाठवावे, त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यास ग्रामपंचायत जबाबदारी घेईल काय?

**– माधव शिंदे,** पालक

ग्रामसभेत पोल्ट्री व्यवसायला परवानगी देण्यासंदर्भात चर्चा झाली होती, तेव्हा परवानगी देऊ नये, असा ठराव केला आहे. परंतु, ग्रामसेवक युसूफ शेख यांनी परस्पर माझी ड्युप्लिकेट स्वाक्षरी करून परवानगी दिली आहे. यासंदर्भात गटविकास अधिकारी यांनी तत्काळ दखल घेऊन सदर ग्रामसेवकावर कारवाई करावी आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करावी.

**भारती खालकर,** सरपंच, भेंडाळी

# खतांच्या विक्रीसाठी ई-पॉस प्रणालीचा वापर आवश्यक : बोरकर

## खरीप हंगामपूर्व प्रशिक्षणात उत्पादक, विक्रेत्यांना मार्गदर्शन

नाशिक : प्रतिनिधी

बियाणे, खते आणि कीटकनाशके यांची विक्री करताना ऑनलाइन प्रक्रिया आत्मसात करून कायद्यातील तरतुदींप्रमाणे कृषी निविष्ठांचे उत्पादन व विक्री करावी. जेणेकरून शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे कृषी उत्पादन घेता येईल. बियाणे विक्रीसाठी बनविलेल्या साथी या पोर्टलचा वापर करावा, बियाण्याचे उत्पादन ते विक्रीपर्यंत संपूर्ण माहिती मिळू शकते. रासायनिक खतांची विक्री करताना ई-पॉस प्रणालीचा वापर करावा. तसेच इ-पॉस ऑनलाइन साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष उपलब्ध खतसाठा याची दररोज पडताळणी करावी, अशा सूचना राज्याचे कृषी आयुक्तालयाचे गुणनियंत्रण संचालक सुनील बोरकर यांनी केले.



जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा उत्पादक व विक्रेते यांचे खरीप हंगामपूर्व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले असता उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोरकर बोलत होते. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी आर. डी. वाघ, मोहीम अधिकारी दीपक सोमवंशी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक डॉ. जगन सूर्यवंशी, तंत्र अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) उल्हास ठाकूर, कृषी अधिकारी राहुल आहेर, सुनील विटनोर, संतोष राठोड, किशोर आहिरे, नंदकुमार अहिरे, बाळासाहेब खेडकर, भिष्मा पाटील, महेश नागपूरकर, कैलास भदाणे, प्रणय हिरे, विजय केदार यांच्यासह नाडाचे प्रतिनिधी, माफदा, ओमा या संघटनेचे प्रतिनिधी व जिल्ह्याचे कृषी निविष्ठा उत्पादक व विक्रेते उपस्थित होते. बोरकर म्हणाले, कारण केंद्र शासनाच्या धोरणानुसार ई-पॉसवरील खत शासनाच्या माहिती आधारेच खतांचे जिल्ह्यात वितरण केले जाते. तसेच खतांचे लिंकिंग करून शेतकऱ्यांना अनावश्यक कृषी निविष्ठांची सक्ती करू नये, कीटकनाशक विक्री करताना लेबल क्लेम तपासूनच आणि कीटकनाशक कायद्यातील अधिसूचनेप्रमाणे पक्के बिल शेतकऱ्यांना अदा करावेत. बिलावरील संपूर्ण माहिती भरून स्वयंस्वाक्षरीत बिल देण्यात यावे. शेतकऱ्यांना योग्य शिफारशीप्रमाणे कीटकनाशकांचा वापर करता येईल. आणि भविष्यात चुकीच्या फवारणीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, याबाबत दक्ष राहावे, असे आवाहन त्यांनी केले. विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी नाशिक हा कृषी प्रगत जिल्हा असून, कृषी निविष्ठा विक्री करताना गुणवत्तेकडे लक्ष द्यावे. तसेच आपला व्यवसाय करताना केवळ नफा न बघता एकूण उलाढाल लक्षात घ्यावी. शेतकरी हा आपला मौल्यवान ग्राहक आहे. त्यासाठी योग्य मार्गदर्शन व सल्ला द्यावा. फक्त आवश्यक असेल तशाच निविष्ठांची विक्री शिफारस करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. नाशिक अ‍ॅग्रो डीलर्स असोसिएशनचे (नाडा) अध्यक्ष अरुण मुळाणे यांनी उपस्थित विक्रेत्यांना संबोधित करताना शेतकरी कुटुंबातील असल्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी दर्जेदार खते, बियाणे व कीटकनाशकांच्या विक्रीबरोबर तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे गरजेचे असल्याचे म्हटले. कृषी विकास अधिकारी संजय शेवाळी यांनी जिल्ह्यात पेरणी होणारे क्षेत्र त्यासाठी आवश्यक खते, बियाणे आणि कीटकनाशके यांचा सुरळीत पुरवठा होऊन या खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना सहजपणे कायद्यातील तरतुदीप्रमाणे पुरवठा करावा आणि याबाबत प्रत्येक तालुकास्तरावर प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे सांगितले. प्रशिक्षण वर्गात फवारणी करताना व कृषी बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी याबाबतच्या घडीपत्रिका व पोस्टर्स यांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजय धात्रक यांनी सूत्रसंचालन केले.

# महिला-बालविकास मंत्री तटकरे यांचा नाशिक दौरा

नाशिक : प्रतिनिधी



राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे गुरुवारी (दि. ८) जिल्हा परिषदेला भेट देणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत महाकवी कालिदास कलामंदिरात सकाळी साडेदहा ते बारापर्यंत विविध विकासकामांचे उद्घाटन व योजनांचा प्रारंभ करण्यात येणार आहे.

यावेळी जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या मेन्स्ट्रुअल कप प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम अ‍ॅपचे लोकार्पण व प्रात्यक्षिक करण्यात येईल. जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागांतर्गत विविध कार्यक्रमांचा आढावा घेण्यात येणार आहे. ग्रामीण अंगणवाड्यांची १०० टक्के विद्युतीकरण घोषणा, मुंबई आयआयटीच्या सहकार्याने स्तनपान प्रशिक्षण कार्यक्रम, लेक लाडकी योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप, रुपे कार्ड वितरण, ई-पिंक रिक्षा वाटप आदी. यावेळी महिला व बालविकास विभागाच्या प्रभावी अंमलबजावणीचा त्या आढावा घेतील.

# नाशिककरांनो, पाणी जपून वापरा

## शनिवार, रविवार पाणीपुरवठा खंडित

नाशिक : प्रतिनिधी

शहरातील विविध भागांत गेल्या काही दिवसांपासून पाणीबाणीची स्थिती असून, महापालिका प्रशासनाकडून त्यावर उपाय म्हणून दुरुस्तीची कामे केली जात असल्याचा दावा केला जात आहे. दरम्यान, पुन्हा एकदा येत्या शनिवारी (दि.१०) संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा खंडित राहणार आहे. रविवारी (दि. ११) सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होईल, अशी माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

तांत्रिक कामांसाठी पाणीपुरवठा दोन दिवस खंडित केला जाणार आहे. हे काम शहरातील सर्व भागांतील विविध जलशुद्धीकरण केंद्रे व जलकुंभ येथे करावयाचे आहे. त्यामुळे सर्व जलशुद्धीकरण केंद्रे बंद ठेवण्याची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे गंगापूर धरण रॉ-वॉटर पंपिंग स्टेशन, चेहेडी पंपिंग स्टेशन, मुकणे धरण पंपिंग स्टेशन बंद ठेवणे क्रमप्राप्त आहे. मॉन्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने गंगापूर धरण पंपिंग स्टेशन येथे उपकेंद्रातील विविध देखभालीची कामे करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे गंगापूर व मुकणे धरणातून या कालावधीत पंपिंग करता येणार नाही.

दरम्यान, मनपाची सर्व जलशुद्धीकरण केंद्रे बंद राहणार आहेत. स्मार्ट सिटीअंतर्गत शहरामधील विविध जलशुद्धीकरण केंद्रे व जलकुंभ येथे स्काडा प्रणाली बसविण्याचे काम प्रगतिपथावर आहे. त्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रे व जलकुंभ येथे करावयाच्या विविध कामांच्या अनुषंगाने, तसेच बारा बंगला जलशुद्धीकरण केंद्र येथील नव्याने उभारण्यात आलेल्या उपकेंद्राी चाचणी व कार्यान्वित करण्यासाठी स्मार्ट सिटीने शटडाउनचे नियोजन केले आहे. त्यामुळे येत्या शनिवारी (दि. १०) दिवसभर व रविवारी (दि. ११) सकाळचा पाणीपुरवठा होणार नाही, असे मनपा पाणीपुरवठा विभागाने म्हटले आहे.

**पाण्यासाठी नागरिकांचे हाल**

शहरातील सहाही विभागांतील काही भागांत पाणीपुरवठ्याची तीव्र टंचाई उद्भवत आहे. त्यामुळे नागरिकांवर हजार रुपये प्रति टँकरने पाणी घेण्याची वेळ आली आहे. याकडे महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग कधी लक्ष देणार, असा सवाल नागरिक करीत आहेत.





# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नियोजन करावे

## शिवसेनेच्या वाहतूक शाखेची मागणी

नाशिक : प्रतिनिधी

शहरातील प्रवेशद्वार असलेल्या छत्रपती संभाजीनगर महामार्ग ते आडगाव नाकादरम्यान मोठ्या संख्येने लॉन्स आहेत. एप्रिल, मे व जून या महिन्यांत लग्नतिथी जास्त असल्याने दरवर्षी नांदूर नाका ते आडगाव नाकादरम्यान सिग्नलवर प्रचंड वाहतूक कोंडी होते. याप्रकरणी वाहतूक पोलिस शाखेने लक्ष घालून लॉन्सधारकांना निर्देश देऊन पार्किंगची व्यवस्था करावी, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाने वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांच्याकडे केली. निवेदनात म्हटले की, शहरात प्रामुख्याने नांदूर नाका चौफुली (छत्रपती संभाजीनगर रोड), आडगाव नाका, म्हसरूळ लिंक रोड, बळी मंदिर चौक, जत्रा चौफुली, अमृतधाम चौफुली येथे मंगल कार्यालये असून, तेथे सकाळ व संध्याकाळ वाहतूक समस्या निर्माण होते.

या समस्येवर योग्य उपाययोजना होणे आवश्यक आहे. यासाठी वाहतूक शाखेकडून लॉन्सधारकांना योग्य निर्देश देऊन पार्किंगची व्यवस्था करण्यास सांगावे. यासाठी रस्त्यावरील पार्किंगसाठी वाहतूक पोलिसांना योग्य नियोजन करण्याचे निर्देश देण्यात यावेत. नाशिकबाहेरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्गाचा वापर करण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. यासाठी दिशादर्शक फलक उभारणे आवश्यक आहेत. दिशादर्शक फलक झाकले जाणार नाहीत याकडे लक्ष द्यावे. प्रमुख चौकांत अजूनही वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत यासाठी सिग्नल यंत्रणा उभारण्यात यावी. वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नेमणूक करावी, अशी मागणी केली. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, शशिकांत कोठुळे, महेश जोशी, विधानसभाप्रमुख रोशन शिंदे, उपमहानगरप्रमुख आनंद फरताळे, उमेश चव्हाण, सुनील भंबारे, विशाल खैरनार आदी उपस्थित होते.

# चांदवड टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

चांदवड : वार्ताहर

मुंबई-आग्रा महामार्गावरील चांदवड येथील चांदवड - धुळे टोलनाक्यावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी पगाराच्या मुद्द्यावरून मंगळवारी (दि. ६ मे) सायंकाळपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. यामुळे टोलनाक्यावर वाहनांची मोठी गर्दी झाली असून, प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

टोलनाक्यावर एकूण १६५ कर्मचारी कार्यरत आहेत. यापैकी ४६ कर्मचाऱ्यांचा पगार नियमितपणे होत नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. यासंदर्भात कर्मचाऱ्यांनी १ एप्रिल ते २२ एप्रिल यादरम्यान प्रशासनाला निवेदन दिले होते. मात्र, दोन महिने उलटूनही त्यांच्या पगाराचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. या पार्श्वभूमीवर संतप्त कर्मचाऱ्यांनी मंगळवारी दि. ६ रोजी सायंकाळी ४ वाजेपासून टोल वसुलीचे काम थांबवले आहे.

कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे टोलनाक्यावरून कोणत्याही वाहनाकडून टोल घेतला जात नाही. त्यामुळे वाहने टोल न भरता पुढे जात आहेत. मात्र, अचानक झालेल्या या आंदोलनामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत आणि प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या संदर्भात टोल मॅनेजर रवींद्र अहिरे आणि टोल संघटनेचे प्रहारचे अध्यक्ष बन्सीलाल कासव, तसेच टोल कर्मचारी सखाराम ठाकरे आणि अनिल पवार यांनी अधिक माहिती दिली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेळेवर पगाराचा प्रश्न तातडीने सोडवला जावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनाकडून यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे आता लक्ष लागले आहे.

**ई-निविदा सुचना**

महावितरण

कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं. मर्या चांदवड विभाग यांनी महावितरणतर्फे मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून खालील कामाकरीता लखोटाबंद ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रू. | बयाना रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | EE/CND/ T-02/2025-26 | चांदवड विभाग अंतर्गत नादुरुस्त रोहित्र तसेच लाईन मटेरीअल वाहतुकीचे वार्षिक कामाकरीता. | १० लाख | १००००/- |

सदरची निविदा संकेतस्थळावर भरण्याचा कालावधी दि. **०७.०५.२०२५ ते १५.०५.२०२५** रोजी २३. ०० वा पर्यंत. शक्य असलेस. निविदे बद्दलच्या संपूर्ण माहितीसाठी कंपणीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** या वेबसाईटला भेट द्यावी.

PRO No - १३३/२०२५ **कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या. चांदवड विभाग**

**इ-निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वि.कें/२०२५-२६/१४**

महानिर्मिती

| अ. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००५७३६९ / ओडीपी | डब्ल्यूटीपी क्षेत्रात सहाय्यक संरचना आणि पाईपलाईनसाठी अ‍ॅन्टी संरक्षण कोटिंग प्रदान करणे आणि लागू करण्यासाठी कार्य करार. | २९,४६,३००/- / ३२,९७०/- |
| २. | ३००००५७३४० / सीएचपी | कन्व्हेयर बेल्टच्या ट्रान्सफर पॉईंटसाठी बेल्ट ट्रॅकिंग इम्पॅक्ट किट पुरवण्याचे आणि निश्चित करण्याचे काम. | १,९७,००,०००/- / २,००,५००/- |
| ३. | ३००००५७३४५ / सीएचपी | एनसीसीसी तंत्र वापरून सीएचपी मधील विविध ठिकाणी स्थापित केलेल्या सर्व प्रकारच्या एचटी/ एलटी पॅनेल, रिले आणि कंट्रोल पॅनेलमधील चिकटलेल्या दुषित घटकांची ऑनलाईन कसून तपासणी करण्याचे काम. | १८,८७,३५०/- / २२,४००/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

# सोने : काल, आज आणि उद्या चर्चासत्र

नाशिक : प्रतिनिधी



सराफ व्यवसायाने आता पारंपरिक पद्धतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. डिजिटल बिलिंग, हॉलमार्किंगचे पालन आणि ग्राहकाभिमुख सेवा दिल्यास व्यवसायात विश्वास निर्माण होतो व वृद्धी होते, असे प्रतिपादन इंडिया बुलिय अँड ज्वेलर्स असोसिएशनचे राष्ट्रीय सचिव सुरेंद्र मेहता यांनी केले.

आयबीजेए उत्तर महाराष्ट्र बोर्ड व नाशिक सराफ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. ६) आयोजित सोने : काल, आज आणि उद्या या विषयावर ते बोलत होते. नाशिक्लब येथे झालेल्या या चर्चासत्रात जिल्हाभरातील दोनशेहून अधिक सराफ व्यावसायिक उपस्थित होते.

विशेषतः ऑनलाइन प्लॅटफॉर्मशी स्पर्धा करताना स्थानिक दुकानदारांनी आपली विशिष्टता जपली पाहिजे. ग्राहकाला प्रत्यक्ष दागिने पाहण्याची व तत्काळ सेवा मिळण्याची सोय, सल्ला व सानुकुल डिझाइन मिळण्याची सुविधा ही स्थानिक दुकानदारांची मोठी ताकद आहे. ग्राहकाशी नातं निर्माण करून विश्वास वाढवणे, हेच व्यवसायवाढीसाठी प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे अनिल दंडे, राजेंद्र शहाणे यांनी संघटनेच्या एकत्रित प्रयत्नांचे कौतुक करत, व्यवसायात पारदर्शकता व प्रशिक्षणाची गरज अधोरेखित केली.

यावेळी मेहुल थोरात, योगेश दंडगव्हाळ, श्याम दुसाने, प्रसाद बाबर, कन्हैया आडगावकर, सुनीता दौंडकर, मयूर शहाणे आदींसह सराफ व्यावसायिक उपस्थित होते. किशोर वडनेरे यांनी सूत्रसंचालन केले. गिरीश नवसे यांनी प्रास्ताविक केले. चेतन राजापूरकर यांनी आभार मानले.

**E-Tender Notice No. 03/2024-25**
**Brief Tender Notice**

Executive Engineer, Electrical Division, P.W.D., Nashik Ph. No.0253-2578012 E-mail elnashik.ee@mahapwd.govin is inviting tender from the contractors mentioned in detail tender notice & having experience of similar type of work in "B-1" format through E-Tender (On Line). Tender documents must be downloaded from Governent site https://mahatenders.gov.in

Executive Engineer, Electrical Division, P.W.D., Nashik has reserved the right to accept or to reject any tender at any stage. Conditional tenders will not be accepted.

**Name of Work: 01 work from Nashik District.**
**Time Schedule of sale & submission of Tender: From 07.05.2025 to 14.05.2025**
**E-Tender Opening: 15.05.2025**
**Pree bid meeting :- 12.05.2025**
**All the information of E-Tender is available at https://mahatenders.gov.in**
**If there occurs any change in tender, it will be informed on website.**

**NOTE: Right to cancel this notice without any prior information is reserved by the Executive Engineer, Electrical Division, P.W.D., Nashik.**

**Sd/- Executive Engineer**
आरओसी-2025-26/क्र-5/C५१९ **Elect. Divn., P.W.D., Nashik.**

# सापगावमध्ये ७० वर्षे जुन्या घराला आग

**शहापूर :** सापगाव येथे दुपारी अंदाजे १२.३० वाजता एक भीषण आग लागण्याची दुर्दैवी घटना घडली. हे घर कै. नामदेव गणू देसले यांनी सुमारे ७० वर्षांपूर्वी बांधलेले लाकडी बांधकामाचे होते. आग इतकी भीषण होती की, घरासोबतच राशन दुकानातील सर्व साहित्य, घरातील वस्तू आणि उपयोगी सामान पूर्णतः जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच जीव रक्षक टीमचे सक्रिय सदस्य अवघ्या १५ मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. साधारण दीड ते दोन तास अथक प्रयत्नांनंतर, जीवरक्षक टीमने गावकऱ्यांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. समीर चौधरी अमित तावडेभगवान म्हसकरभावेश ठाकरेतन्मय निमसेअशोक रगडे रघुनाथ आगिवलेअक्षय म्हात्रे व इतर सदस्य यांनी आग विझवण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**The Vani Merchants'Co-op.Bank Ltd.,Vani**
*Paris', Shivaji Road, Vani, Pin-422 215,
Tal-Dindori, Dist- Nasik (02557) 220140, 220015
**दि वणी मर्चन्टस् को-ऑप बँक लि. वणी**
परिस, शिवाजी रोड, वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक .(०२५५७) २२०१४०, २२००१५
रजि. नं. ३०७९९ दि.२१/११/१९६१ स्थापना दि. २५/१२/१९६१ आर.बी.आय. लाय. नं.: यु.बी. डी. एम. एच./६२५ पी. दि. ३०/१०/१९८६

**TENDER NOTICE**

The Vani Merchants' Co-op. Bank Ltd.,Vani
'Paris', Shivaji Road, Vani, Pin-422 215, Tal-Dindori, Dist-Nasik

Sealed unconditional Item rate tender is invited from experienced & good reputed Interior contractor for Interior works & repairs of The Vani Merchants Co-Operative Bank, Ltd, Vani. Tal-Dindori, Dist-Nashik Blank Tender form will be available at Yogesh Chupda & Associattes, "RAJYOG", Ground Floor, Next to Hotel Manorath, Opp. Raymond Shop, Old Pandit Colony, Sharanpur Road, Nashik-422002. Mobile: 9422769393. 9373370010 from date 07th May 25 to 13th May 25 & submit in return on or before 15th May 25 at the bank at Vani or Interior Designer Office. The Vani Merchants Co-Operative Bank Ltd, reserves right to award tender to the higher or lower cost & can cancel the entire tenders without assigning any reasons.

| | |
|---|---|
| Cost of Blank Tender form (Non Refundable) | Rs. 2,700/- |
| Earnest Money | Rs.27,000/- (by D.D.) |
| Security Deposit | Rs. 1,35,000/- |
| Time Limit | 60 Days. |

Blank Tender form, conditions of contract, specification and contract drawings can be purchased from the Office of interior designer from 11:00 am to 2:00 pm on working days (Monday to Saturday).

**Chairman**
**Mahendra Kisanlal Bora**
**The Vani Merchant Co-Operative Bank. Ltd, Vani, Taluka -Dindori, Dist.: Nashik - 422215.**

**Interior Designer**
**Yogesh Chupda & Associattes**
**"RAJYOG", Gr. Floor, Opp. Raymond Shop, Old pandit colony, Nashik 422002.**

**आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ अलंगुण,**
**ता.सुरगाणा जि.नाशिक**

**समाज कल्याण विभागाच्या मागासवर्गीय वसतिगृहात**
**विद्यार्थी प्रवेश सन: २०२५ २०२६ करिता**

आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळाच्या मागासवर्गीय वसतिगृहात/ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा/माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच शाळाबाहय मुलींच्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात प्रवेश देणे सुरु आहे. मागासवर्गीय वसतिगृहात **सन २०२५-२०२६** करिता शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या व सैनिकांच्या मुला-मुलींना आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुला-मुलींना प्रवेश दिला जाईल. येथे निदर्शनास आणले जात आहे की, मांग व भंगी समाजाच्या इयत्ता ५ वी पासूनच्या विद्यार्थ्यांना अशा वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र धरले जाईल व त्यांना त्यासाठी अग्रक्रम दिला जाईल. तरी मागासवर्गीय मुला-मुलींच्या गावी तो ज्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छितो त्या वर्गाच्या शिक्षणाची सोय नसेल त्यांनी खाली दर्शविलेल्या वसतिगृहांचे अधिक्षक/अधिक्षिका यांच्याकडे **गुरुवार, दिनांक:- ०१/०५/२०२५ पासून छापील अर्ज प्राप्त करुन योग्य माहितीसह भरुन वसतिगृह प्रमुखाकडे गुरुवार दिनांक:-२२/०५/२०२५ पूर्वी सकाळी ११.०० वाजेपर्यत जमा करावेत. प्रवेश फॉर्म खालील वसतिगृहांच्या ठिकाणी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत मिळतील.**

**✻ वसतिगृहांची नावे ✻**

(१) हुतात्मा लक्ष्मण बागुल मुला-मुलींचे वसतिगृह अलंगुण, (२) स्वामी विवेकानंद विद्यार्थी वसतिगृह उंबरपाडा, (३) कस्तुरबा कन्या छात्रालय उंबरपाडा, (४) यशवंत बोर्डीग सुरगाणा, (५) कॉ. श्यामराव परुळेकर विद्यार्थी वसतिगृह करंजूल (क),ता. सुरगाणा जि.नाशिक

**✻ सूचना ✻**

प्रवेशासाठी अर्ज केलेल्या मुला-मुलींनी **रविवार, दिनांक : २५/०५/२०२५ रोजी सकाळी ठिक १०. ०० वा. संबंधीत वसतिगृहाच्या ठिकाणी वेळेवर हजर रहावे.**

**(मा. आमदार कॉ. जे. पी. गावीत**
**संस्थापक अध्यक्ष,**
**आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ अलंगुण, ता.सुरगाणा जि. नाशिक**

**निविदा सूचना**

**डाळी, कडधान्य, किराणा व शालेय गणवेश तसेच शालेय स्टेशनरी.**

आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ अलंगुण, ता.सुरगाणा जि.नाशिक संचलित- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय तसेच समाज कल्याण विभागामार्फत सुरु असलेल्या वसतिगृहांसाठी सन-२०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात अंदाजीत डाळी, कडधान्य, किराणा, शालेय गणवेश व स्टेशनरी मालाच्या खरेदीसाठी खालील प्रमाणे स्वतंत्र निविदा मागविण्यात येत आहेत.

**(१) डाळी, कडधान्य व किराणा (२) शालेय गणवेश (३) शालेय स्टेशनरी**

माहितीच्या तपशिलाचे कोरे फॉर्म्स सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यत रुपये: ५००/- रोख भरुन खालील पत्यावर मिळतील.

**✻ पत्ता ✻**

**माया अपार्टमेंट, लोकसहकार नगर, पंचवटी, दिंडोरी रोड, नाशिक**

**मो.नं. ९४२०००१९४८/९४२३९३१६७९**

निविदा स्विकारण्याची शेवटची **तारीख: २७/०५/२०२५** राहिल व त्याच दिवशी **दुपारी ठिक १२.०० वाजता** वरील पत्यावर निविदा उघडण्यात येतील. निविदा संदर्भातील सर्व अधिकार **मा. अध्यक्ष** यांनी राखून ठेवलेले आहेत.

**(मा. आमदार कॉ. जे. पी. गावीत**
**अध्यक्ष,**
**आदर्श समता शिक्षण प्रसारक मंडळ अलंगुण, ता.सुरगाणा जि. नाशिक**

**श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, मखमलाबाद**
**ता. जि. नाशिक (२७२०१६०६२) मो.नं. ८२७५८८९१३१**

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२)**

**(प्राथमिक-मान्य दिनांक ११.०२.२०२५)**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, मखमलाबाद ता. जि. नाशिक (पंचवटी-३) या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | व्यावसायिक पात्रता | TET/ CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | Under Graduate Teacher Std (1-4/5) | Consolidated Pay-UGT (16000) | अनुदानित | सर्व विषय | मराठी | Diploma | TET Paper-1 CTET Paper-1 | १ |

**वरील पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे : अनुसूचित जाती : ०१**
**(प्रायमरी स्कूल, मखमलाबाद ता. जि. नाशिक, पंचवटी - ३)**

**सर्वसाधारण सूचना**

१) अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी : २०२२ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (http://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
२) इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदांसाठी पसंतीक्रम नमूद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) उमेदवारांसाठी इतर सूचना सविस्तर तपशीलासह (http://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये उपलब्ध असून, सदर सूचना व सूचनामध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.

**सही/-संजय मधुकर फडोळ**
**सरचिटणीस**

**सही/-सचिन पंडितराव पिंगळे**
**अध्यक्ष**

# मागासवर्गीय, आदिवासी समाजाचा निधी वळवल्याने जिल्हा काँग्रेसकडून निषेध

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा काँग्रेस अनुसुचित जाती विभागाच्यावतीने सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागाचा ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी व आदिवासी विकास विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपयांचा म्हणजेच मागासवर्गीय व आदिवासी यांच्या हक्काचा मिळुन ७४६ कोटी रुपायांचा निधी इतरत्र वळवल्याबाबत काँग्रेसकडून निषेध व्यक्त करत




अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांची भेट घेऊन कॉग्रेस अनुसुचित जाती विभाग अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे यांच्या अध्यक्षतेखालील आणि जेष्ठ नेते, माजी सभागृह नेता राजेंद्र बागुल व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभाग सरचिटणीस सुरेश मारू यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

निवेदनात महाराष्ट्र शासनाच्या हा निर्णय म्हणजेच मागासवर्गीय व आदिवासी समाजावर अन्याय करणारी बाब असुन यातून सरकारची मागासवर्गीय व आदिवासी समाजाबाबतची मानसिकता दिसून येते म्हणुन आम्ही नाशिक जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे वतीने सर्व प्रथम या जातीयवादी सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला आहे.

मागासवर्गीय व आदिवासींच्या विकासाच्या हक्काचा निधी इतरत्र वळवुन घेणे ही बाब अत्यंत गंभीर असून भारतीय संविधानाच्या कलम १५(४), १६(४), ४६ आणि ३४० नुसार सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी विशेष उपाययोजना करण्याची तरतूद केलेली असताना हया सरकारकडून मागासवर्गीय व आदिवासींवर वारंवार अन्याय होत असून हे सरकार मनुवादीवृत्ती आहे हे यातून स्पष्ट होते वेळीच सरकारने मागासवर्गीय व आदिवासींच्या हक्काचा निधी परत केला नाहीतर या जातीवादी, मनुवादीवृत्तीच्या सरकारविरोधात नाशिक जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचेवतीने तीव्र व उग्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, राजेंद्र बागुल, सुरेश मारु, प्रा.प्रकाश खळे, अशोक शेंडगे, अरुण दोंदे, महिला अध्यक्ष ड. मिना वाघ, राजकुमार जैफ, अनिल बेग, देवेन मारु, शंकर जाधव, मकरंद जाधव,अशिष बागुल, जितु मारु, सोमनाथ चतुर, प्रेमनाथ चतुर, गोरख साळवे, कुसुम चव्हाण, उषा साळवे, अमोल मरसाळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महसूल विभागातील १२८ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासनात मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात खांदेपालट करण्यात आले आहे. शनिवारी (दि. ३) सुट्टीच्या दिवशी प्रशासनातर्फे रात्री उशिरा सुमारे १२८ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले. त्यात तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण करणाऱ्यांसह वर्षानुवर्षे एकाच तालुक्यात नियुक्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशासनाने अन्य तालुक्यांचा रस्ता दाखविला आहे.

एप्रिलच्या शेवटच्या टप्प्यात राज्यस्तरावर निवड श्रेणीतील ८२ उपजिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारीपदी बढती दिली. त्यानंतर जिल्हा प्रशासनानेही दहा तलाठ्यांना मंडळ अधिकारीपदी नेमणूक दिल्या. या निर्णयानंतर प्रशासनातील वर्ग ३ व ४ च्या बदल्यांवरून चर्चा रंगू लागल्या होत्या. अखेर जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या आदेशानुसार पहिल्या टप्प्यात १२८ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, गतवर्षी लोकसभा निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे बोटावर मोजण्याइतपत प्रशासनाने बदल्या केल्या. परिणामी यंदा किमान ३० टक्के बदल्या करण्याचा लक्ष्यांक प्रशासनाने ठेवला आहे. त्यानुसार पहिल्याच टप्प्यात १२८ जणांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले. जिल्हा प्रशासनाने महसूल सहाय्यक पदावर बदलीसाठी पात्र असलेल्या ५६ कर्मचाऱ्यांच्या एकाच टप्प्यात बदल्या केल्या. सहाय्यक महसूल अधिकारीपदी कार्यरत ३८ व १४ मंडळ अधिकाऱ्यांना सध्याच्या कार्यरत तालुक्यातून अन्य ठिकाणी रस्ता दाखविण्यात आला आहे. याशिवाय २० मंडळ अधिकारी व सहाय्यक महसूल अधिकारी यांच्या पदांमध्ये अदलाबदली करताना नवीन ठिकाणी त्यांना पदस्थापना देण्यात आली आहे.

### तलाठ्यांच्या बदल्या बाकी

प्रशासनाने उद्दिष्ट ठेवलेल्या ३० टक्के बदल्यांमध्ये सर्वाधिक तलाठी पदांचा समावेश आहे. जिल्ह्यात एकूण १८१ तलाठ्यांच्या बदल्या केल्या जाणार आहेत. एकूण पदांपैकी ५७ तलाठी हे पेसा क्षेत्रातील असल्याने त्यांना त्याच क्षेत्रात अन्यत्र बदली मिळेल. पण उर्वरित १२४ तलाठ्यांना नव्याने कोणत्या तालुक्यात बदली मिळणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# साक्री-शिर्डी महामार्गावर वाळूच्या ट्रकचा अपघात

**सटाणा : प्रतिनिधी**

साक्री-शिर्डी महामार्गावर सटाणा शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या यशवंतनगर जवळ दुभाजकावर भल्या पहाटेच्या सुमारास वाळूने भरलेलला सोळा टायरी ट्रक चढल्याने दुभाजकासह ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने रात्रीची वेळ असल्याने मोठा अनर्थ टळला.



नंदुरबार येथून सोळा टायरी वाळूने भरलेला ट्रक नाशिकच्या दिशेने जात असताना सोमवारी भल्या पहाटे सटाणा शहराजवळ यशवंतनगरजवळ चालकास दुभाजकाचा अंदाज न आल्याने व या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे दुभाजक असल्याच्या खुणा अथवा रिफ्लेक्टर नसल्याने ट्रक दुभाजकावर चढला रात्रीच्या सुमारास अंधार असल्याने रस्त्याच्या दुतर्फा वाहतूक कमी असल्याने ट्रक दुभाजकावर चढला हे लवकर लक्षात आले नाही.

चालकाने प्रसंग अवधान राखत ट्रक दुभाजकावर थांबून गाडीतून उडी मारली.

सकाळच्या सुमारास ट्रकमधून वाळू उपसून ट्रक दुभाजकावरून क्रेनच्या साह्याने खाली उतरवण्यात आला. दुभाजकावर रात्रीच्या वेळेस ट्रक्चालकांची दुसरी घटना असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दुभाजकाच्या आसपास व रस्त्याच्या कडेला कोणतेही रिफ्लेक्टर अथवा सूचनाफलक नसल्याने वाहन चालकांना दुभाजक असल्याचे लक्षात येत नसल्यामुळे याठिकाणी वारंवार अपघात घडतात संबंधितांनी रिफ्लेक्टर अथवा सूचनाफलक लावावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# अस्थिरोग संघटनेच्या चर्चासत्रात ज्येष्ठ अस्थिरोग तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन या राज्यस्तरीय अस्थिरोग तज्ज्ञांच्या संघटनेच्या १ मे या स्थापना दिनानिमित्त नाशिकमध्ये विशेष चर्चासत्र घेण्यात आले. ३ मे रोजी नाशिकमधील आयएमए हॉलमध्ये झालेल्या या चर्चासत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नाशिककरांनी ज्येष्ठ व अनुभवी अस्थिरोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले, अशी माहिती नाशिक अस्थिरोग संघटना अध्यक्ष डॉ. राजेंद्र खैरे यांनी दिली.




राज्यभर ३० एप्रिल ते ५ मेदरम्यान महाराष्ट्र ऑर्थोपेडिक सप्ताह झाला. तंदुरुस्तीतून आरोग्य ही यंदाची संकल्पना आहे. त्याद्वारे स्वतःला शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक व सामाजिक स्तरावर तंदुरुस्त ठेवून आपले आरोग्य जपण्याचा संदेश देणारे उपक्रम राबविले गेले. वयाच्या साठी व सत्तरीनंतरदेखील ऐच्छिक जीवन कसे जगावे, याबाबत नाशिकमधील नामांकित ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञांना ऐकण्याची संधी नाशिककरांना उपलब्ध झाली, असे मत कार्यक्रमाचे संकल्पक व सूत्रधार डॉ. संजय धुर्जड यांनी व्यक्त केले.

नाशिकमधील ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. विजय काकतकर, डॉ. रमेश मंत्री, डॉ. संजय गणोरकर, डॉ. मिलिंद पिंप्रीकर, डॉ. विजय नेमाडे यांनी मुलाखतीतून विचार मांडले.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील डॉक्टर, त्यांचे कुटुंबीय, ज्येष्ठ नागरिक, महिला, खेळाडू, तसेच विविध हास्य क्लब, जॉगर क्लब, सायकलिस्ट, धावपटू, जलतरणपटू, फिजिकल फिटनेस अर्कडमीचे सदस्य उपस्थित होते, असे राज्य संघटना कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत भुतडा यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वितेसाठी जिल्हा उपाध्यक्ष डॉ. रवींद्र इंगळे, सचिव डॉ. मयूर सरोदे, खजिनदार डॉ. सागर केळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास डॉ. सुनील सोनार, डॉ. सत्यजित सोनजे, डॉ. प्रशांत सोनवणे, डॉ. हर्षद आढाव व सदस्य उपस्थित होते.

पान १ वरून....

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घ्या

मात्र आता ठाकरे सरकारची ही याचिका फेटाळून लावली होती. सर्वोच्च न्यायालयाने २०२१ साली यासंदर्भात निकाल दिला होता.

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की बऱ्याचशा तक्रारी आमच्यासमोर आल्या आहेत. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर असणे आवश्यक आहे. त्यानंतर सर्व पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने विचारले की निवडणूक घेण्यास कोणाचा विरोध आहे का? तर सर्व पक्षांनी सहमती दर्शवत निवडणुका लवकरात लवकर व्हाव्यात आणि या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या माध्यमातून व्हाव्यात. कारण राज्य सरकारने त्यांचे अधिकार काढून घेतलेले आहेत, असे सांगितले.

## राज्यात आज युद्धाचे मॉकड्रिल

१९७१ मध्येही पाकिस्तानशी युद्धाचे ढग जमा झाल्यावर राज्याराज्यात मॉक ड्रील घेण्यात आले होते. जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेला ताजमहाल काळ्या कपड्याने झाकून ठेवला होता. लष्कराने आणि जिल्हा प्रशासनाने गावोगावी मॉक ड्रील घेत सराव केला होता.

हवाई हल्ल्याचा सायरन वाजल्यानंतर नागरिकांनी सर्वप्रथम घरातील सर्व लाईट बंद केले पाहिजेत. कारण लाईट सुरू राहिले तर शत्रूच्या विमानांना त्यांचे लक्ष्य सहजपणे नजरेस पडेल. घरातील लाईट बंद केल्यानंतर नागरिकांनी इमारतीमधून खाली यावे आणि पार्किंग एरियात जमावे. जेणेकरुन आजुबाजूला हवाई हल्ला झाल्यास नागरिकांना कोणतीही दुखापत होणार नाही. याशिवाय, नागरिकांनी सायरन वाजल्यानंतर इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस तातडीने बंद करावीत. जी इलेक्ट्रॉनिक उपकरणे बंद करता येत नसतील, त्यांच्यावर लक्ष ठेवावे. याशिवाय, हवाई हल्ल्यात कोणी जखमी झाले तर त्याच्यावर प्राथमिक उपचार करुन त्याला तातडीने रुग्णालयात कसे पोहोचवायचे, याचा सराव मॉकड्रीलमध्ये केला जाईल.

## चीनचा पाकिस्तानला पाठिंबा; रशिया धावला भारताच्या मदतीला

पाठिंबा दिला आहे. इराणनेही भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना संयम राखण्याचा सल्ला दिला आहे. भारत आणि पाकिस्तान यांनी चर्चेतून तोडगा काढावा, असे आवाहन केले. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची हे पाकिस्तान दौऱ्यावर आहेत. तिथे त्यांनी हे आवाहन केले. गुरूवारी (दि. ८) अराघची हे भारत दौऱ्यावर येणार आहेत. तिथे ते भारतीय नेतृत्वाशीही शांततेबाबत चर्चा करतील.

## भारताला दहशतवादाविरुद्धच्या लढाईत पूर्ण सहकार्य : अमेरिका

दर्शवणार आहे. माइकन जॉनने आपल्या भाषणात भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार संभाषणाचा उल्लेख केला आहे आणि आशा व्यक्त केली की दोन देशातील हे संबंध पुढे ही जपले जाईल. पुढे बोलताना ते गमतीत म्हणाले की, नशीब, मला टॅरिफबद्दल काही प्रश्न कोणी विचारले नाही. त्याचा मला आनंद झाला. असेही ते म्हणाले.

# पर्यटन क्षेत्रातील उद्योगांच्या विविध संधींवर चर्चासत्र

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरतर्फे पर्यटन उद्योजकता वाढीसाठी पर्यटन क्षेत्रातील उद्योजकता व संधी या विषयावर ९ मे रोजी दुपारी ४ वाजता चर्चासत्र होणार आहे. महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र विभागीय शाखा कार्यालय ४९, पाचवा मजला, बिझनेस-बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक येथे ते आयोजित केले आहे.

या चर्चासत्रात पर्यटन विभागाच्या प्रकल्प अधिकारी गायत्री साळुंके मार्गदर्शन करतील. राज्यातील पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या पर्यटन विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलाकेंद्रित पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत महिलांना पर्यटन क्षेत्रातील व्यवसाय उभारणीकरिता किंवा पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या पर्यटन प्रकल्पांना जे कर्ज दिले जाईल, त्या रकमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणिकानुसार पर्यटन संचालनायाकडून केला जाईल. पर्यटन क्षेत्राशी निगडित असलेले ४१ प्रकारचे व्यवसाय, उद्योग सुरू करण्यासाठी पर्यटन विभाग महिलांना १५ लाखांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देणार आहे. सन २०२७ मध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा व नाशिक जिल्हा व राज्याच्या पर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेऊन पर्यटन क्षेत्रात नवीन उद्योग, व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांनी निश्चितच या चर्चासत्रात सहभागी व्हावे. हे चर्चासत्र विनामूल्य आहे. ते सर्वांसाठी खुले असून, नावनोंदणी आवश्यक आहे. ०२५३-२५७७७०४ (avinashgmail.com) या नंबरवर संपर्क करावा, असे आवाहन अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, पर्यटन समितीचे चेअरमन दत्ता भालेराव, शाखा चेअरमन अंजू सिंघल, को-चेअरमन भावेश मानेक, संजय राठी, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, पर्यटन समितीचे को-चेअरमन दिग्विजय मानकर व सदस्यांनी केले आहे

## श्रेयस पेखळेचे यश

**नाशिक :** सीआयएसई बोर्डाद्वारे घेतलेल्या आयसीएसई दहावीच्या परीक्षेत श्रेयस समीर पेखळे याने



२०२५ मध्ये ९९.६ टक्के गुण मिळवून अभिमानास्पद यश संपादन केले आहे. त्याने विस्डम हाय इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याने गणित, संगणकशास्त्र, जीवशास्त्र, फ्रेंच आणि इतिहास या विषयांमध्ये शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत.


# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट अ‍ॅण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

### पाहिजेत

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १. ७५८८६६४४९१

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

### महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५.

संपर्क- 8668862801

### Name change

I, SONALI JANARDAN KADAM DECLARE THAT MY SON NAME CHANGED VIBHAV JANADHAN KADAM (OLD NAME) TO **VIBHAV JANARDAN KADAM AS** PER VIDE AFFIDAVIT NO. 35AB146592 & GAZETTE NO. (MR-24244464)

---

I, Deveshree Nandlal Shingvi, residing at Ghoti, Tal- Igatpuri, Dist- Nashik, hereby declare that my name has been mentioned as "Deveshree Nandlal Shingvi" in my old passport. However, in some documents, my name appears as **"Devshree Nandkumar Shingavi"**.

I confirm that both names refer to the same person, i.e., myself. Henceforth, I shall be known as Devshree Nandkumar Shingavi for all official and legal purposes.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस काळविनेत येते की देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील **घर नंबर १७१७/ए-२, रो-हाउस नंबर ०२, रेणुका एन्क्लेव्ह, हिल रेंज,** सदर बाजार, देवळाली हे **श्री. जाकीर असगरअली काझी** यांचे ज. मु. म्हणून **श्री. हरेश होतचंद चावला** यांच्या नावावर असून त्यांनी सदर प्रॉप्रटी रेजिस्टरड खरेदी विक्री खताद्वारे **श्रीमती प्रियंका उमेश चतुर व श्री उमेश संजय चतुर** यांना दिलेली असून **श्रीमती प्रियंका उमेश चतुर व श्री उमेश संजय चतुर** यांना सदर रजिस्टरड दस्ताद्वारे सदर प्रॉप्रटीवर आपले नाव लावण्यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे रीतसर अर्ज केलेला आहे. त्यास कोणाची हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून **३०** दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅन्टोन्मेंट बोर्ड देवळाली कॅम्प यांचेकडे लेखी स्वरुपात अथवा ई-छावणी मध्यम द्वारा तक्रार नोंदवावी, सदर मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही तक्रार व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

**अर्जदार : श्रीमती प्रियंका उमेश चतुर व श्री उमेश संजय चतुर**

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/४८०/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाज़ा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.१२/०२/२०२४

एस.आर.एन.क्रमांक NSK/33976/1860/23
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक स्वराज्याभूमी कृषी व ग्रामीण विकास संस्था,वनसगाव, ता.निफाड,जि.नाशिक बाबत।**

**न्यासाचा पत्ता :-द्वारा-,** सिंधूबाई उमाजी शिंदे, घर नं.९४, मु.पो.वनसगाव, ता.निफाड, जि.नाशिक.

**अर्जदार- सुनील उमाजी शिंदे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ७०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९-०१-२०२४ रोजी दिली.

**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

## जाहीर नोटीस

नि.७ — अ‍ॅड. ऋषिकेश सुनिल चंद्रात्रे

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.२५५/२०२५**

**मा.न्या. श्री. एच. एम. खाडे साहेब यांचे न्यायालयात**
**नाशिक येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर, नाशिक**

**१) श्रीमती. वर्षा कांतीलाल बंब**, उ.व. ६३ धंदा व्यावसायिक **२) श्री. चेतन कांतीलाल बंब** उ. व. ४०, धंदा व्यावसायिक अर्जदार क्र. १ व २ रा. मोरवाडी रोड, जैन स्थानकाजवळ एन ३२/आर-२/११-८ न्यू सिडको राणा प्रताप चौक नाशिक-४२२००९ **३) लीना कांतीलाल बंब** उ. व. ३५, धंदा :- व्यावसायिक रा. एन-३१-ए-१-३-८ विजय नगर राहुल प्रोव्हिजन स्टोअर बजरंग चौक सिडको नासिक - ४२२००९ **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** — **सामनेवाले**

ज्यापेक्षा वर अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ व ३ यांचे वडील नामे कांतीलाल चंपालाल बंब हे दि. ३१/१०/२०२३ रोजी नाशिक येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयत **कांतीलाल चंपालाल बंब** यांचे वारस आहेत. कांतीलाल चंपालाल बंब यांचे मृत्य पश्चात मिळकतीचे वर्णन :- मिळकतीचे वर्णन तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, महानगरपालिका नाशिक यांचे हद्दीतील सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित महाराष्ट्र विभागीय कार्यालय सिडको नाशिक यांचे अखत्यारीतील सिडको गृह निर्माण योजना क्र. ३ मधील मार्गशीर्ष सेक्टर मधील घर/टेनेमेंट एन-३२/आर- २/११/८ ही मिळकत. येणेप्रमाणे वरील मिळकतीचे रेकॉर्डप्रमाणे असलेली निवासी घर मिळकत यांसी चतुः सिमा मिळकत अभिलेखाप्रमाणे येणेप्रमाणे निवासी घर व बखळ जागा तदंग भूत वस्तू, जल, तरू, काष्ठ, पाषाण, निधी - निक्षेपासह घर, तळजागा, इमला, दगड, धोंडे, खिडक्या, तसेच घरास दरवाजा आहे. त्या दरवाजाने वागवहिवाटीसह सर्व दरोबस्तं त्यांच्या नावावर आहे. सदर मिळकतीस वारस दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे. सबब अर्जदारांना सदरचा वारस दाखला देण्याकामी कोणाची ही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी **दि. ०९/०६/२०२५** रोजी **सकाळी ११:०० वाजता** तत्पुर्वी स्वतः अगर निर्दिष्ट वकीलामार्फत योग्य त्या कागदपत्रानिशी हजर राहावे अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरून वारस दाखला देण्यात येईल. व योग्य ते आदेश करण्यात येतील. ही जाहीर नोटीस आज **दिनांक ०६/०५/२०२५** रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/ ककामगिरी लिपिक**
**मे.दिवाणी न्यायालय व स्तर,नाशिक**

(शिक्का)

**सही/- अधीक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय व स्तर,नाशिक**

## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी व तालुका सिन्नर पैकी कसबे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील नगरपरिषद हद्दीतील **स.नं. ८४८/१+२ व ८४९/१+२** या मिळकतीतील अंतिम मंजुर नकाशातील **प्लॉट नं. २६ ते ३३ यांसी एकुण क्षेत्र ११०४.०० चौ.मी.** यांसी बिनशेती आकार रू. १३७१-०० पैसे यावर बांधकाम केलेल्या **विनर संकुल रो हाऊसेस** या रो हाऊसेस स्किममधील **रो हाऊस नं. ०५ (पाच) यांसी बिल्टअप क्षेत्रफळ ४७.०५ चौ.मी. यांसी नगरपालिका मालमत्ता क्र. १७५४ व जुना मालमत्ता क्र. झेड६डब्ल्यू३३०११३८३** असा आहे. ही लोडबेअरींग स्लॅबची १ बेडरूम, हॉल, किचन संपुर्ण रो हाऊस मिळकत. यांसी चतु:सिमा - मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे.

वर नमुद मिळकत ही आमचे पक्षकार **श्री. भानुदास शिवराम बिन्नर व सौ. ताईबाई भानुदास बिन्नर** यांनी सदर मिळकतीचे मालक **श्री. विजय तुकाराम कहांडळ** यांचेपासुन खरेदी घेणेबाबतचा व्यवहार झालेला आहे. व सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत मालक **श्री. विजय तुकाराम कहांडळ** यांनी आमचे पक्षकार **श्री. भानुदास शिवराम बिन्नर व सौ. ताईबाई भानुदास बिन्नरयांना** सांगितलेले आहे.

सबब वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीसपत्र, अन्न, वस्त्र, वारसदार, लिज, कोर्ट हुकुमनामा, साठेखत इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ **(सात)** दिवसांचे आत मुळ कागदपत्रांसह आमचे कार्यालयात येऊन आमची खात्री पटवुन द्यावी अन्यथा सदरील मिळकत निर्वेध असल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, तदनंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. सबब सदरची जाहिर नोटीस ही आमचे पक्षकार **श्री. भानुदास शिवराम बिन्नर व सौ. ताईबाई भानुदास बिन्नर** यांचे सांगणेवरून प्रसिध्दीस. कळावे. ही जाहीर नोटीस. सिन्नर, दि. ०६/०५/२०२५. **आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे** (ॲडव्होकेट)
ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर. : ०२४१-२३२६९१४ E-Mail : dist_fed@rediffmail.com

जा. क्र. पतसंस्था फेडरेशन/७३८/सन २०२५ — दिनांक- १६/०४/२०२५

### स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम

ज्याअर्थी **ज्योती सहकारी पतसंस्था मर्या., कोपरगाव, शाखा कोपरगाव**, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि.अ.नगर यांनी खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन **मी जे. डी. काळे विशेष वसुली व विक्री अधिकारी** खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रकम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण/दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार, गहाण, दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द/निरर्थक ठरतील.

| अ.न | थकबाकीदाराचे नाव | गाव | स्थावर मिळकत: वसुली दा.रक्कम | गट नं/प्लॉट नं./मिळकत नं | क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | चतु:सीमा: पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार-मुंदडा प्रतिक श्रीकांत करिता<br>जामि-मुंदडा प्रदीप ब्रदीनारायण यांचीमिळकत | कोपरगाव | ७११५५३४/-+इतर खर्च+होणारे व्याज | १०९/१२ पैकी<br>१०९/७०/१८<br>११०/५२/२<br>११२/३९/१० | १.०४.२२ पैकी<br>४.७१.१८<br>५.८३.३२<br>८.६८.७५ | ३६.१०<br>१६३.०५<br>५८.३३<br>९६.८८ | मुळ: नकाशाप्रमाणे | | | |
| | जामि.डागा नंदकिशोर श्रीराम यांची मिळकत | | ११६/३ | ३.०० | २०७ | | | | | |
| | जामि-मुंदडा निलेश ब्रदीनारायण<br>जामि-मुंदडा अर्चना निलेश<br>जामि-डागा नंदकिशोर श्रीराम | कोपरगाव ता. कोपरगाव | | | | | | | | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रकमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रकमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर दिनांक - १६/०४/२०२५

(शिक्का)

सही/(जे. डी. काळे)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह. फेडरेशन मर्या, अ.नगर

## महत्त्वाचे



### पोलिस नाईक सुशांत मरकड यांचा फिटनेस जिमतर्फे सत्कार

**पंचवटी :** ग्रामीण पोलिस दलातील पोलिस नाईक सुशांत मरकड यांना उत्कृष्ट कर्तव्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मिळाल्याबद्दल मखमलाबाद येथील फिटनेस फर्स्ट जिमच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संदिप घुगे, अनिल माळी, मनोज बोराळे तसेच फिटनेस फर्स्ट जिमचे संचालक हेमंत साळवे, नताशा साळवे आदी उपस्थित होते.



### शाहू महाराज पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**सिडको :** सिडकोतील उत्तमनगर येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे सिडको महाविद्यालयात काल राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. कुशारे यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या वेळी उपप्राचार्य प्रा. एस. टी. घुले, क्रीडा संचालक प्रा. हेमंत काळे, कार्यालयीन अधीक्षक डी. आर. दुसाने, आबा थोरात, सोपान बिडगर यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. कुशारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून दलित, बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले. त्यांचे योगदान आजच्या पिढीसाठी प्रेरणास्थान आहे.''उपप्राचार्य प्रा. घुले यांनी देखील महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, शिक्षण व सामाजिक न्यायासाठी त्यांनी उभे केलेले तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे, असे सांगितले. या कार्यक्रमाला शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### मंगरूळ विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**मंगरुळ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यात नेमिनाथ जैन विद्यालयात बारावी सायन्स मध्ये शिकणारी कु. रोहिणी बापूराव देशमाने देणेवाडी हिने द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच नेमिनाथ जैन ( पी. डी. सुराणा) कॉलेजमध्ये बारावी कॉमर्समध्ये शिकणारी कु. साक्षी बापूराव देशमाने देणेवाडी हिने कॉलेजमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. दोन्ही विद्यार्थिनी आपल्या आदर्श नूतन माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत. विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे कार्यवाह विजय जाधव, विद्यालयाचे मुख्याध्यापक भांबर सर तसेच विजय शेळके, मनोज जाधव, बापूराव देशमाने उपस्थित होते.

### इंदिरानगर परिसरात मोटारसायकलची चोरी

**सिडको :** पाथर्डी फाटा परिसरात अज्ञात चोरट्याने एका तरुणाची दुचाकी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. फिर्यादी अंकुश नामदेव राठोड (वय ३०, रा. श्रीकृष्ण धाम अपार्टमेंट, शरयूनगर, नाशिक) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, पाथर्डी फाटा येथील ताडी विक्री केंद्राच्या मागे असलेल्या छोट्या रस्त्यावर त्यांनी आपली दुचाकी लावली होती.थोड्या वेळाने परत येऊन पाहिले असता, एचएफ डीलक्स कंपनीची लाल-काळ्या रंगाची (क्र. एमएच २२ एएच ५६७६) मोटारसायकल अज्ञात इसमाने चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस हवालदार पवार यांच्याकडे तपास सोपवण्यात आला आहे. पुढील तपास वपोनि तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

### इंद्रनगरी, कामटवाडा परिसरात घरफोडी

**सिडको :** अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत इंद्रनगरी, कामटवाडा येथील कुलस्वामिनी शिवपार्वती पार्कमधील रोहाऊस क्रमांक १ मध्ये अज्ञात चोरट्यांनी लोखंडी खिडकी फोडून प्रवेश करत तब्बल ४ लाख ५६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मंगेश वसंतराव चंद्रात्रे (वय ४४) यांनी फिर्याद दिली असून, अंबड पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी चंद्रात्रे यांच्या राहत्या घराच्या किचनच्या लोखंडी खिडकीचे गज तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लाकडी व लोखंडी कपाटे उचकून चोरट्यांनी सुमारे साडेचार लाख रुपयांचा सोने-चांदीचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक झनकसिंग घुणावत करीत आहेत. दरम्यान, कामटवाडा परिसरात घरफोडीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासनाकडून रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात यावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### नाशिकरोडला महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

**सिडको :** शहरात पुन्हा एकदा सोनसाखळी चोरीचा प्रकार घडला असून, जेलरोड परिसरातील महानगरपालिका घरपट्टी भरणा केंद्राजवळ एका महिलेच्या गळ्यातील सुमारे ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून दुचाकीवरून आलेले दोघे चोरटे पसार झाले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, या प्रकरणातील फिर्यादी अनघा दिनेश चव्हाण (वय ४५, रा. शिवरामनगर, टाकळी दसक रोड, जेलरोड) या नेहमीप्रमाणे दूध आणण्यासाठी दुकानात जात असताना, दोन अनोळखी इसम काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आले. त्यापैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीच्या गळ्यातील साडे तेरा ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओढून चोरून नेले. चोरट्यांनी मंगळसूत्र हिसकावल्यावर सैलानी बाबा, जेलरोड परिसराकडे भरधाव वेगात पलायन केले. तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# रामकाल पथसाठी महापालिकेचे भूसंपादन

## पंचवटीत राखीव जागा प्रशासन घेणार ताब्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरातील पंचवटीत केंद्र शासनाच्या पुढाकारातून रामकाल पथ हा आध्यात्मिक कॉरिडॉर उभारला जात आहे. पहिल्या टप्प्यात या प्रोजेक्टसाठी केंद्राने ६५ कोटी रुपये महापालिकेला दिले आहेत. केंद्राकडून ९९ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. उर्वरित ४५ कोटी राज्य शासनाच्या पर्यटन विभागाकडून मिळणार आहेत. या प्रोजेक्टचा आराखडा तयार करण्याचे काम गुजरातच्या एचसीपी कंपनीला दिले आहे. या संस्थेने पंचवटीत स्ट्रक्चरल ऑडिटसह इतर सर्वेक्षण केले आहे. दरम्यान, रामकाल पथसाठी वाढीव जागा आवश्यक असल्याने महापालिका प्रशासन पंचवटीतील राखीव जागेचे भूसंपादन करणार आहे.**

**येथे उपलब्ध राखीव जागा**

सीतागुंफा परिसर, काळाराम मंदिराला लागून असलेली जागा, श्रीराम उद्यान येथील जागा

**आणखी महत्त्व वाढणार**

रामकाल पथच्या माध्यमातून पौराणिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या पंचवटीचे महत्त्व वाढणार आहे. त्यामुळे या भागात भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

पंचवटीतील रामकुंड, गोदाकाठ, काळाराम मंदिर व सीतागुंफा या पौराणिक महत्त्व असलेल्या परिसरात आध्यात्मिक कॉरिडॉर तयार केला जाणार आहे. रामायणातील प्रसंगांवर आधारित शिल्प या प्रकल्पातून साकारले जाणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामासाठी २१ कोटींची निविदा बांधकाम विभागाने प्रसिद्ध केली आहे. परिसराचे ड्रोन सर्वेक्षण गरजेचे आहे. पोलिसांच्या परवानगीशिवाय शहरात ड्रोन उडवता येत नाही. त्यामुळे महापालिकेने पोलिस प्रशासनाची मंजुरी घेत रामकुंड, गोदाघाट व काळाराम मंदिर परिसराचे काही दिवसांपूर्वीच ड्रोन सर्वेक्षण पूर्ण केले.

रामकाल पथचे मॉडेल तयार करण्यासाठी एचसीपी या सल्लागार कंपनीची नियुक्ती केली आहे. या संस्थेने याआधी साबरमती रिव्हर फ्रंट, काशीविश्वनाथ कॉरिडॉर यांसारख्या मोठ्या प्रकल्पांसाठी काम केले आहे.

गोदाघाट व मंदिर परिसर, अनेक जुने वाडे, इमारती, छोटी-मोठी मंदिरे यांचे सर्वेक्षण केले. रामकाल पथ प्रकल्पांतर्गत येथे रामायणावर आधारित शिल्प उभारले जाणार आहेत. त्यास अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कॉरिडॉर साकारल्या जाणाऱ्या परिसराचे ड्रोन सर्वेक्षण करण्यात आले. ते पूर्ण झाले आहे. या प्रकल्पावर काम करताना त्याचे तीन ते चार टप्पे करण्यात आले आहेत. त्यांपैकी पहिल्या टप्प्यात २१ कोटींचे काम केले जाणार आहे. त्यासाठी काही स्थळे निश्चित करण्यात आली. आता या कामासाठी निविदाही प्रसिद्ध करण्यात आली आहे. लवकरच कामाला सुरुवात केली जाईल. महापालिकेने केंद्राकडे रामकाल पथसाठी १४२ कोटींची मागणी केली होती. त्यातील शंभर कोटींचा निधी केंद्राने मंजूर केला आहे.

## वारसहक्काच्या वादातून सख्ख्या भावाचे अपहरण?

**सिडको : विशेष प्रतिनिधी**




घरगुती प्रॉपर्टीच्या वादातून सख्ख्या भावाचे अज्ञात ठिकाणी अपहरण केल्याचा आरोप एका पित्याने आपल्या मुलावरच केला असून, याप्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील फिर्यादी रवींद्रकुमार रामलखन मौर्या (वय ६०, रा. गजवक्रनगर, अश्वमेधनगर, नाशिक) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत आपला मोठ्या मुलगा हिरालाल मौर्या (वय २८) याच्यावर आपल्या दुसरा मुलगा राज मौर्या याचे अज्ञात इसमांच्या मदतीने अपहरण केल्याचा आरोप केला आहे. फिर्यादी मौर्या यांनी सांगितले की, विवाहानंतर हिरालाल व त्याची पत्नी पूजा हे वेगळे राहू लागले होते. तेव्हापासून त्यांनी वेळोवेळी घराची व नाशिक, शिर्डी येथील मिळकतीवर वाटणीची मागणी करत वाद घालण्यास सुरुवात केली. दि. १० जानेवारी रोजी त्यांच्या गजवक्रनगर येथील घरात येऊन त्यांनी पुन्हा प्रॉपर्टीवरून वाद घातला आणि राज याला जिवे मारण्याची धमकी दिली होती. यानंतर दि. ११ जानेवारीपासून लक्ष्मी फ्लोअर मिल, नानावली, भद्रकाली, नाशिक येथे राज बेपत्ता झाला. त्याला हिरालालने कोणत्यातरी अज्ञात इसमांच्या मदतीने अपहरण करून अज्ञात ठिकाणी लपवले असावे, असा ठाम संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास सपोनि सत्यवान पवार करत असून, पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू आहे.

## गांधी तलावात बुडून युवकाचा मृत्यू

**पंचवटी : वार्ताहर**

गोदाघाट परिसरातील गांधी तलावात १७ वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. ६) दुपारी घडली आहे. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी त्यास बाहेर काढले. त्यास शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता त्यास मयत घोषित केले. बुडून बेपत्ता झालेल्या प्रणय तुषार शिराळ (१८, रा. रूम नं. ६, आशीर्वाद बिल्डिंग, देवळाली कॅम्प, नाशिक) नाव आहे. या प्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

गंगापूर धरणातून ११ मेपर्यंत अतिरिक्त एक हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्याने सुरू आहे. त्यामुळे गोदावरीच्या पाणीपातळीत वाढ होऊन ती प्रवाहित झाली आहे. दरम्यान, गोदापात्रात पाणवेली वाढली असून, प्रवाहित पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहून येत आहे. मंगळवारी (दि.६) प्रणय शिराळ हा पावणेतीन वाजता पोहण्यासाठी गोदाघाट येथे आला होता. दरम्यान, दुपारी साडेतीन ते पावणेचारच्या सुमारास पाय घसरून गोदाघाट गांधी तलाव येथे पडला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल व पंचवटी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुढील उपचारार्थ शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, त्यास मयत घोषित केले.

## नवीन घरातून ८३ हजार रुपयांचा ऐवज लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आडगाव परिसरातील कोणार्कनगर-२ येथील महादेव रो-हाउसमध्ये अज्ञात चोरट्यांनी मोठी चोरी केल्याचा प्रकार समोर आला आहे. फिर्यादी दीपाली रवींद्र पैठणकर (वय ३५) यांच्या नव्याने घेतलेल्या रो-हाउस क्र. १९ मधून ही चोरी झाली आहे. या घराचे कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करत ५५ इंची सोनी कंपनीचा एलईडी टीव्ही, चांदीच्या पूजासाहित्य वस्तू, कुकरचे तीन सेट, पितळी समया आणि भांडी, हायर कंपनीचा वॉटर फिल्टर, भारतीय सैन्यदलाच्या वर्दी, तसेच वास्तुशांतीसाठी मिळालेल्या भेटवस्तू असा एकूण सुमारे ८३ हजार रुपये किमतीच्या वस्तू चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार राकेश बनकर करीत आहेत.

## कोचिंग क्लासेस चालवणाऱ्या महिलेच्या घरात घरफोडी; २ लाख ६१ हजारांचा ऐवज लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भीमनगर येथील एका कोचिंग चालवणाऱ्या महिलेच्या घरात घुसून चक्क कुलूप तोडून अतिक्रमण करत सुमारे २ लाख ६१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी सुप्रिया साहेबराव आहिरे (वय ३२, रा. फ्लॅट नं. ०९, योगेश्वर अपार्टमेंट, भीमनगर, नाशिकरोड) ही महिला खासगी कोचिंग क्लास चालवत आहेत. फिर्यादी आहिरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार संशयित आरोपी विनोद पवार, प्रणय पगारे, अरुण पगारे व श्रुतिका पगारे यांनी घरात घुसून वरील सर्व सामान बेकायदेशीरपणे चोरून नेले.

चोरीस गेलेल्या मालामध्ये विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाइल फोन, कपाटातील कपडे, ८५,००० रुपयांची रोख रक्कम, सोन्याचे दागिने (पेंडल्स, चेन, अंगठ्या) व अन्य घरगुती वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय एमपीएससी व यूपीएससीसाठी आवश्यक असलेली पुस्तके आणि महत्त्वाची कागदपत्रेही चोरून नेण्यात आली आहेत. या गंभीर घटनेनंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, नाशिकरोड परिसरात चोरी व जबरदस्तीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी तत्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## मोटारसायकलवरील दोन चोरट्यांनी महिलेचे मंगळसूत्र ओढले

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गंगापूर रोड परिसरात पुन्हा एकदा महिलांच्या गळ्यातील दागिने ओढण्याची घटना घडली असून, यावेळी दोन अज्ञात मोटारसायकलस्वार चोरट्यांनी एका महिलेला लक्ष्य करत दोन तोळे वजनाचे मंगळसूत्र लंपास केले. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी रोहिणी पद्माकर पाटील (वय ५८, रा. ओम साई प्लॉट नं. ३५, तारवालानगर, नाशिक) या त्यांच्या नात सानवी पवार हिच्यासह बजाज ईव्ही (एम.एच.१५ के.ए.०८४४) गाडीवरून गंगापूर रोडने दिडोरी रोडकडे जात असताना ही घटना घडली.फिर्यादी पाटील केबीटी सर्कल सोडल्यानंतर स्लिपवेल गॅलरी परिसरात पोहचल्या. तेव्हाच मागून आलेल्या दुचाकीवरील दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने ओढून घेतले आणि विद्या विकास सर्कलकडे पलायन केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस निरीक्षक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली मपोनि नंदा जाधव करीत आहेत.

## हिरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश

**पंचवटी :** लोकनेते व्यंकटराव हिरे कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४/२५ च्या (एचएससी) परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा ९९.२१% तर वाणिज्य शाखेचा ९५.०५% आणि कला शाखेचा ९२.०५ % असा निकाल लागला. विज्ञान शाखेत आशिया मंजूर शेख हिने ८४.६७% गुणांसह अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर भदाणे मयुरेश सुदाम भदाणे (८४.५%) द्वितीय तर आर्यन विनोद पाटील (८३.६७%) गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत समृद्धी संजय खरे हिने ९१.१७% गुणांसह कनिष्ठ महाविद्यालयात तीनही शाखा मिळून प्रथम क्रमांक मिळविला.

## संत साहित्य काळाच्या कसोटीवर प्रेरणादायीच : न्या. चकोर

**नाशिक : प्रतिनिधी**



शास्त्रांचे निकष बदलत जातात, सिद्धांत बदलत जातात. काळाच्या कसोटीवर या अनेक गोष्टी बदलतात, मात्र संतांचे साहित्य आणि संतत्व हे प्रत्येक काळासोबत काळाच्या कसोटीवर सापेक्षतेने उतरले आहे. किंबहुना संत आणि समाज या गोष्टी समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर ते प्रेरणादायीच, असे प्रतिपादन न्यायाधीश चकोर बाविस्कर यांनी केले.

गोदाघाटावरील देवमामलेदार यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेच्या सहाव्या दिवशीच्या (ता.६ ) स्व. ॲड. द. तु. जायभावे स्मृती व्याख्यानमालेत संतांचे समकालीनत्व या विषयावर न्या. बाविस्कर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. जयंत जायभावे, सहधर्मादाय आयुक्त महावीर जोगी, ॲड. अजय तोष्णीवाल, प्रशांत देशमुख आदी उपस्थित होते.

चकोर पुढे म्हणाले की, संत ज्ञानोबा, तुकोबांची आपली वारकरी सातशे वर्षांची प्रदीर्घ परंपरा आहे. मानवी प्रवृत्ती आणि मानवी अंत:प्रेरणा यांचा प्रेरणेचा मूळ स्रोत संत साहित्य आहे.

प्रारंभी स्व. ॲड . द. तु. जायभावे यांच्या जीवनावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. न्यायाधीश चकोर बाविस्कर यांचा सत्कार ॲड. जयंत जायभावे यांनी केला.

तसेच ॲड. तोष्णीवाल यांनी न्या. चकोर यांचा परिचय करून दिला. प्रशांत देशमुख यांचा सत्कार प्रशांत निरगुडे यांनी केला. ॲड. जयंत जायभावे यांचा सत्कार अशोक महाजन यांनी केला. धर्मदाय सहआयुक्त महावीर जोगी यांचा सत्कार भूषण काळे यांनी केला.

## आनंदनगर येथे महिलेचे मंगळसूत्र चोरणाऱ्या दोघांचा शोध सुरू

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आनंदनगर परिसरात एक वृद्ध महिला आपल्या नातवाला लहान मुलांच्या सायकलवरून फिरवत असताना, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ७२ हजार रुपये किमतीची सोनसाखळी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी की, संगीता शिवदास जाधव (वय ५३ वर्षे) या महिला त्यांच्या नातवाला सायकलवर फिरवत असताना, एच.डी.एफ.सी. बँकेजवळ, आनंदनगर-शांतीपार्क रस्त्यावर दोन अनोळखी दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळ्यातील ७२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावले. सोनसाखळी चोरटे एका काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून येऊन फिर्यादीच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून चोरून नेले व चोरटे मोटारसायकलवरून भरधाव वेगाने पळून गेले. या घटनेची उपनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पुढील तपास उपनगर पोलीस करीत आहेत.

## मखमलाबाद ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९९ टक्के

**पंचवटी : वार्ताहर**



मविप्र समाजाचे श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,मखमलाबाद येथील ज्युनिअर कॉलेज एच.एस.सी. परीक्षेचा निकाल ९९ टक्के लागला आहे.

कला शाखा : साक्षी झेंड ७४.३३%, ललित डोळस ६५.६७ राधिका दिवे ६४.३३, शीतल पानडगळे ६३.८३, कोठुळे समृद्धी ६१.६७, वाणिज्य शाखा : कातड वैष्णवी ९२.८२, कोलते प्रतीक्षा ८३.००, ज्योती पिंगळे ८१.६७ टक्के, शीतल खताळ ८०.३३ टक्के, कावेरी फडोळ ७९.१७%, विज्ञान शाखा : ईशान महाजन ८०.००, नेहा शिंदे, ७९.५०, अश्विनी बर्वे ७९.५०, ओमकार काकड ७६.००, प्रतीक ढेरिंगे ७४.५०, श्रद्धा पवार ७१ टक्के. बारावीच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील, ज्युनिअर कॉलेज प्रमुख प्रा. उज्ज्वला देशमुख, प्रा. विकास थोरात, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रत्येक समस्येचे उत्तर शिवचरित्रात : नवाळे

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

शिवाजी महाराजांचे शौर्य व राजनीती, अफजलखानाचा वध, औरंगजेबाच्या कैदेतून सुटका या दोन प्रसंगांनी मराठ्यांच्या राज्याला कलाटणी मिळाली. त्यांनी स्वराज्य स्थापन केले. एवढाच त्यांचा पराक्रम लोकांच्या डोळ्यापुढे येतो, परंतु त्यापलीकडेही छत्रपतींचे कार्य महान आहे. त्यांचे प्रशासन, नियोजन, शेती, महिला या संबंधीचे चिंतन व कार्य या बाबी अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्यांच्याही मृत्यूनंतर तब्बल २७ वर्षे मराठ्यांनी विनानेतृत्वाने झुंज देत स्वराज्य राखले, ही बाब त्यांनी उभे केलेले मावळे, स्वराज्यनिष्ठा ही ढाल-तलवारी पलीकडची आहे, असे मनोगत छत्रपती संभाजीनगरचे साहित्यिक विकास नवाळे यांनी व्यक्त केले.

नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेच्या व्याख्यानमालेतील चौथे पुष्प त्यांनी ढाल-तलवार या पलीकडील छत्रपती शिवराय या विषयावर गुंफले. सेवानिवृत्त पोलिस अधिकारी रावसाहेब पोटे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शिवरायांची जयंती तीन वेळा साजरी केली जाते, असा जगातील हा एकमेव राजा होय. चारशे वर्षांनंतर त्यांच्या चरित्राचा अभ्यास केल्यास जीवनातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यातून आपल्याला मिळते. त्याकाळी घरातील माता, गोठ्यातील गाय, अंगणातील तुळस शिवरायांमुळे शाबूत राहिल्याने ते प्रत्येकाच्या मनात रुजलेले आहे. जीवाला जीव देणारे मावळे त्यांनी घडविले. त्यामुळेच दिल्लीहून सुटल्यानंतर महाराष्ट्रात परत आल्यावर अवघ्या एका महिन्यात औरंगजेबाला दिलेले २३ किल्ले त्यांनी परत जिंकले. हा त्यांचा दृढ आत्मविश्वास होता.

अफजलखानाच्या वधानंतर राजांची कीर्ती संपूर्ण भारतात पसरली आणि ते राजे म्हणून गणले जाऊ लागले. त्याचबरोबर औरंगजेबाच्या कैदेतून ते सहीसलामत सुटून स्वराज्यात आले. या दोन घटनांमुळे मराठ्यांच्या इतिहासाला कलाटणी मिळाली आणि मराठ्यांचा दबदबा वाढला. त्यांनी त्या काळात किल्ल्यांवर शौचालये बांधली. मावळ्यांना त्यांच्या मृत्यूनंतर पेन्शन दिली जात. जमिनीची मोजणी त्यांनी सुरू केली. छपाईखाना त्यांनी सुरू केला. शेतकऱ्यांना कर्जमाफीही केली. संत तुकाराम आणि शिवाजी महाराज या दोघांनीच शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. जिजाऊ आऊसाहेबांना सती जाऊ दिले नाही. राजाराम महाराज पालथे जन्माला आले तरीही त्यांनी अंधश्रद्धा जोपासली नाही. सतीची चाल त्यांच्या काळापासून बंद झाली. त्यांनी प्रत्येक किल्ल्यावर देशी वृक्ष लागवड केली. आजही वृक्षारोपण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. प्रत्येक गोष्टीचे उत्तर शिवचरित्रात बघायला मिळेल, असेही ते म्हणाले.

**नाशिकरोड वसंत व्याख्यानमाला**

## विनोदामुळे ताणतणावमुक्त जगता येते जीवन : संदीप देशपांडे

**नाशिकरोड : वार्ताहर**

सकारात्मक दृष्टीने आपण जीवनाकडे बघितल्यास आणि विनोदाचे टॉनिक घेतल्यास मनुष्य आनंदी जीवन जगू शकतो. जीवनातील अनेक घटनांत विनोद निर्माण होऊ शकतो. अर्थात त्यासाठी विनोदी वृत्ती हवी. सकारात्मक दृष्टी हवी. विनोदाच्या माध्यमातून तणावमुक्त जीवन सोपे करता येते. घराचे नाव हॅप्पी होम पण घरात मात्र मारामाऱ्या. घरात सर्व प्रकारचे सोफासेटसारखे सेट आहेत, परंतु सर्व माणसे मात्र घरात अपसेट आहेत. असे अनेक प्रकारचे विनोद कथन करत मनमाडचे कथाकथनकार उपप्राचार्य संदीप देशपांडे यांनी श्रोत्यांना हसविले.



नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेच्या वसंत व्याख्यानमालेत देशपांडे यांनी विनोदाच्या गावा जावे या विषयावर पाचवे पुष्प गुंफले. नंदन बूब अध्यक्षस्थानी होते. त्यांनी विनोदाचे विविध प्रकार कथन केले. त्यात प्रसंगनिष्ठ विनोद, कल्पनानिष्ठ विनोद, स्वभावनिष्ठ विनोद, शब्दनिष्ठ विनोद, अतिशयोक्ती विनोद, कारुण्यातील विनोद असे विनोदाचे प्रकार सांगून विसंगतीतूनही विनोद घडू शकतो तसेच व्यंगावरही विनोद होतात, पण तसे करणे योग्य नाही. विनोदामुळे एखादा मनुष्य दु:खी होत असेल तर जे उचित नाही. उलट ताण जाण्यासाठी, दु:ख कमी होण्यासाठी विनोदाची गरज असते. कंपनीचा नारळ फुटला, पण कंपनी कधी फुटणार? अशातून हास्य निर्माण होऊ शकते. पोलीस माणसांच्या बंदोबस्तासाठी असतात परंतु आज पोलिसांनाच बंदोबस्त द्यावा लागतो आहे, अशा सामाजिक परिस्थितीवरही त्यांनी ताशेरे ओढले. सुसंगतीतून विसंगती ऐकल्यास हसू येते. वैद्यकीय क्षेत्रातही विनोद घडू शकतात तसेच शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रातीलही अनेक विनोद देशपांडे यांनी सांगितले. विनोद टिपण्याची फक्त दृष्टी हवी असते. जीवनाकडे विनोदाने बघितल्यास जगणे सुसह्य होईल. मिश्किलपणे जीवनात सदैव चैतन्य राहील, असेही ते शेवटी म्हणाले. स्व. उत्तमचंदजी चोरडिया स्मरणार्थ बक्षिसाचे एकनाथ लडे, जगदीश कलंत्री, आरक्षा मुठाळ हे विजेते ठरले.

## महत्त्वाचे

### कै. बी. जी. काबरा महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा १०० टक्के निकाल





**मालेगाव :** येथील राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै. बी. जी. काबरा विज्ञान आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचा सन २०२४-२५ चा निकाल सलग ६ व्या वर्षी १०० टक्के लागला. यात विज्ञान शाखा : प्रथम समृद्धी तापडिया (९०.८३), द्वितीय अथर्व झंवर (८९.८३), तृतीय : व्यंकटेश येवले (८९.५०) तर वाणिज्य शाखेत प्रथम : तन्वी पटणी (९६.५०), द्वितीय पूर्वा बाफना (९४) आणि तृतीय दिशा मुंदडा (९३.८३). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य राहुल घरटे आणि प्राध्यापकवृंदांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष रघुवीर पाटोदिया, चेअरमन ओमप्रकाश सारडा, गोविंद नारायण तोतला, अशोक राणासरिया, व्यंकटेश जाजू, महेशकुमार बंग, महेंद्रकुमार मोदी, सुनील शर्मा, पंकज बडाळे, कौशल काबरा, अतुल लोया, योगेश पारीख, मुख्याध्यापक नितीन हिरे, मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



### 'मसगा'ची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

**मालेगाव :** येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कनिष्ठ महाविद्यालयाने उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेचा ९९.५०, वाणिज्य शाखेचा ९७.४१ टक्के तर कला शाखेचा ८१.६५ टक्के निकाल लागला. महाविद्यालयाचा निकाल ९५.०२ लागला. विज्ञान शाखेत प्रथम ऋतुजा आहिरे, द्वितीय प्रियल गुंजाळ, प्राजक्ता शेवाळे, वाणिज्य शाखेत प्रथम छाया पगार, गुंजन छाजेड, महेश पाटील, तर कला शाखेत भक्ती सावळे, वैभव खेडकर, विद्या पवार हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. तसेच एच. एस.सी. व्होकेशनल अंजली माळी प्रथम आली. गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, उपप्राचार्य मिलिंद कुलकर्णी, प्रा. अजिंक्य ठाकरे, पर्यवेक्षक रवींद्र मोरे, प्रा. दीपक सूर्यवंशी, प्रा. अजय ठाकरे, प्रा. किरण खैरनार, प्रा. विजय देवरे प्रा. मिलिंद पवार, भाऊसाहेब पवार यांनी कौतुक केले.

### सोयगाव महाविद्यालयाचे यश

**मालेगाव :** मविप्र संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ





सोयगाव महाविद्यालयाचा इयत्ता बारावी वाणिज्य व विज्ञान वर्गाचा १०० टक्के निकाल लागला. वाणिज्य शाखेत प्रथम नयन भगत (८५.६७), द्वितीय हर्षदा सोलंकी (८०.८३), तृतीय पूर्वा पाटील (७९.५०), तसेच विज्ञान शाखेत प्रथम मयूर पानपाटील (७७.५०), द्वितीय अंश डावरे (७७), तृतीय अच्युत गरुड (७६) उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, तालुका संचालक ॲड. आर. के. बच्छाव, प्राचार्य डॉ. एच. एम. क्षीरसागर, उपप्रचार्य डॉ. मनोज जगताप, ग्रंथपाल डॉ. अरुण पठाडे, प्रा. जी. एस. गांगुर्डे, प्रा. एन. बी. शेवाळे, प्रा. एस. बी. गायकवाड, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. एस. डी. पाटील, प्रा. ए. एस. सूर्यवंशी प्रा. वाय. आर. ठाकरे, प्रा. व्ही. वाय. शिरसाठ, प्रा. व्ही. बी. अहिरराव, प्रा. आर. एस. ठाकरे, प्रा. एच. एन. सोनवणे, अश्विनी देशमुख, कार्यालयीन अधीक्षक एन. एस. पाटील, कनिष्ठ लिपिक एस. ए. मोरे, बी. के. पाटील यांनी कौतुक केले.

### आरती घोडेला आयटीत १०० गुण

**लासलगाव :** फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या एच.एस.सी. बोर्डाच्या बारावीच्या परीक्षेत नूतन विद्या प्रसारक मंडळ लासलगाव



महाविद्यालयातील आरती ज्ञानेश्वर घोडे हिला आयटी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले. तिच्या या यशाबद्दल तिचे विषय शिक्षक प्रा. डी. सी. चव्हाण तसेच नू.वि.प्र. संस्थेचे चेअरमन प्रकाश पाटील, संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर, खजिनदार अनिल डागा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे, उपप्राचार्य प्रा. भूषण हिरे, डॉ. सोमनाथ आरोटे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक उज्ज्वल शेलार, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### नाईक महाविद्यालयाची परंपरा कायम

**दिंडोरी :** बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक संस्था संचलित दिंडोरी येथील कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी गुणवत्ता कायम ठेवत विज्ञान शाखेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली. विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के, कला शाखेचा ९३.३९, तर वाणिज्य शाखेचा ८९.४७ टक्के निकाल लागला. यामध्ये कला शाखेत लखन दगडू गांगोडे ७१ टक्के, प्रकाश भास्कर गांगोडे ७०.८३, ललिता युवराज गायकवाड ६८.१७, मनीषा सोमनाथ गायकवाड ६७.८३, खुशाली तुषार खरकुटे ६७.६७ तसेच वाणिज्य शाखेत बळीराम चंदना विश्वनाथ ७४.१७, दिगंबर रामदास वटाणे ६७.५०, पूनम लक्ष्मण घाटोळ ६६.६७, खुशाली रामदास बेंडकुळे ६६.१७, समीर जनार्दन राऊत ६६.१७, धनश्री गोपीनाथ भगरे ६४.८३ टक्के. विज्ञान शाखेत रमेश पुंडलिक गवळी ७६.८३, प्रदीप कृष्णा थैल ७६.८३, देवेंद्र भाऊसाहेब लाड ७५, लतिका ज्योतमल चव्हाण ७२.६७, सोनल रमण दळवी ७२.६७, राऊत नवनाथ नामदेव ७२, राऊत प्रमिला देवीदास ७१ टक्के या विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले.

## निधन वार्ता

### इंदुबाई बोराडे



**कसबे-सुकेणे** कोकणगाव (ता. निफाड) येथील इंदुबाई त्र्यंबक बोराडे (९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी व शेतकरी संघटनेचे क्रियाशील कार्यकर्ते सोमनाथ बोराडे यांच्या त्या मातोश्री होत.



### कृष्णाबाई उंदिरवाडकर

**नाशिक :** श्रीमती कृष्णाबाई पंडित उंदिरवाडकर (९७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, सुना, नातवंडे व पणतू असा परिवार आहे.

# शेतीची कामे करत स्वाती केंद्रात प्रथम

## सावरगावच्या विद्यार्थिनींची बाजी, शाळेचा निकाल ९३.३३ टक्के

**येवला : प्रतिनिधी**

**अकरावीला असताना वडिलांचे छत्र हरवले. घरी बेताचीच परिस्थिती, मात्र आई आणि भावाच्या खांद्याला खांदा लावून शेतात कांदे लागवडीपासून तर सर्व कामे करत सावरगाव विद्यालयातील स्वाती कांबळे हिने केंद्र व विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, मोठा भाऊ गौरव रोज कामाच्या व्यापातून वेळ काढत स्वातीला सावरगाव येथे विद्यालयात मोटारसायकलवर आणून सोडायचा आणि घ्यायला यायचा...भावाच्या याच कष्टाची जाणीव ठेवत तिने मिळविलेले यश आदर्शवत मानले जात आहे.**

सावरगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक व एम. जी. पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९३.३३ टक्के लागला. अतिशय प्रतिकूलतेवर मात करत शेतीकामाला मदत करतानाच नियमितपणे अभ्यासाची जबाबदारीही निभावत स्वातीने सर्वाधिक ८५.५० टक्के गुण मिळवत नगरसूल केंद्रात कला शाखेत प्रथम येण्याचा, तर तालुक्यात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आजही शाळा सुटली की, शेतात जाऊन कांदे लागवडीपासून ते काढणीपर्यंत आणि पाणी देण्यापासून तर स्वयंपाकापर्यंतची सर्वच कामे पार पाडावी लागतात. मात्र जिद्द, शिकण्याची उमेद आणि अभ्यासाची तळमळ असली की यश नक्की मिळते. हे ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थिनींनी दाखवले. वर्षभर कॉलेज करून रोज शेतीकामात आई-वडिलांना मदतीचा हात देतानाच कधी पायी तर कधी सायकलवर शाळेत येत सावरगाव विद्यालयाच्या विद्यार्थिनी टॉपर आल्या असून, पहिले पाच क्रमांक विद्यार्थिनींनीच मिळविले आहे. विद्यालयातील रूपाली लोखंडे (७९.८३ टक्के) द्वितीय, प्राजक्ता कांबळे (७९ टक्के) तृतीय, पूनम लोखंडे (७५.१७ टक्के) चतुर्थ तर अंकिता गायकवाड (७४.६७ टक्के) हिने पाचवा क्रमांक मिळवला. विशेष म्हणजे, कुटुंबाची जबाबदारी पेलताना आई-वडिलांच्या खांद्याला खांदा लावून या मुलींनी कधी शेतीची तर कधी घरची जबाबदारी पेलत हे यश त्यांनी मिळविले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे जनरल सेक्रेटरी प्रमोद पाटील, सहसचिव प्रवीण पाटील, संभाजीराजे पवार, माजी सरपंच प्रसाद पाटील, अक्षय पाटील, प्राचार्य डी. बी. नागरे, पर्यवेक्षक सविता सौंदाणे आदींसह शिक्षकांनी अभिनंदन केले.

> विद्यार्थ्यांची हलाखीची परिस्थिती असली तरी अशा स्थितीतही ज्ञानदानाचे पवित्र कार्य आमच्या शिक्षकांनी जपले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी होतकरू असल्याने त्यांची तयारी करून घेतली जाते. गुणवंत विद्यार्थ्यांमुळे विद्यालयाचा नावलौकिक झाला असून, यामुळे पालकांची प्रवेशासाठी विद्यालयाला पसंती मिळते.
> **-प्रमोद पाटील,** जनरल सेक्रेटरी, शिक्षण प्रसारक मंडळ, नगरसूल



## चांदवडच्या सुराणा कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९७ टक्के



**चांदवड : वार्ताहर**

श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संस्थेच्या श्रीमान पी. डी. सुराणा कनिष्ठ महाविद्यालयाने बारावी परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले. यंदाचा निकाल ९७ टक्के लागला, अशी माहिती प्राचार्य डॉ. डी. एन. शिंपी यांनी दिली. यंदाही उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली.

वाणिज्य शाखेत अनिकेत भारत सोनवणे या विद्यार्थ्याने ८८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेत यश पोपट मांदळे याने ८३.५० टक्के गुणांसह प्रथम, चैतन्य हरिभाऊ देशमाने याने ७५.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर तेजस्विनी शरद मांदळे हिने ७६.६७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत साक्षी बापूराव देशमाने हिने ८३.३३ टक्के गुणांसह द्वितीय तर मयुरी लक्ष्मण भुरे हिने ८०.८३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. कला शाखेत सिद्धी भाऊसाहेब जाधव हिने ८५.३३ टक्के गुणांसह प्रथम, नम्रता मांगीलाल भवर हिने ८०.८३ टक्के गुणांसह द्वितीय तर सोनाली ज्ञानेश्वर जाधव हिने ७९.५० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त समितीचे अध्यक्ष बेबीलाल संचेती, उपाध्यक्ष दिनेशकुमार लोढा, प्रबंध समितीचे अध्यक्ष अजितकुमार सुराणा, उपाध्यक्ष अरविंद भन्साळी, सचिव जवाहरलाल आबड, समितीचे सदस्य व महाविद्यालयाचे समन्वयक कांतीलाल बाफना, सीए महावीरचंद पारख, सीए अक्षयकुमार भंडारी, प्राचार्य डॉ. डी. एन. शिंपी, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी पी. पी. गाळणकर, उपप्राचार्य वाय. एस. पाटील, कार्यालयीन अधीक्षक संदेश बुरड आदींनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## श्री महावीर कनिष्ठ महाविद्यालयाची धवल यशाची परंपरा कायम



**लासलगाव : वार्ताहर**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा (इ.१२ वी ) निकाल जाहीर करण्यात आला. यात श्री महावीर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन करून कनिष्ठ महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली.

कनिष्ठ महाविद्यालयाचा शाखानिहाय निकाल व प्रथम तीन क्रमांकांचे मानकरी पुढीलप्रमाणे : विज्ञान शाखा- निकाल १०० टक्के प्रथम तीन क्रमांक महेश राहुल बच्छाव ८७.५० टक्के, मानसी सुनील मेधणे ८५.१७ टक्के, खुशी अतुल अत्तरदे ८३.६७ टक्के. वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला. पहिल्या तीन क्रमांकांत कोटकर वेदिका विजय ८५.६७ टक्के, बकरे वैशाली दत्तात्रेय ८२.५० टक्के, पालवे गीता संतोष ७६ टक्के. कला शाखेचा निकाल ९२.६४ टक्के लागला. त्यात प्रथम तीन क्रमांक शिंगाडे साक्षी संजय ७७.३३ टक्के, हिरे श्रद्धा प्रवीण ७३.१७ टक्के, लोखंडे योगेश ज्ञानेश्वर ७१.८३ टक्के.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व मार्गदर्शक शिक्षक व शिक्षिकांचे संस्थेचे कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रह्मेचा, मानद सचिव शांतीलाल जैन, खजिनदार अजय ब्रह्मेचा, संचालक मोहनलाल बरडीया, महावीर चोपडा, अमित जैन, सुनील आब्बड व संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रह्मेचा आणि प्राचार्या पल्लवी चव्हाणके, पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ तसेच सर्व शिक्षक -शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



## एचएएल कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९९.३५ टक्के

**ओझर : वार्ताहर**

येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एच.ए.एल. कनिष्ठ महाविद्यालयाचा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९९.३५ टक्के लागला. परीक्षेसाठी एकूण ३०९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

यावर्षीही गुणात्मक दर्जा कायम ठेवत उज्ज्वल यशाची परंपरा राखली. विद्यालयातून विज्ञान शाखेतून २२७ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सर्व २२७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला. वाणिज्य शाखेत परीक्षेसाठी ५२ विद्यार्थी प्रविष्ट होते, त्यापैकी ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा ९६. १७ टक्के लागला. एच.एस सी. व्होकेशनल विभागात ३० विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होते. त्यापैकी सर्व ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एचएससी व्होकेशनलचा निकाल १०० टक्के लागला. विज्ञान शाखेतून रोहित रामदास चव्हाण ९५.६७ टक्के गुण मिळवून प्रथम आला. वाणिज्य विभागामधून प्रांजल संजय काळे ९२.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आली. एच.एस. सी. व्होकेशनल विभागात योगेश भाऊसाहेब पवार ६३.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सचिव डॉ.दीप्ती देशपांडे, अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे, सचिव डॉ. राम कुलकर्णी आदींनी कौतुक केले.

## ओझर महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९६ टक्के

**ओझर : वार्ताहर**

मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या ओझर महाविद्यालयातील बारावी बोर्ड परीक्षेत महाविद्यालयाचा निकाल ९६ टक्के लागला. त्यात विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून, कला शाखेचा ९२.३० टक्के, वाणिज्य शाखेचा ९७.९३ टक्के, एचएसव्हीसी शाखेचा निकाल ९०.६९ टक्के लागला.

विज्ञान शाखेत राम अरुण संगमनेरे याने ८३.१७ टक्के, चैतन्य किरण गोसावी ८३.१७ टक्के या दोन्ही विद्यार्थ्यांनी समान गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. अनुराज श्रावण दवंगे याने ८२.३३% गुण मिळवून द्वितीय, तर अगस्त तुषार टर्ले याने ८२ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

कला शाखेत मिसाळ रामदास हरिनाम याने ७४.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. आशिष किशोर गांगुर्डे याने ७०.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर अन्नपूर्णा अनुप त्रिपाठी हिने ६८.५७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

वाणिज्य शाखेत ओम ज्ञानेश्वर चोथे याने ८३.६७ टक्के गुण मिळून प्रथम क्रमांक मिळविला. निकिता संतोष ढिकले हिने ८३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर सोहम अनिल गायकवाड याने ८२ टक्के गुण मिळून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

एचएसव्हीसी शाखेमध्ये प्रथम क्रमांक वेदांत प्रशांत शेजवळ ७४.५० टक्के, द्वितीय प्रसाद दिनकर ढिकले ७२.५० टक्के, तर तृतीय ऋषिकेश बाळू ढिकले ७२.१७ टक्के गुण मिळविले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी. लोखंडे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर कदम, कनिष्ठ विभागप्रमुख बाळासाहेब शिंदे, परीक्षा विभागप्रमुख प्रा. ए. टी. टर्ले, सर्व शाखांमधील प्राध्यापक आदींनी अभिनंदन केले.

## कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालयाचा निकाल ९५.४३ टक्के

**देवळा : प्रतिनिधी**

येथील कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९५.४३ टक्के लागला. कला शाखेत १६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

शेकडा निकाल ९३.७५ टक्के लागला. वाणिज्य शाखेत ६२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यात ६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शेकडा निकाल ९८.३९ टक्के लागला. विज्ञान शाखेत २५४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शेकडा निकाल ९९.६१ टक्के लागला. तर किमान कौशल विभागात १० पैकी ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

तिन्ही शाखांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले विद्यार्थी :

कला शाखा : प्रथम - अश्विनी पगार ७४.८३ टक्के, द्वितीय - नेहा सावंत ७४.५०, तृतीय : हर्षाली चव्हाण ७३.८३.

विज्ञान शाखा : प्रथम - रोशन भदाणे ८४.३३, द्वितीय -यश सूर्यवंशी ८३.८३, तृतीय - अपूर्व पाटील ७९.३३ वाणिज्य : प्रथम- मयुरी पवार ८०.८३, द्वितीय - यश पाटील ८०.१७, तृतीय- कोमल पाटील ७९.३३ किमान कौशल्य : प्रथम - वैष्णव परदेशी ७३.६७, द्वितीय - ज्योती आहेर ६३.८३, तृतीय - स्नेहल शेवाळे ६२.५०.

विशेष यश मिळविणाऱ्या व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर, संस्थेच्या सचिव प्रो. डॉ. मालती आहेर, प्रशासनाधिकारी प्रा. बापू रौंदळ, उपप्राचार्य आर. एन. निकम, पर्यवेक्षिका एन. वाय. पाटील, डॉ. जयवंत भदाणे, डॉ. डी. के. आहेर, प्रबंधक दिनेश वाघमारे, प्रा. जे. पी. बोरसे, प्रा. डी. एस. पाटील, प्रा. ए. एस. गुजरे, प्रा. विष्णू केदारे, प्रा. दीपक पवार, प्रा. यू. के. शेळके, प्रा. एस. एस. निकम, प्रा. एस. एन. निकम, प्रा. डॉ. सरिता कुंदे, प्रा. ए. एस. मेणे प्रा. बी. व्ही. तुपे, प्रा. सोनजे, प्रा. रजत आहेर, प्रा. बच्छाव, प्रा. सुशांत भदाणे, प्रा. तुषार देवरे, शाहू बहिरम आदींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## पिंपळगावला बारावीतील गुणवंतांचा सत्कार

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**

कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव ब. या विद्यालयाचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल सोमवार दि. ५ मे रोजी ऑनलाइन जाहीर झाला. यामध्ये विज्ञान विभागाचा १०० टक्के, वाणिज्य विभागाचा ९८.९८ टक्के, कला विभागाचा ९५.८४ टक्के व किमान कौशल्य विभागाचा ९६.९१ टक्के निकाल लागला आहे.

एचएससी बोर्डाचा निकाल जाहीर झाल्यानंतर मविप्र समाज संस्थेचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे व स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, उपप्राचार्य दिलीप माळोदे यांच्या हस्ते वाणिज्य विभागात व्यवहारे अथर्व हेमराज (प्रथम ९०.१७), नगरकर वेदिका योगेश (प्रथम ९०.१७), खान यास्मिन खतून अब्दुल रहमान (द्वितीय ८८.५०), जाधव ईश्वरी तानाजी (तृतीय ८८.३३), विज्ञान विभागात कोल्हे शिवानी संतोष (प्रथम ८५), गोडसे समीक्षा योगराज (द्वितीय ८३.१७%), चिंचोले ऋतुजा सुनील (तृतीय ८२.१७%) यांचा सत्कार करण्यात आला.

# विंचूर ज्युनिअर कॉलेजचे यश



**विंचूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या फेब्रुवारी/ मार्च २०२५ मध्ये बारावीच्या परीक्षेत येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय कला व विज्ञान कनिष्ठ विद्यालयाने उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली.

एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल शेकडा १०० टक्के लागला. विज्ञान शाखेतून १९१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सर्वच १९१ उत्तीर्ण झाले. यामध्ये चार विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले, तर १४२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ४५ द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेत आरती शरद दरेकर हिने ४५६ गुणांसह ७६ टक्के मिळवून विद्यालयात प्रथम, समृद्धी संजय जोशी व श्रेया भाऊसाहेब तासकर या दोघींनी ७५.१७ टक्के गुण मिळवत संयुक्तरीत्या द्वितीय क्रमांक पटकावला. रोहित देवीदास जाधव याने ४५० गुणांसह ७५ टक्के मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

कला शाखेचा निकाल ९७.७४ टक्के लागला. कला शाखेचे एकूण १२५ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले. त्यापैकी १२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यातील पाच विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य, ६८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ४० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर सहा विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणी मिळवली.

कला शाखेत पूजा भाऊसाहेब सोमासे ४७४ गुणांसह ७९ टक्के मिळवत प्रथम क्रमांक मिळविला, तर श्वेता हरिभाऊ म्हसकर हिने ४७१ गुणांसह ७८.५० टक्के मिळवत द्वितीय, तर प्रियंका बाळासाहेब म्हाळशिकारे हिने ४६९ गुणांसह ७८.१७ टक्के मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षकांचे रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन भगीरथ शिंदे, जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजित गुंजाळ, उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुनील मालपाणी, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष पंढरीनाथ दरेकर, उपाध्यक्ष कैलास सोनवणे, सदस्य जगदीश जेऊघाले, बाळकिसन मालपाणी, गंगाधर जेऊघाले,अनिल दरेकर, विद्यालयाचे प्राचार्य एन. ई. देवढे, उपप्राचार्य एस. एम. वाबळे, पर्यवेक्षक एस. टी. माळी, के. जी. जोपळे, आर. के. चांदे, आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## वैनतेय विद्यालयाचे सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

येथील वैनतेय विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली. परीक्षेसाठी १५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले. यापैकी सर्व १५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष प्रावीण्यात ९४, प्रथम श्रेणीत ६०, द्वितीय श्रेणी २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महाविद्यालयात प्रथम पाच आलेले गुणवंत विद्यार्थी असे- प्रथम-तनय जैन -९०.३३ टक्के, द्वितीय - पूजा कदम- ८८.३३, तृतीय -संस्कृती राठी- ८८.१७, चतुर्थ -वैभव गंभीरे- ८७.८३%, पाचवा -योगेश सानप- ८६.८३%. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त ॲड. ल. जि. उगावकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत आदींनी अभिनंदन केले.



## सटाणा महाविद्यालयाचा ९७ टक्के निकाल

**सटाणा : प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित येथील कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा ९७ टक्के निकाल जाहीर झाला. मुलांच्या तुलनेत मुलींनीच विशेष यश मिळविले, अशी माहिती प्राचार्य डॉ. कृष्णा गायकवाड यांनी दिली.

विज्ञान शाखेचा १०० टक्के, कला शाखेचा ८८.८९, वाणिज्य शाखेचा ९९.११, तर उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचा निकाल १०० टक्के असून, विज्ञान शाखेत सर्व ३४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेत शिवानी मिलिंद बागूल हिने ८३.३३% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. वाणिज्य शाखेत वैष्णवी शरद अंधारे हिने ९१.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. कला शाखेत मयुरेश भाऊसाहेब बिरारी याने ८.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम शाखेत प्रदीप बाळू कांबळे याने ७८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, महिला संचालिका शालनताई सोनवणे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष ॲड. पंडितराव भदाणे, भिका सोनवणे, प्रल्हाद सोनवणे, प्राचार्य डॉ. कृष्णा गायकवाड, उपप्राचार्य डॉ. नरेंद्र निकम, केंद्रसंचालक प्रा. प्रफुल्ल ठाकरे, प्रा. राहुल सोनवणे, प्रा. सुनील बागूल आदींनी अभिनंदन केले.

## महत्त्वाचे

### एस.जी. पब्लिक स्कूल-ज्युनिअर कॉलेजचा निकाल शंभर टक्के

सिन्नर : येथील माध्यमिक लोकशिक्षण मंडळ सिन्नर संचालित एस. जी. पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा एचएससीचा विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के, तर कला शाखेचा ९७.४३% निकाल लागला. कला शाखेतून कडलग सलोनी राजेंद्र- ७२.८३% (प्रथम), जाधव समीक्षा बाळू ७२.१७% (द्वितीय), डामसे उमेश शांताराम ६५.८३% (तृतीय), सानप अर्चना राजाराम ६५.३३% (चतुर्थ), थोरात श्रेयस दत्तात्रय ६४.०५% (पाचवा). वाणिज्य शाखेतून वळवी चाँदनी दिलवरसिंग ८५.००% (प्रथम), अनवट वैष्णवी सुनील ७५.५०% (द्वितीय), खोजे ऋतुजा गोरख (७५.१७%) (तृतीय), सोनवणे अंजली दीपक (७२.००%, चतुर्थ), गोळेसर पायल मारुती. ७२.००% (पाचवा). विज्ञान शाखेतून चौधरी आर्शिन सलीम ६७.८३% (प्रथम), चौधरी तनिष्का नारायण ६५.३५% (द्वितीय), मोरे ओम प्रकाश ६५.००% (तृतीय), शिंदे आदित्य दीपक. ६३.६७% (चतुर्थ), शिरसाट स्वामिनी तुकाराम ६२.८३% (पाचवा) उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे माध्यमिक लोकशिक्षण मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब गडाख, उपाध्यक्ष दौलतराव मोगल, ज्येष्ठ संचालक विजय गडाख, सीईओ अभिषेक गडाख, प्राचार्य एस. एल. चौधरी आदींसह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### पंचाळे विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

**सिन्नर :** तालुक्यातील पंचाळे येथील सिन्नर भूषण सूर्यभानजी गडाख उच्च माध्यमिक विद्यालयाचा एचएससीचा निकाल १०० टक्के लागला. या केंद्रात एकूण ३८० विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. पैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयात एकूण २०९ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झालेले होते. कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखांचा निकाल शंभर टक्के लागेला आहे. विज्ञान शाखेतील प्रथम तीन विद्यार्थी चव्हाण आर्यन कल्पेश (८१.६७%) सोनवणे प्राजक्ता अण्णासाहेब (७३.८३%), सोनवणे जान्हवी रवींद्र (७२.३३%). कला शाखेतील प्रथम तीन विद्यार्थी- सपना प्रमिला गजिराम (६८.६७%), शिंदे ऋतुजा बाळू (६८.५०%), डुंबरे शुभम सुनील (६४.६७%). वाणिज्य शाखेतील प्रथम तीन विद्यार्थी- म्हस्के स्वामिनी विक्रम (८१.००%), कोल्हे तृप्ती विलास (७८.००%), डोंगरे सोनाली बाळू (७५.५०%) उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे माध्यमिक लोकशिक्षण मंडळाचे सेक्रेटरी राजेश गडाख, प्राचार्य विलास पवार, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रमुख प्रवीण शेलार, प्राथमिकचे मुख्याध्यापक नवनाथ थोरात, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गडाख व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### नवजीवन कॉलेजचा निकाल शंभर टक्के

**सिन्नर :** येथील नवजीवन कॉलेज ऑफ सायन्स उच्च माध्यमिक शालांत परीक्षा २०२४-२५ शैक्षणिक वर्षाचा निकाल १०० % लागला. या परीक्षेत १०३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. ते सर्व उत्तीर्ण झाले आहेत. श्वेता सुबल मंडल-७२.६७% (प्रथम), आकांक्षा रवींद्र शिंगोकार -७१.१५% (द्वितीय), कांचन तुळशीराम बोडके- ६९.६७% (तृतीय) क्रमांक पटकावले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे ट्रस्टी सुभाष देशमुख, चेअरप्रमुख विजयाताई देशमुख, मंगल पवार, काळे सर, प्राचार्य बी. बी. पाटील, अनिता सूर्यवंशी, वृषाली लोंढे, योगिता भाटजिरे, नरेंद्र वाघ, अरुण चव्हाणके, प्रशांत साळी, अंकुश कराड आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे बैठक

**सिडको** : छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखिल भारतीय मराठा महासंघ नाशिकच्या वतीने गंगापूर रोडवरील उदोजी मराठा बोर्डिंग येथे अभिवादन कार्यक्रम झाला. कार्यक्रमानंतर हॉटेल एसएसके, गंगापूर रोड येथे महासंघाच्या नाशिक जिल्हा पातळीवरील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत महासंघाच्या नाशिकमधील स्थायी कार्यालयाच्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. भविष्यातील कार्यप्रणाली, संघटन बळकटीकरण आणि कार्यालय व्यवस्थापनाच्या दृष्टीने निर्णय घेण्यावर भर देण्यात आला. या बैठकीस महासंघाचे प्रमुख पदाधिकारी चंद्रकांत बनकर, व्यंकटेश मोरे, राजेंद्र शेळके, संजय फडोळ, सागर कातड, रमेश खापरे, बारकू कोशिरे, गौरव गाजरे, अक्षय अनवट, अनिता भामरे, महेश भामरे आदी मान्यवर उपस्थित होते.



### त्र्यंबकराव गायकवाड यांचे अभीष्टचिंतन

**नाशिकरोड :** सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार, धार्मिक, अध्यात्मिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू त्र्यंबकराव गायकवाड यांचा वाढदिवस विविध संस्थांनी उत्साहात साजरा केला. नवनाथ ग्रुपचे अध्यक्ष अंबादास गवळी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष मनोहर कोरडे, व्यापारी बँकेचे माजी उपाध्यक्ष भाईजान बाटलीवाला व अय्यास शेख यांनी हा अभीष्टचिंतन सोहळा घडवून आणला होता. त्र्यंबकराव गायकवाड प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेवर विश्वस्त, आळंदीच्या वै. जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विश्वस्त आहेत. त्र्यंबकेश्वरच्या श्री निवृत्तिनाथ महाराज समाधी संस्थानचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. देवळालीगाव निवृत्तिनाथ सत्संग सेवा मंडळाचे अध्यक्ष होते.

### यंदा मेच्या मध्यावरच मॉन्सूनची चाहूल

**सिन्नर :** नैऋत्य मॉन्सून म्हणजेच भारतीय मॉन्सून विषुववृत्त समांतर, पूर्वे कडून पश्चिमेकडे, प्रशांत महासागरीय प्रवास करत, मलेशिया, सिंगापूर, सुमात्रा बेटाचा उत्तरेकडील भाग ओलांडून भारताच्या अंदमान व निकोबार बेटांच्या दक्षिणेकडील आग्नेय बंगालच्या उपसागरात म्हणजे १० डिग्री उत्तर अक्षवृत्त व १०० डिग्री पूर्व रेखावृत्त दरम्यान मजल-दरमजल करत येत्या आठच दिवसात म्हणजे १३ मेदरम्यान पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचा अंदाज निवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला आहे. भारत महासागरीय परिक्षेत्रात मान्सून प्रवेशला तरी भारत भू-भागावर म्हणजे केरळात व त्यानंतर सह्याद्री ओलांडून महाराष्ट्रात येण्यासाठी बराच कालावधी लोटला जातो.

# मनमाडला भारत पेट्रोलियमच्या पाइपलाइनमधून इंधन चोरी

**मनमाड : आमिन शेख**

**चोरी करणारे चोर विविध शक्कल लढवून चोरी करत असतात. चोरीचे प्रकार ऐकून कधीकधी हसायलाही येते. मनमाडलादेखील असाच एक चोरीचा प्रकार समोर आला असून, भारत पेट्रोलियम कंपनीच्या मुंबई ते मनमाड या पाइपलाइनला थेट टॅप करून नळ कनेक्शन करतो त्याप्रमाणे थेट पाइपलाइन द्वारे दूरपर्यंत कनेक्शन करण्यात आले. तब्बल ४८ फुटांपेक्षा जास्त पाइपलाइन लावून नळ कनेक्शन जोडतो त्याप्रमाणे जोडून त्या पाइपलाइनमधून हजारो लिटर डिझेलची चोरी करण्यात येत होती. काल एका शेतकऱ्याच्या विहिरीत डिझेल उतरल्याने त्याचा तपास करत असताना अत्याधुनिक मशिनद्वारे ही चोरी उघडकीस आली. मात्र, ही चोरी कोणी केली हे हे समजले नसून, कंपनीच्या अधिकाऱ्यांतर्फे अज्ञात व्यक्तीविरोधात मनमाड शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक विजयकुमार करे यांनी अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून गुन्हा दाखल केला आहे.**





**मुंबई ते मनमाड पेट्रोलियम कंपनीच्या पाइनलाइनला थेट दीड इंची कनेक्शन करून पेट्रोल-डिझेल चोरी करण्याच्या उद्देशाने केलेले नळकनेक्शन. दुसऱ्या छायाचित्रात माहिती घेताना पोलीस निरीक्षक व कंपनीचे अधिकारी. (छायाचित्र : आमिन शेख)**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनमाडला भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल हिंदुस्थान पेट्रोलियम या इंधन कंपन्यांचे प्लांट आहेत. या प्लांटमध्ये पेट्रोल, डिझेल, केरोसीन यांचा साठा करून उत्तर महाराष्ट्रासह मराठवाडा व विदर्भातील काही जिल्ह्यांना येथून इंधनपुरवठा केला जातो. मनमाडच्या भारत पेट्रोलियम याठिकाणी थेट मुंबई ते मनमाड पाइपलाइन टाकण्यात आली असून, त्याद्वारे पेट्रोल, डिझेल व केरोसीनचा इंधनपुरवठा केला जातो. याआधीदेखील या पेट्रोल पाइपलाइनमधून चोरी करण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले होते. मात्र, यंदाही चोरी अगदी गुप्त पद्धतीने कोणालाही समजणार नाही अशा पद्धतीने करण्यात आली. मनमाड ते मुंबईदरम्यान असलेली पाइपलाइन शेतकऱ्यांच्या शेतामधून आलेली आहे.

अनकवाडे शिवारात संपत चव्हाण या शेतकऱ्याच्या विहिरीत डिझेल, पेट्रोल उतरल्याची माहिती कंपनीला मिळाली. कंपनीने तत्काळ शोधमोहीम सुरू केली. मात्र, याचा तपास लागला नाही. यासाठी खास दिल्लीवरून डीसीव्हीजी मशिनद्वारे सर्व्हे करण्यात आला. यात चार ठिकाणी पाइपलाइन लिकेज असल्याची माहिती समोर आली. मात्र, दोन ठिकाणी केवळ पॅकिंग लिकेज असल्याने त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आले. याच ठिकाणी काही अंतरावर दीड इंची छिद्र करून टॅप मारून थेट पाइपलाइनद्वारे नळ कनेक्शन करतो त्याप्रमाणे ४८ फुटांपर्यंत नळकनेक्शन करण्यात आले व यातून रोज हजारो लिटर पेट्रोल-डिझेल चोरी करण्यात आल्याची घटना समोर आली. याबाबत कंपनीतर्फे अनुज नितीन धर्मराव (प्रबंधक, आरओयू मुंबई-मनमाड- बिजवासन पाइपलाइन नाशिक, रा. बीपीसीएल इन्स्टॉलेशन पानेवाडी, ता. नांदगाव) यांनी रीतसर फिर्याद दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विजय करे यांनी घटनास्थळी भेट दिली. रात्री उशिरा याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला. योबाबत मंडळ अधिकारी मनमाड व तलाठी प्रतिभा नागलवाड यांनी पचनामा केलो. अज्ञात व्यक्तीविरोधात पेट्रोलियम आणि खनिज पाइपलाइन अधिनियम १९६२ (जमीन उपयोगाचा अधिकार) आणि यात सन २०११ मध्ये केलेले संशोधन अधिनियम कलम १५, १६ व भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.



## शालिमारला अतिक्रमण हटाव मोहीम

**पंचवटी : वार्ताहर**

मनपाच्या पश्चिम विभागाच्या वतीने शालिमार ते यशवंत महाराज पटांगण येथे अतिक्रमण मोहीम राबविण्यात येऊन ट्रकभर साहित्य जप्त करण्यात आले.

मनपा विभागीय अधिकारी चंदन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदिरा गांधी पुतळा, शालिमार मेन रोड, धुमाळ पॉइंट ते दहीपूल ते गाडगे महाराज पूल ते यशवंत महाराज पटांगणापर्यंत रस्त्यात अतिक्रमण केलेल्या हातगाड्या व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली.

रस्त्यात ठेवण्यात आलेले स्टॅन्ड बोर्ड, लोखंडी टेबल, कपडे, प्लास्टिक पाल, प्लास्टिक स्टूल, प्लास्टिक टेबल, लोखंडी जाळ्या, बांबू आदींसह इतर एक ट्रक साहित्य आडगाव गोदामात जमा करण्यात आले.

या अतिक्रमण मोहिमेत पश्चिम विभागप्रमुख प्रवीण बागूल, बापू लांडगे, जावेद शेख, संजय सूर्यवंशी, संतोष पवार, मोहन भांगरे, जगन्नाथ हमारे व पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सिन्नर तालुक्याचा बारावीचा निकाल ९७.८३ टक्के

### गेल्या वर्षीच्या तुलनेत १ टक्का वाढ, द्वितीय श्रेणीत सर्वाधिक २३८७ विद्यार्थी

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यात उच्च माध्यमिक शालांत परीक्षेसाठी एकूण ४,६३० विद्यार्थी बसले होते. पैकी ४,५१० विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने शेकडा ९७.८३ टक्के निकाल लागला.

उच्च माध्यमिक महाविद्यालयाचा बारावीचा ऑनलाइन निकाल सोमवारी (दि. ५) जाहीर करण्यात आला. तालुक्यातील ३१६ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाले. १,५८५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २,३८७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. मागील वर्षी ९६.७५ टक्के निकाल लागला होता. यंदा त्यात केवळ एक टक्क्याची वाढ झाली.

तालुक्यात ३२ कनिष्ठ महाविद्यालयांसह शासकीय आयटीआय व तीन महाविद्यालयांचे किमान कौशल्य विभागाचे विद्यार्थी परीक्षेला बसले होते. तालुक्यातील उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल याप्रमाणे-

सिन्नर महाविद्यालय (९८.७२टक्के), ब. ना. सारडा कनिष्ठ महाविद्यालय, सिन्नर (९५.२३टक्के), महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय (९२.८३), न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, बारागावपिंप्री (९६.२० टक्के), पी. आर. भोर विद्यालय ॲण्ड डॉ. अण्णासाहेव शिंदे कनिष्ठ महाविद्यालय, ठाणगाव (९७.४५ टक्के), न्यू इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, वडांगळी (९९.४० टक्के), देवपूर हायस्कूल आणि एस. जी. कनिष्ठ महाविद्यालय, देवपूर (८८.२३ टक्के).

जनता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, नायगाव (९७.८२ टक्के), उच्च माध्यमिक विद्यामंदिर, दापूर (९९.२४ टक्के), माध्यमिक आणि उच्च माध्य. विद्यालय, दातली (९९.४१ टक्के), जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पांढुर्ली (८० टक्के), व्ही. पी. नाईक हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय नांदूरशिंगोटे (९०.४७ टक्के), पाथरे हायस्कूल आणि एस. जी. कनिष्ठ महाविद्यालय (९६.७७ टक्के), श्री साईनारायण गुरुकूल कनिष्ठ महाविद्यालय, कोनांबे (७६.९२ टक्के) टी. एस. दिघोळे कनिष्ठ महाविद्यालय, नायगाव (९८.३० टक्के).

**११ महाविद्यालये १०० नंबरी**

न्यू ब्रह्मानंद ज्युनिअर कॉलेज दोडी बुद्रुक. नूतन विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, वावी. श्री भैरवनाथ हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, शहा. आमदार माणिकराव कोकाटे कनिष्ठ महाविद्यालय, पंचाळे. श्री स्वामी समर्थ विद्यालय, आगासखिंड. शताब्दी विज्ञान महाविद्यालय, आगासखिंड. नवजीवन कॉलेज ऑफ सायन्स डुबेरे नाका सिन्नर. एस. एस. के. आर्ट ॲण्ड कॉमर्स, सायन्स कनिष्ठ महाविद्यालय वडझिरे. सिन्नरभूषण सूर्यभानजी गडाख हायस्कूल सिन्नर. आकाश पब्लिक स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज सिन्नर. पद्मभूषण डॉ. बी. व्ही. पाटील ज्युनिअर कॉलेज, चिंचोली या ११ शाळांचा निकाल १०० टक्के लागला.

## फुले महाविद्यालयाचा निकाल ९५.०६ टक्के



| गौरवी विसपुते | प्रियंका दातीर | शुभांगी पाटोले | वैष्णवी लोणारे | काजल कोरके | वेदिका लोंढे | सानिया खतिब | तनुष्का शेळके | प्रगती सोनवणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८७.६७% | ७७.३३% | ७२.८३% | ८९.३३% | ८५.३३% | ८२.१७% | ८६.६७% | ८३.३३% | ७१.३३% |

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे महात्मा ज्योतिबा फुले ज्युनिअर कॉलेजचा एचएससी परीक्षेचा निकाल ९५.०६ टक्के लागला. विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के, कला शाखेचा ८५.०२ टक्के व किमान कौशल्य विभागाचा ९०.४७ टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान शाखेतून खतीब सानिया इम्रान ८६.६७% (प्रथम), शेळके तनुष्का संदीप ८३.३३% (द्वितीय), सोनवणे प्रगती मुकुंद ७१.३३%. (तृतीय), वाणिज्य शाखेतून लोणारे वैष्णवी राजेंद्र ८९.३३% (प्रथम), कोरडे काजल विजय ८५.३३% (द्वितीय), लोंढे वेदिका गोरख ८२.१७% (तृतीय). कला शाखेतून विसपुते गौरवी नितीन ८७.६७% (प्रथम), दातीर प्रियांका सोमनाथ ७७.३३% (द्वितीय), पाटोळे शुभांगी नवनाथ ७२.८३% (तृतीय). व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी अस्वले भूषण संतोष ६०% (प्रथम), इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजीमध्ये पवार अनिल भानुदास ६२.८३% (प्रथम) ऑटो टेक्नॉलॉजीमध्ये शेख जिशान अकील ५५.५३% टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नामदेव लोंढे, सेक्रेटरी नामदेव लोणारे, उपाध्यक्ष जुगल गवळी, सहसेक्रेटरी रामनाथ बलक, खजिनदार मधुकर खर्जे, उच्च माध्यमिक शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय लोणारे, माध्यमिक शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप गवळी, प्राथमिक शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मंगलाताई झगडे, संचालक सुधाकर गोळेसर, दत्तात्रय गोळेसर, दिगंबर पगर, दत्तात्रय झगडे, संजय माळी, सरलाताई वरंदळ, दत्तात्रय लोंढे, संस्थेचे शिक्षणाधिकारी राहुल वरंदळ, प्राचार्य मधुकर देशमुख, उपप्राचार्य एकनाथ माळी, उपप्राचार्य राजेंद्र भालेराव आदींसह शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## दोडी खुर्दमार्गे निऱ्हाळे बससेवा सुरू

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दोडी खुर्द येथील ग्रामस्थांची एसटी बसअभावी होणारी गैरसोय टाळण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय गोसावी यांच्या पाठपुराव्यातून सिन्नर आगाराने सिन्नर- निऱ्हाळे ही बससेवा दोडी खुर्दमार्गे सुरू केली आहे. मंगळवारपासून (दि.६) प्रवाशांसाठी दोन बससेवा उपलब्ध होणार आहेत.

सिन्नर-निऱ्हाळे दुपारी १२.३० ची बस दोडी खुर्द गावातून जाईल. तसेच संध्याकाळी सातची सिन्नर-निऱ्हाळ मुक्कामी बसदेखील दोडी खुर्दमार्गे जाईल. त्याप्रमाणे परत याचमार्गे सिन्नर येथे पोहोचेल.

या दोन्ही बससेवेचा दोडी खुर्द गावातील व परिसरातील प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आगारप्रमुख हेमंत नेरकर, स्थानकप्रमुख भारत शेळके व दत्तात्रय गोसावी यांनी केले आहे.

## अवकाळी पावसाबरोबर आता गारपिटीचीही शक्यता

**सिन्नर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विदर्भाबरोबरच कोकण वगळता उर्वरित भागात दोन ते तीन दिवस अवकाळीच्या तीव्रतेबरोबर गारपिटीची शक्यताही वाढली आहे, असा अंदाज सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला आहे.

तीन ते दहा मेच्या आठवडाभरासाठी दिलेला अवकाळी पावसाचा अंदाज कायम असून, आता ४ व ५ मे संपूर्ण विदर्भ, दि. ४ ते ७ मे नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, दि. ६ व ७ मे अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, दि. ७ मे संपूर्ण मराठवाडा आदी भागांत अवकाळी पावसासह गारपिटीची शक्यता आहे.



दोन दिवसांत कोकण ३४ ते ३५ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र ३७ ते ४२, मराठवाडा ४१ ते ४२ अंश सेल्सिअस, विदर्भ ४२ ते ४४ अंश सेल्सिअस तापमान असले तरी कमाल व किमान तापमानेही सरासरी व काही ठिकाणी सरासरीच्या खाली आहे. त्यामुळे मे महिना असूनही, उष्णतेच्या दाहकतेपासून ही सुसह्यताच सम जावी.

छत्तीसगडदरम्यान घड्याळ काटा दिशेच्या विरुद्ध दिशेने फिरणाऱ्या आवर्ती व अरबी समुद्रात दीड किलोमीटर उंचीपर्यंत, घड्याळ काटा दिशेने फिरणाऱ्या प्रत्यावर्ती, अशा दोन्हीही चक्रीय वाऱ्यांच्या संगमातून, कोकण वगळता, संपूर्ण महाराष्ट्रात या दोन-तीन दिवसांसाठी गारपिटीची शक्यता निर्माण झाल्याचे जाणवते. संपूर्ण महाराष्ट्रात रात्रीचा उकाडा वा उष्णतेच्या लाटेची शक्यता कुठेही सध्या जाणवत नाही.



## दत्तनगर परिसरात पाणीटंचाई; नागरिकांचे मनपाला निवेदन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिकेच्या सातपूर विभागातील अंबड परिसरातील दत्तनगर व आजूबाजूच्या भागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असून, नागरिकांना रोजच्या जीवनात प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात शिवसेनेचे अंबड विभागप्रमुख शरद दातीर यांच्या नेतृत्वाखाली निवेदनाद्वारे महापालिकेकडे कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

दत्तनगर परिसरातील शिवपार्वती किराणा परिसर, साईशाम अपार्टमेंट, अथर्व अपार्टमेंट, शांती सदन, साईसंकुल, बुद्धविहार, दातीरनगर, कारगील चौक, भवानी मंदिर परिसर, माऊली चौक व बाळासाहेब ठाकरे उद्यान परिसर या भागांमध्ये पाण्याचा पुरवठा अत्यंत कमी दाबाने व अपुरा वेळ दिला जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

या परिसरात कामगार वस्ती मोठ्या प्रमाणावर असून, अनेक कुटुंबांकडे पाणी साठवण्याचीही सुविधा नाही. यामुळे रोज पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ नागरिकांवर येते. फक्त अर्धा ते एक तास तो ही अगदी कमी दाबाने पाणीपुरवठा होतो, यामुळे महिलांना त्रास सहन करावा लागत आहे.

## सुख-दुःखाच्या प्रवाहात आनंद शोधल्यास माणूस सुखी

### ठाणगावला स्वामी समर्थ केंद्रातर्फे श्रीदत्त चरित्रकथा

**सिन्नर : प्रतिनिधी**

सुख दुःखाच्या प्रवाहाबरोबर समाधान मानणारा जीवनात सुखी राहू शकतो, असे मत कीर्तनकार ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे यांनी व्यक्त केले.

ठाणगाव (ता. सिन्नर) येथे श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक व बालसंस्कार केंद्रातर्फे सुरू असलेल्या दत्त चरित्र कथेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

गायक, संगीतकार ऋषीकेश रिकामे यांच्या भक्तिसंगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी शंकर महाराज शेवाळे म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीला आयुष्यात चांगल्या वाईट काळाचा सामना करावाच लागतो. मात्र, चांगले दिवस येण्यासाठी धीर धरण्याची गरज आहे. वाईट दिवस हे कर्माचे खेळ आहेत याची जाणीव माणसाला झाली पाहिजे. माणसाने चांगल्या वाईट दिवसांच्या काळात ईश्वराला विसरता कामा नये. आयुष्यात परमेश्वराला शरण गेलेला या जगात सुखी झालेला आहे. मात्र परमेश्वराचे नामस्मरण हे अंतःकरणापासून आले पाहीजे. निसर्गाने सुखाबरोबर दुःखही दिलेले आहे. आयुष्यात सुख-दुःखात आनंद शोधला पाहिजे. जो आनंदाने सुख-दुःखाला सामोरे जातो तो जगात सुखी झाल्याशिवाय रहात नाही. नामस्मरणात जे सुख आहे ते सुख अन्य कशातही नाही. स्त्रीभ्रूण हत्येला शास्त्रात प्रायचित्त सांगितलेले नाही. परंतु कलियुगात चंगळवादामुळे भारतीय धर्म-संस्कृती विसरत आहे. त्याचा विपरीत परिणाम भारतीय संस्कृतीवर होत आहे.




धर्मसंस्कृती टिकविण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे आणि त्याची जाणीव प्रत्येकाला वेळीच होणे गरजेचे आहे, असे शेवाळे यांनी सांगितले. श्रीदत्त कथेसाठी ठाणगावसह परिसरातील आडवाडी, म्हाळुंगी, केळी, टाहाकारी, पाडळी, आशापुर, हिवरे, पिंपळे, डुबेरे परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. कथेच्या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. संयोजक जयराम शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

**जिवंत देखाव्यांनी वेधले लक्ष**

श्रीदत्त, अनुसया, अत्री ऋषी अशा विविध वेशभूषेतील बालकांनी भाविकांचे लक्ष वेधले होते. ठाणगावच्या अभिमानाचा फलक आणि आकर्षक विद्युत रोषणाईत पाण्याचे कारंजे, तोरणाचा लक्षवेधी रॅम्प यामुळे आबालवृद्धांनी सेल्फीचा आनंद घेतला. गावातील जत्रेसाठी जशी गर्दी जमते त्या प्रमाणे ठाणगांवकर भाविक तसेच श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांची घरे पाहुण्यांनी गजबजून गेली आहेत.



▸▸ महिलांची पाण्यासाठी जीवघेणी भटकंती
▸▸ पान २

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



▸▸ दिंडोरीत धरणांनी तळ गाठल्याने तीव्र टंचाई
▸▸ पान २

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, बुधवार, दि. ७ मे २०२५


# निफाडला बेमोसमी पावसाचा तडाखा

## झाडे कोसळली, घरांचे पत्रे फुटले, शेड जमीनदोस्त, शेतकऱ्यांची धावपळ

**निफाड : प्रतिनिधी**

**संपूर्ण तालुक्यात मंगळवारी दुपारनंतर वादळी वाऱ्यासह बेमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावत शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. सध्या कांदा साठवणुकीच्या कामात शेतकरी व्यस्त असताना, तसेच लग्न मुहूर्त मोठ्या प्रमाणात असल्याने अवकाळी पावसाने वऱ्हाडी मंडळींची धावपळ उडाली. तालुक्यातील सायखेडा, चांदोरी, निफाड, विंचूर, नैताळ, ताममसवाडी, लासलगाव परिसरात जोरदार वारा व गारांसह पाऊस झाला.**

अनेक शेतकऱ्यांचा उघड्यावर पडलेला कांदा ओला झाला. ठिकठिकाणी घरांची पत्रे उडाली. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. शेड जमीनदोस्त झाले. पावसाळ्यापूर्वीच वादळासह पावसाने चुणूक दाखवून दिली. आगामी पावसाची शक्यता विचारात घेता शेतकरी घरे, चाळी दुरुस्तीच्या कामात व्यस्त असल्याने प्लास्टिक कागद, ताडपत्री. पत्रे, बांबू आदी साहित्याच्या खरेदीत सायंकाळी व्यस्त होते. तालुक्याच्या बाजारपेठेत गर्दीचा माहोल दिसून आला. अनेक शेतकऱ्यांचा विक्रीला आणलेला कांदा ओला झाला.

हवामान विभागाने पावसाचा अंदाज वर्तविला होता. परंतु हा अंदाज खोटा ठरेल असे वाटत असतानाच मंगळवारी दुपारनंतर अचानक वादळी वारे वाहू लागले. त्यामुळे ढगांनीदेखील दाटी केली अन् दुपारी चारच्या सुमारास पावसाच्या जोरदार सरी बरसू लागल्या. वादळासह पावसाचा जोर सारखाच असल्याने निफाड, नांदूरमध्यमेश्वर, दिंडोरी, शिवरे, पिंपळस, म्हाळसाकोरे आदी भागात झाडांच्या फांद्या तुटल्या, तर काही ठिकाणी झाडे कोसळली. नांदूरमध्यमेश्वर, खानगाव येथे पत्र्याचे शेड कोसळून मोठे नुकसान झाले. सध्या शेतकरी कांदा चाळीत साठविण्याचे कामात व्यस्त आहेत. त्यातच पावसाने हजेरी लावल्याने निफाड, नांदूरमध्यमेश्वर, दिंडोरी, गाजरवाडी, मांजरगाव, तारुखेडले, धारणगाव, देवगाव आदी परिसरातील शेतकऱ्यांचा कांदा ओला झाला. दरम्यान, पाऊस सुरू होताच





वीजपुरवठादेखील खंडित झाला. रात्री उशिरापर्यंत निफाड, शिवरे, खानगाव थडी, दिंडोरी, जळगाव, म्हाळसाकोरे, सारोळेथडी, खेडलेझुंगे आदी परिसरात वीजपुरवठा सुरळीत झाला नव्हता. पावसाळ्यापूर्वीच विजेने वाकुल्या दाखविणे सुरू केल्याने रात्री नागरिकांना नानाविध समस्यांचा सामना करावा लागला. या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिकांची उन्हाच्या उकाड्यापासून काहीकाळ सुटका





झाल्याचे दिसून आले. पावसाचे आगमन लवकरच होण्याचे संकेत मिळू लागल्याने शेतकरी चाळी दुरुस्ती, घरांची डागडुजी, शेडची दुरुस्ती अशा कामात व्यस्त आहेत. साहजिकच बाजारपेठेत प्लास्टिक कागद ताडपत्री, पत्रे, बांबू, तार, अँगल आदी वस्तू खरेदीला महत्त्व देऊ लागल्याने बाजारपेठेत शेतकऱ्यांची लगबग दिसून आली.

### मका, कांदा पिकांचे नुकसान

मंगळवारी दाट लग्न मुहूर्त असल्याने वऱ्हाडी मंडळींची तारांबळ उडाल्याचे दिसून आले. सध्या अनेक शेतकऱ्यांचा शेतमाल शेतात पडून असल्याने अवेळी आलेल्या पावसाने गहू, हरभरा, मका, कांदा आदी पिकांचे नुकसान झाले. दरम्यान, या पावसाने किती आणि कोठे कोठे नुकसान केले आहे, याचा अंदाज बुधवारी येण्याची शक्यता आहे.



## महत्त्वाचे

### सटाणा तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस

**सटाणा :** शहरासह तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांची व नागरिकांची तारांबळ उडाली. वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडल्याने घरांची पत्रे तसेच शेतकऱ्यांचा कांदा पावसात भिजल्याने मोठे नुकसान झाले आहे. पाच वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. तालुक्यातील चौगाव गावातील वादळी वाऱ्यामुळे नीलेश लोटन अहिरे यांच्या घराचे पत्रे उडाल्याने त्यांच्या घराचे मोठे नुकसान झाले. अचानक आलेल्या पावसामुळे परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. वादळी वाऱ्यामुळे ठिकठिकाणी झाडे, विद्युत खांबाचे पोल आणि वीजवाहक तारा तुटून पडल्या. नागरिकांना उकाड्यापासून तात्पुरता दिलासा मिळाला, मात्र वादळी वाऱ्यामुळे विद्युत पोल व वीजवाहक तारा तुटून पडल्याने शहरातील चार तास विद्युत पुरवठा बंद होता.



### येवल्यात शेतकऱ्यांचा कांदा भिजला

**येवला :** तालुक्यात विविध ठिकाणी सायंकाळी पाचच्या दरम्यान वादळी वाऱ्यासह बेमोसमी पाऊस झाला. दरम्यान, झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची मोठी धांदल उडाली असून, काही ठिकाणी गारांचा पाऊस पडला. असंख्य शेतकऱ्यांचा कांदा भिजून नुकसान झाले. दुपारी ३ वाजेपासून शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात ढगाळ वातावरण होते. येवला तालुक्यातील सावरगाव येथील शेतकरी छगन दावल गोविंद यांची कांदा चाळच वादळी वाऱ्यात उडून गेल्याने १२० क्विंटल कांदा भिजून मोठे नुकसान झाले आहे. यांसह अनेक ठिकाणी घरांचे पत्रे उडून गेले असून, जळगाव नेऊर या ठिकाणी विवाह सोहळा सुरू असताना लग्न मंडपदेखील उडाला. विवाहसोहळ्याला आलेल्या लोकांची धावपळ झाली. सुमारे एक तासापासून वादळी वारा व पाऊस सुरू असून, शेतकऱ्यांबरोबर सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान झाले आहे.



### विंचूरला व्यापाऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**विंचूर :** परिसरात मंगळवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. दुपारी चार वाजेच्या सुमारास आकाश आभ्रच्छादित होऊन अचानक वादळी वारे वाहू लागले व साडेचार वाजेच्या सुमारास पावसास सुरुवात झाली. सुमारे एक तास मुसळधार पाऊस कोसळत होता. गावातील नाले व रस्ते जलमय झाले होते. वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे येथील कृषी उत्पन्न उपबाजार आवारातील चार ते पाच कांदा व्यापारी व धान्य व्यापाऱ्यांचे शेड पडले. तसेच कांदा, मका, सोयाबीन, गहू आदींचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याने व्यापारीवर्ग हवालदिल झाला आहे. पावसाचा कुठलाही अंदाज नसल्याने बेसावध असलेल्या शेतकऱ्यांचे उघड्यावर पडलेले कांदे व इतर शेतमाल झाकण्यासाठी एकच धांदल उडाली. तरी देखील कांदा व तुरळक प्रमाणात राहिलेल्या द्राक्षबागांचे नुकसान झाले. तसेच येथील प्रगतिशील शेतकरी पांडुरंग राऊत यांच्या अकरा एकर केळीच्या बागेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे व्यापाऱ्यांच्या शेडचे व मालाचे नुकसान झाल्याने बुधवार, दि.७ रोजी विंचूर उपबाजार आवारातील तेलबिया व भुसार मालाचे लिलाव बंद ठेवण्यात आले आहेत.

# चांदवडच्या दक्षिण पूर्व भागात गारपीट

## कांदा बियाणे उत्पादक शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड शहरासह तालुक्याच्या दक्षिण पूर्व भागात मंगळवारी (दि.६) सायंकाळच्या सुमारास जोरदार गारपीट झाली. या नैसर्गिक संकटामुळे कांदा बियाणे (डोंगळे) उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. काढणीसाठी तयार झालेले बियाण्याचे प्लॉट उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले. शासनाने तातडीने पंचनामे करून विनाअट नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

मंगळवारी सकाळपासूनच परिसरात उष्णतेचे प्रमाण अधिक होते. दुपारच्या सुमारास आकाशात ढगांची गर्दी झाली आणि सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. काही वेळातच गारांचा वर्षाव सुरू झाला आणि सुमारे अर्धा तास गारपीट झाली. या गारपिटीचा सर्वाधिक फटका कांदा बियाण्याच्या पिकाला बसला आहे. सध्या हे पीक काढणीच्या अंतिम टप्प्यात होते.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. पुढील महिन्यात खरीप कांद्याची लागवड सुरू होणार असल्याने आता बियाणे कुठून आणायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. बाजारात कांदा बियाण्याचा भाव सध्या प्रति पायली दहा ते पंधरा हजार रुपये आहे. मात्र, बियाण्याचे संपूर्ण प्लॉट नष्ट झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. वादळी पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळली, तर काही ठिकाणी विद्युत तारा तुटल्या. शेतात साठवलेल्या काढणीला आलेल्या उन्हाळ कांद्याचेही नुकसान झाले आहे. रेडगाव खुर्द, वाहेगाव साळ, वाकी, काळखोडे, पाटे, कोलटेक, पन्हाळे, सोनी, सांगवी काजीसांगवी, विटावे, साळसाणे, वडगाव पंगू आदी गावांना या गारपिटीचा मोठा तडाखा बसला आहे. काजीसांगवी येथे जयसिंग ठाकरे यांच्या अर्ली द्राक्ष बागेचे कोवळे शेंडे मोडल्याने त्यांची द्राक्षबाग पूर्ण वर्षासाठी धोक्यात आली आहे. या नैसर्गिक संकटामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना कोणत्याही अटीशिवाय भरीव नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



**साळसाणे येथे महेश प्रभाकर ठाकरे यांच्या एक एकर कांदा बियाणाचे प्रचंड नुकसान झाले.**

> ''माझा एक एकराचा बियाणे प्लॉट (डोंगळे) काढणीसाठी तयार होता. परंतु आज अचानक आलेल्या गारपिटीने संपूर्ण प्लॉट उद्ध्वस्त झाल्याने पाच ते सहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे आता शेतात कांदे लागवड करायला सुद्धा बियाणे शिल्लक राहिले नाही. शासनाने तातडीने भरपाई द्यावी.''
>
> **–महेश प्रभाकर ठाकरे,** साळसाणे

> ''चायना कांदा बियाणे तयार करण्यासाठी चढ्या भावात कांदे घेऊन बियाणे प्लॉट तयार केला होता. हातातोंडाशी आलेला संपूर्ण प्लॉट उद्ध्वस्त झाल्याने आता बियाणेच शिल्लक राहिले नाही. वर्षभराची संपूर्ण कसर या गारपिटीने काढल्याने अतोनात नुकसान झाले.''
>
> **– अनिल रामकृष्ण काळे,** रेडगाव खुर्द

# नुकसानीचे पंचनामे तत्काळ करा : सोनवणे

**नाशिक : प्रतिनिधी**

डांगसौंदाणे परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने कांद्याबरोबर अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत पोल कोसळल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे तत्काळ करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच निवृत्ती भागा सोनवणे, बाळू केदा सोनवणे व अशोक गणपत गांगुर्डे यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे, डांगसौंदाणेसह परिसरात मंगळवारी दुपारी वादळासह जोरदार पावसामुळ डांगसौंदाणे, बुधाटे परिसरात साठवून ठेवलेल्या कांदाचाळीवरील पत्रे उडून गेले तसेच विजेचे खांब पडून विद्युत पुरवठा खंडित झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

आधीच कांदा पिकाला भाव नसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. आता पुन्हा साठवणूक केलेल्या कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. शेतीपिकांचे व साठवलेल्या कांद्याचे पंचनामे करण्यात यावेत व भरपाई देण्यात यावी, अशी मागणी निवृत्ती सोनवणे यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.



### ओझरला पाऊस

**ओझर :** ओझरटाऊनशिपसह परिसरात काल अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह हजेरी लावली. दुपारी ४ वाजेच्या सुमारास ढगाळ वातावरण तयार होऊन अचानक वादळी वारा सुटला व पावसाला सुरुवात झाली. पाऊस सुरू असताना काही भागात गारा पडल्या.



# वणी परिसरात पाऊस

**वणी : प्रतिनिधी**

वणी व परीसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांची व नागरिकांची तारांबळ उडाली.

वणी व परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडल्याने घरांचे कौले/ पत्रे तसेच शेतकऱ्यांचा कांदा पावसात भिजल्याने मोठे नुकसान झाले आहे. वणी व परिसरात मंगळवारी दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसास सुरुवात झाली. तसेच करंजखेड शिवारात गारांचा पाऊस पडला.

शेतकरी बांधव तसेच सर्वसामान्यांच्या घरावरील पत्रे, कौले व शेतातील झाडे कोसळली. वादळी वारा जोरात असल्याने वणी ग्रामीण रुग्णालयातील पिंपळाचे झाड विद्युत तारांवर पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला. त्याचप्रमाणे वणी येथे मंगळवारचा आठवडे बाजार असल्याने अनेक व्यावसायिकांचे बाजारातील छत तसेच पाल उडाले. अचानकपणे आलेल्या पावसामुळे सर्वसामान्यांची धांदळ उडाली.

परिसरात करंजखेड, चौसाळे, पिंप्री-अंचला, माळेदुमाले, पांडाणे, पुणेगाव, अंबानेर, चंडीकापूर, मांदाणे, मुळाणे, संगमनेर, मावडी या गावांमध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्याचे स्वरूप मोठे असल्याने सर्वसामान्यांबरोबरच शेतकऱ्यांची तारांबळ उडाली व नुकसान झाले.

### इगतपुरी तालुक्यात पिकांचे नुकसान

**वासाळी :** इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागात दुपारी विजांचा कडकडाट, गारपीट व वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले. शेतकऱ्यांना नेहमीच संकटांचा सामना करावा लागतो आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी तर कधी पिकांना कमी भाव. यामुळे शेतकरी नेहमी मेटाकुटीला आलेला असतो. मात्र काल अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर आता नवे संकट उभे राहिले आहे. इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागात आंबेवाडी, वासाळी, टाकेद अडसरे, सोनोशी, बारशिंगवे, भरविर, निनावी इत्यादी ठिकाणी गारपिटीसह जोरदार पावसाने हजेरी लावली व शेतकऱ्याची धांदळ उडाली. कांद्याचे पीक काढून ऊन लागण्यासाठी शेतातच शेतकऱ्यांनी उघड्यावरच गंज घातले असल्याने पूर्णतः कांद्याच्या ढिगाखालून पाणी जमा झाले असून, कांदे वाचवण्यासाठी शेतकऱ्याला धडपड करावी लागली. ताडपत्री व इतर साधनांनी झाकण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

# दिंडोरी, सुरगाणा तालुक्यांत गारपीट

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी, सुरगाणा, पेठ तालुक्यांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने सायंकाळी ४.३० वाजेच्या सुमारास हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. गेल्या महिनाभरापासून उन्हामुळे हैराण झालेल्या नागरिकांना अवकाळी पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाल्याने काहीसा दिलासा मिळाला.

मंगळवारी सकाळपासूनच प्रचंड प्रमाणात उकाडा जाणवत होता. दुपारी वातावरणात बदल होवून अचानक वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पावसाने हजेरी लावली. साधारण १५ मिनिटे हजेरी लावल्याने अनेकांची धावपळ उडाली. शेतकऱ्यांनी शेतात काढून ठेवलेल्या कांद्याचे प्रचंड नुकसान झाले. त्याचप्रमाणे काही गहू काढणीचे बाकी आहे. ते वादळी वाऱ्याने आडवे पडले आहेत. तसेच खळ्यावर काढून ठेवलेला गहूही भिजला आहे.

सुरगाणा तालुक्यात आंबा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. तालुक्यातील खिर्डी येथे शिवराम झुला मुरे यांचे घरांचे कौले वादळी वाऱ्यामुळे उडून गेल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात झाले आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने अनेक ठिकाणी घरांचे पत्रे उडाले, तर विद्युत खांब, विद्युत तारा, झाडे, कांदा चाळ, आंबा यांसह शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पावसामुळे अनेक ठिकाणी पाण्याचे डबके साचले होते. पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांनी शेतात ठेवलेल्या कांदा पीक व इतर पिके झाकण्यासाठी शेतकरी राजाची धावपळ उडाली. विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह पावसाने वीज प्रवाह खंडित झाला होता. त्यामुळे दिंडोरी शहरासह काही गावात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. दिंडोरी शहरासह निळवंडी, पाडे, हातनोरे, वनारवाडी, मोहाडी, पालखेड बंधारा, आंबेदिंडोरी, अक्राळे, वनारवाडी, मडकीजांब, जांबुटके, निगडोळ, उमराळे, वलखेड, कोर्हाटे, लखमापूर, म्हेळूस्के, जोपूळ, मातेरेवाडी, वरखेडा, खेडगाव, सोनजांब, बोपेगाव, खडकसुकेणे, शिवनई, ओझे, करंजवण, तळेगाव दिंडोरी, इंदोरे, कोचरगाव, अहिवंतवाडी, ननाशी, देवसाने, उमराळे बु. आदी परिसरात अवकाळी पावसाने हजेरी लावून मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे.

विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा ठप्प झाला होता. अनेक भागात वीजतारा तुटल्याने अनेक गावे रात्रभर अंधारातच होती.

जानोरी परिसरात अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने अनेक शेतकऱ्यांचे शेतीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, मोहाडी, कुर्णिली, खडक सुकेणा, कोऱ्हाटे, पालखेड आदी परिसरात पॉलिहाऊस व नेटहाऊस व इतर पिकांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच जानोरी परिसरात डाळिंब पीक सध्या फुलामध्ये असल्यामुळे या पिकाचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.



सौ. शशी देवधर पान ४

# नाशिक आज गांवकरी



वर्षअखेर भारत चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था? पान ३

नाशिक, बुधवार, दि. ७ मे २०२५


# आठ वर्षांनंतर वाजणार महापालिका निवडणुकीचा बिगुल

## सप्टेंबरमध्ये निवडणूक; तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट; न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत

**नाशिक : प्रतिनिधी**

**सर्वोच्च न्यायालयाने महापालिका निवडणूक घेण्याचे आदेश दिल्यानंतर नाशिक महापालिका निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने निवडणूक कधी होणार? याकडे राजकीय पक्षांचे पदाधिकारी टक लावून बसले होते. अखेर सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची वाट मोकळी करून दिल्याने विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.**





महापालिकेतील प्रशासक राजवटीत सामान्यांची कामे होत नसल्याचा आरोप माजी नगरसेवकांकडून सतत केला जात आहे. बहुप्रतिक्षित महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजणार असल्याने शहरातील भाजप, शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे व वंचित बहुजन आघाडी आदींसह विविध पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.

नाशिक महापालिकेत १३ मार्च २०२२ रोजी प्रशासक राजवट लागू झाली. प्रशासकीय राजवटीत तीन आयुक्तांनी शहराचा कारभार पाहिला. यातील डॉ. अशोक करंजकर यांचा कार्यकाल सर्वाधिक वादग्रस्त ठरला. त्यांनी घेतलेल्या निर्णयांत 'अर्थ'पूर्ण व्यवहाराचे आरोप केले गेले. १२२ नगरसेवक असलेल्या नाशिक महापालिकेचे एकूण ३१ प्रभाग आहेत. २०१७ च्या निवडणुकीत चार सदस्यीय प्रभागांची रचना करण्यात आली होती. नंतर २०१९ मध्ये सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने चार सदस्यीय रचना रद्द करून तीन सदस्यीय प्रभाग केले. प्रभागरचना बदलून सर्व प्रभागांत आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली, पण महाविकास आघाडीचे सरकार कोसळताच भाजप- शिवसेना शिंदे गटाच्या महायुती सरकारने तीन सदस्यीय प्रभागरचना रद्दचा निर्णय घेतला. दरम्यान, त्याचवेळी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ओबीसींचा मुद्दा थेट सर्वोच्च न्यायालयात गेला.

तेव्हापासून न्यायालयात सुरू असलेली सुनावणी मंगळवार(दि. ६ मे)पर्यंत सुरू होती. न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश राज्य शासनाला दिल्याने नाशिक महापालिका प्रशासनाकडून लवकरच पुढच्या काही दिवसांत हालचाली सुरू होतील. प्रशासक राजवटीत कैलास जाधव, रमेश पवार, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आदींनी प्रशासक म्हणून काम पाहिले. मनीषा खत्री विद्यमान आयुक्त असून, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याकडून नियोजन सुरू आहे.

नाशिक महापालिकेत प्रशासक राजवट लागू झाल्यापासून तीन अंदाजपत्रके वेगवेगळ्या आयुक्तांनी सादर केली. विशेष म्हणजे, महापालिकेच्या इतिहासात प्रथमच आयुक्तांनी महापौर व लोकप्रतिनिधींशिवाय अंदाजपत्रक सादर केले.



**सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी खूप उशीर केला. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्याने आता निवडणुका लवकर झाल्या पाहिजेत, अन्यथा राज्य सरकार पुन्हा काहीतरी सांगून निवडणुका रद्द करू शकते. असे होता कामा नये.**

**–दिनकर पाटील,** प्रदेश सरचिटणीस,मनसे



**नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप शंभर प्लस जागा जिंकेल. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहर, त्र्यबकेश्वर व जिल्ह्यात विविध विकासकामे करावी लागतील. त्याकामी सभागृहात लोकप्रतिनिधी असणे गरजेचे आहे. भाजपने सर्व १०४७ बूथवर बूथप्रमुख व समित्या गठित केल्या असून, पक्षसंघटनेच्या माध्यमामधून प्रचार यंत्रणा राबवून भाजपचे मिशन शंभर प्लसचे ध्येय असेल. त्यामुळे महापालिकेवर भाजपचा पुन्हा एकदा झेंडा फडकेल यात शंका नाही.**

**- प्रशांत जाधव,** शहराध्यक्ष, भाजप



**न्यायालयाचे अभिनंदन. लोकशाहीत स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक महत्त्वाची अहे. गेली तीन वर्षे नाशिक महापालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने सामान्य माणसाचा आवाज कुठेही दिसत नव्हता. नागरिकांच्या छोट्या अडचणी असतात. यासाठी हक्काचा लोकप्रतिनिधी आवश्यक असतो. त्यातच प्रशासनाचा मुजोरपणादेखील वाढला होता. मात्र, महापालिकेची निवडणूक होताच नागरिकांसाठी लोकप्रतिनिधी पुन्हा उपलब्ध होऊन त्यांच्या अडचणी सोडविल्या जातील.**

**- अजय बोरस्ते,** उपनेते, शिवसेना शिंदे गट



**बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित प्रश्न होता. आतापर्यंत नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषद निवडणुका थांबवल्या होत्या. आता लोकांची सत्ता स्थापन होईल. प्रशासकीय हुकूमशाही बंद होईल.**

**-गजानन शेलार,**

शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट



**स्थानिक स्वराज्य संस्थांसंबंधी दिलेला निर्णय योग्य असून, लोकप्रतिनिधी सर्वसामान्य नागरिकांचे जबाबदारीने काम करत असतात. प्रशासनावर अंकुश ठेवतात. लोकप्रतिनिधींमुळे नागरिकांचे प्रश्न सोडविले जातात. त्यामुळे न्यायालयाने दिलेला निर्णय योग्य असून, त्याचे स्वागत करतो.**

**- रंजन ठाकरे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट



**बऱ्याच दिवसांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित होत्या. यामुळे नागरिकांच्या अडचणी सोडवण्यात अडचणी येत होत्या. निवडणुका न झाल्याने सलग तीन वर्षे लोकप्रतिनिधींना काम करण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींची आवश्यकता असते. नागरिकांच्या अडचणी लोकप्रतिनिधीद्वारे प्रशासनासमोर योग्यपणे मांडल्या जातात. यासाठी महापालिका निवडणूक वेळेवर होणे अपेक्षित आहे.**

**- सुधाकर बडगुजर,** उपनेते, शिवसेना ठाकरे गट



**खरंतर राज्य सरकारच्या भाजप महायुती सरकारच्या मनात निवडणुका न घेण्याचे प्रयत्न होते. लोकशाहीत ही बाब चुकीची होती. सर्वोच्च न्यायालयाने हाच धागा पकडून राज्य सरकारला चपराक देत चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिले. त्यामळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**

**- ॲड. आकाश छाजेड,** शहराध्यक्ष, काँग्रेस



**न्यायालयाने महापालिका निवडणुकीबाबत आधीच निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र, उशिराने का होईना सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्याने आभार मानतो. नाशिक महापालिकेत तीन वर्षांपासून प्रशासक राजवट आहे. मात्र, येणाऱ्या महापालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडी करिश्मा करून दाखवल्याशिवाय राहणार नाही.**

**-डॉ. अविनाश शिंदे,** महानगरप्रमुख, वंचित बहुजन आघाडी

### राजकीय पक्षांचे प्रभाग रचनेकडे लक्ष

**महाविकास आघाडी सरकारने २०११ नंतर जनगणना न झाल्याने वाढीव लोकसंख्येनुसार रचना करण्याचे आदेश दिले. त्यावेळी तीन सदस्यीय प्रभागरचना झाल्यावर पुन्हा ओबीसी आरक्षण टाकून प्रभागरचना करण्याचे आदेश देण्यात आले. त्यावेळी भाजपने मविआच्या निर्णयावर टीका करून स्वतःच्या सोयीने प्रभागरचना केल्याचे आरोप केले होते. मात्र, पुढे निवडणुका झाल्याच नाहीत. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आल्यानंतर त्यांनी सर्व प्रथम अगोदरची तीन सदस्य प्रभागरचनाच रद्द केली. त्यामुळे आता प्रभागरचना कशी असणार याकडे राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे.**

## संक्षिप्त

### राष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेत उगले प्रथम



**नाशिक :** शरद कला, क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान (पुणे) आयोजित राष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेत नाशिक येथील कवी व अभिनेता राजेंद्र उगले यांच्या कवितेला प्रथम क्रमांकाचे (विभागून) दहा हजारांचे पारितोषिक जाहीर झाले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकार, राज्य सरकार, लोकप्रतिनिधी, राष्ट्रपती, पंतप्रधान, साहित्य अकादमी आणि यासाठी नियुक्त केलेल्या साहित्यिक रंगनाथ पठारे समिती आदींचे कवितेतून आभार मानणे असा आगळावेगळा विषय कवितेसाठी देण्यात आला होता. आभार मानतानाच मराठी भाषेचा उगम सांगून तिचे महत्त्व अधोरेखित करायचे होते. या स्पर्धेसाठी आलेल्या सुमारे पाचशे कवितांतून नाशिकच्या राजेंद्र उगले यांची कविता प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. विशेष म्हणजे, यापूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी महामहिम राष्ट्रपती यांना कवितेतून विनंती करण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. त्यातही उगले यांच्याच कवितेला प्रथम क्रमांकाचे दहा हजारांचे पारितोषिक प्राप्त झाले होते. उगले यांच्या या यशाबद्दल नाशिकच्या साहित्य वर्तुळातून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. उगले यांनी याबद्दल शरद कला, क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान (पुणे) चे पदाधिकारी लक्ष्मीकांत खाबिया, अश्विनी पाचारणे, संदीप राक्षे, विवेक थिटे व परीक्षकांचे आभार मानले आहेत.

# नाशिक शहरात आज मॉकड्रिल

## अफवांवर विश्वास ठेवू नका : जिल्हाधिकारी

**नाशिक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार देशभरातील २४४ सिव्हिल डिफेन्स जिल्ह्यांत (नागरिक सुरक्षा जिल्हे) बुधवारी (दि. ७) मॉकड्रिल होणार आहे. राज्यातील नाशिकसह ठाणे, पुणे, तारापूर (जि. पालघर), रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हाय अलर्ट जारी केला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच उच्चस्तरीय बैठक झाली. लष्कराचे अधिकारीही या बैठकीस उपस्थित होते. बुधवारी (दि.७) होणाऱ्या मॉकड्रिलसंदर्भात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सविस्तर माहिती दिली. बुधवारी केटीएचएम महाविद्यालय प्रांगण, गंगापूर रोडच्या प्रांगणात एअर, फायर रेस्क्यू, ब्लॅकआउट या माध्यमातून मॉकड्रिल केले जाणार आहे. या उपक्रमात प्रामुख्याने पोलीस, अग्निशमन दल, सिव्हिल डिफेन्स, एनसीसी, एनएसएस व इतर सुरक्षा विभागांचा समावेश राहील.

**नाशिक जिल्ह्याचे विशेष महत्त्व**

नाशिकमध्ये इंडिया सिक्युरिटी प्रेस, करन्सी नोट प्रेस, देवळाली तोफखाना केंद्र, गांधीनगर आर्टिलरी सेंटर, एचएएल कारखाना, तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठा इंधन डेपो पानेवाडी (मनमाड) येथे आहे. देशाच्या सुरक्षेशी संबंधित या अत्यंत संवेदनशील आस्थापना नाशिकमध्ये असल्याने नाशिकची मॉकड्रिलसाठी निवड करण्यात आल्याचे समजते.

**सायरन वाजल्यावर काय करावे?**



**मॉक ड्रिलबाबत सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये. हा नियमित सरावाचाच एक भाग आहे. प्रशासनाच्या अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा.**

**- जलज शर्मा,** जिल्हाधिकारी नाशिक

सायरन वाजल्यावर नागरिकांनी घाबरू नये. युद्धजन्य परिस्थितीतील हा केवळ सराव आहे. मोकळ्या जागेत असाल तर सुरक्षित ठिकाणी जावे. घरातच राहावे किंवा मजबूत इमारतीत प्रवेश करावा. घरातील दिवे बंद करावेत. काचेपासून दूर राहावे. बाथरूमसारखी खोलगट जागा सर्वात सुरक्षित मानली जाते. विंडो पॅनलवर प्लास्टिक कव्हर लावणे उपयुक्त ठरते.

### मॉकड्रिलची ठिकाणं आणि तयारी

नाशिक शहरातील एकूण ९ ठिकाणी सायरन बसवण्यात आले असून, त्यांची चाचणी नुकतीच पार पडली. या ठिकाणी सायरन बसवलेले आहेत:

- **जिल्हाधिकारी कार्यालय**
- **बीवायके कॉलेज**
- **मनपा मेनरोड कार्यालय**
- **जिल्हा परिषद**
- **झाकिर हुसेन रुग्णालय**
- **गांधीनगर प्रिंटिंग प्रेस**
- **नेहरूनगर कस्टोडियन**
- **ट्रान्झिस्ट होस्टेल**
- **इंडिया सिक्युरिटी प्रेस**
- **महापालिका कार्यालय (जव्हार मार्केट, नाशिकरोड)**



# जि. प.सह दोन महापालिकांच्या निवडणुका

## जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा, १५ पंचायत समित्यांचा समावेश

**नाशिक : प्रतिनिधी**

न्यायालयाच्या आदेशाने अखेर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील नाशिक मनपा, मालेगाव मनपा या २ महापालिका, ११ नगरपरिषदा, जिल्हा परिषद आणि १५ पंचायत समित्यांमध्ये आगामी ४ महिन्यांत निवडणुकांचा बार उडणार असून, इच्छुकांचीही तयारी अन् चाचपणी सुरु झाली आहे.

नाशिक जिल्हा परिषदेच्या ७३ गटांमध्ये निवडणुक २०१७ रोजी पार पडली होती. त्यानंतर २०२२ रोजी मुदत संपली अन् तेव्हापासून अद्यापर्यंत तेथे प्रशासक राज आहे. हीच गत १५ पंचायत समित्या आणि दोन्ही मनपांमध्ये आहे. दरम्यान जिल्ह्यातील १७ पैकी ११ नगर परिषदांचा कार्यकाळही २०२१ ते २०२४ दरम्यान संपला आहे. त्यानुसार तेथेही आता निवडणुका होतील.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे २०२२ मधील ओबीसी राजकीय आरक्षणासह या निवडणुका पार पडणार आहेत. तीन वर्षांपासून विविध स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकीय कारभार सुरू आहे. इच्छूक पदाधिकारी व कार्यकर्ते यांची निवडणुकीच्या प्रतिक्षेत होते. आता त्यांची तयारी सुरू झाली आहे. राजकीय पक्षांनाही आपल्या तयारी सुरू करण्यास प्रारंभ केला आहे.

### या संस्थांच्या होणार निवडणुका

- **नाशिक महापालिका**
- **मालेगाव महापालिका**
- **जिल्हा परिषद**
- **पंचयात समिती : नाशिक, सिन्नर, इगतपुरी, निफाड, येवला, नांदगाव, चांदवड, देवळा, कळवण, सुरगाणा, पेठ, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, बागलाण, मालेगाव**
- **नगरपरिषद, नगरपंचायती : मनमाड, सिन्नर, येवला, सटाणा, इगतपुरी, चांदवड, नांदगाव, त्र्यंबकेश्वर, भगूर, ओझर**
- **या नगरपंचायतींवर लोकप्रतिनिधी आहेत कार्यरत : निफाड, दिंडोरी, कळवण, सुरगाणा, पेठ, देवळा आहे.**



# आदिवासी समाजाचा बिऱ्हाड मोर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**

ओढे येथे साठ वर्षांपासून राहत असलेल्या १६ आदिवासी कुटुंबांनी शेळ्या, गायी, म्हशी, कोंबड्या व आदिवासी सामाजिक संघटना, सामाजिक संस्था, आदिवासी समाजबांधवांसहित आदिवासी कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या मागणीसाठी मंगळवारी (दि. ६) जिल्हाधिकारी कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा काढला होता. यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की ओढे ग्रामपंचायत हद्दीतील गट १७१ व १७२ या गायरान जमिनीवर ६० ते ७० वर्षांपासून राहत असलेल्या १६ पीडित भूमिहीन आदिवासी कुटुंबांच्या शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनाकरिता अतिक्रमण केलेले आहे. पण गायरान जागेवर मुख्यमंत्री सौरऊर्जा प्रकल्प मंजूर झाला आहे. या प्रकल्पाकरिता १५ हेक्टरची मागणी केली आहे. गावात गावठाण शिल्लक नसल्याने रहिवासाकरिता २ हेक्टर क्षेत्र राखून ठेवावे, अशी तरतूद करण्यात आलेली असतानाही गरीब, भूमिहीन आदिवासी १६ कुटुंबांची घरे अतिक्रमित म्हणून पाडण्यात आली. आमचा मुख्यमंत्री सौरऊर्जा प्रकल्पाला विरोध नसून १५.४७ पैकी २ हेक्टर क्षेत्र भूमिहीन आदिवासी कुटुंबे, अंगणवाडी तसेच जनावरांसाठी राखीव ठेवावे. या आदिवासींची घरे नियमाकुल करावीत, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनावर आदिवासी नामक फाउंडशेनचे प्रवीण कडाळे, विकी मुंजे, गायकवाड, भगवंत मोरे, राहुल गांगुर्डे, अजय गांगुर्डे, लखन बोरसे, भगवान सोनवणे, प्रशिक मोरे, आकाश भगरे, रोशन मोरे, अमित मराडे, श्याम मराडे, आकाश मराडे, सुकरा बोरसे, राजेंद्र बोरसे, रमेश माळी, रोहिदास चव्हाण, सुरेश गायकवाड, अशोक पवार, सचिन पिंपळसे यांच्या सह्या आहेत.

# मन जपलं तर बालपण फुलतं

## मुलांचे मानसिक आरोग्य जागरूकता दिन



**नाशिक : प्रतिनिधी**

मानसिक आजारावर उपचारांची गरज मोठ्यांनाच असते असे नाही, तर लहान, किशोरवयीन मुलांमध्येही मानसिक आजार असल्याचे निदान केले जात आहे. हल्ली मुलांच्या काही सवयी, व्यसने, चिडचिडेपणा आदी सवयींमागे मानसिक आजार असू शकतात, हे मानणे मुलांबरोबर पालकांनाही जड जात आहे. तज्ज्ञांच्या मते वेळीच मुलांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष दिल्यास पुढील पिढी सावरू शकते.

**मन:स्वास्थ्य भविष्याचा पाया**

मुलांच्या मानसिक आरोग्याची जाणीव ही काळाची गरज बनत चालली आहे. ८ ते १७ वयोगटातील मुलांचे मानसिक आरोग्य ढासळत चालल्याचे चित्र आहे. या मुलांमध्ये चंचलता, मोबाईलचे व्यसन, चिडचिड, राग अनावर होणे, आकर्षण, प्रेमप्रकरण, ब्रेकअप, आत्महत्येचा प्रयत्न, दादागिरीचे वेड, वर्चस्ववाद आदी कारणांमुळे पालकवर्ग चिंतेत आहे. ही मुले किशोरवयीन वयोगटात असल्याने त्यांच्याशी संवाद कसा साधावा किंवा असे वागणे एक मानसिक आजार आहे, हेच पालक किंवा मुलांच्या पचनी पडत नाही. त्यामुळे त्यावर मात करण्यासाठी किंवा उपचारासाठी तज्ज्ञांची मदत घेतली जात नाही, पण भविष्यातील धोके ओळखून मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञ सांगतात.

**"८ ते १७ वयोगटातील मुलांचे भावविश्व समजून घ्यायला हवे. मुलांचे, पालकांचे समुपदेशन, नेमका आजार काय आहे, हे पाहून औषधोपचार करून आजार, व्यसनाचे निदान केले जाते.**

**- डॉ. उमेश नागापूरकर**

मुलांमधील विचित्र वागणुकीच्या कारणांसाठी महिन्याला १० ते १५ नवीन रुग्ण येतात. अशावेळी मुलांचे समुपदेशन, चाचण्या, नेमका आजार, त्रास काय आहे हे बघितले जाते. योग्य ते औषधोपचार, पालकांचे समुपदेशन केले जाते, असे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. उमेश नागापूरकर सांगतात.

मानसिक आरोग्याबद्दल समाजात असलेले गैरसमज आणि नकारात्मक दृष्टिकोन दूर करणे महत्त्वाचे आहे. मुलांमधील मानसिक आरोग्याच्या समस्यांची लक्षणे लवकर ओळखल्यास आणि त्यांना वेळीच मदत पुरवल्यास गंभीर समस्या टाळता येऊ शकतात.

मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध संसाधनांविषयी मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशक, हेल्पलाइनची मदत घेता येऊ शकते.

मुलांना सुरक्षित आणि प्रेमळ वातावरण देणे. मुलांच्या विशेषतः वयात येणाऱ्या मुलांकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. कारण या वयातच मुलांचे पाऊल घसरू शकते आणि वाकडं वळण लागू शकतं. आपण बघतोय की याचा परिणाम म्हणून बालगुन्हेगारी वाढत चालली आहे. ही मुले उद्या भारताची ओळख असणार आहेत. सशक्त समृद्ध भारताला चांगल्या पिढीची गरज आहे.

### मुलांचे मानसिक आरोग्य जागरूकता दिनाचे महत्व

**मुलांच्या मानसिक आरोग्याच्या समस्यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे, हा या दिनाचा प्रमुख उद्देश आहे. अनेकदा मुलांमधील मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते किंवा त्या ओळखल्या जात नाहीत. शाळा, संस्थांमध्ये मुलांच्या मानसिक आरोग्यावर कार्यशाळा व चर्चासत्र घेतले जाते.**

अग्रलेख

# कामाला लागा

गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मोकळा करुन दिला. निवडणुकांची अधिसूचना चार आठवड्यांत आणि निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असल्याने महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला लगेचच तयारीला लागावे लागणार आहे. गेल्या वर्षी एप्रिल/मे महिन्यात लोकसभा निवडणूक झाली. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणूक पार पडली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनी विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेले चैतन्य लोप पावले होते. पण, हेच कार्यकर्ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची वाट पाहत होते. तसे म्हटले, तर सन २०२२ पासूनच ते तयारीला लागले होते. पण कोणत्या कोणत्या कारणाने सर्वोच्च न्यायालयात निकाल लागत नसल्याने कार्यकर्त्यांच्या तयारीला ब्रेक लागत होता. सर्वोच्च न्यायालयाने मार्ग मोकळा केल्याने आता पुन्हा एकदा कार्यकर्ते चार्ज होत आहेत. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना (ठाकरे) या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीने महाराष्ट्राचे मैदान मारले. पण, याच मैदानात विधानसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या महायुतीने महाविकास आघाडीचा अक्षरशः पालापाचोळा करुन टाकला. विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीतील नेते निवडणूक आयोगावर आक्षेप घेत राहिले. मतदानयंत्रांवर संशय घेण्यात आला. मतदान प्रक्रियेविषयी संशय व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात एक याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल आहे. परंतु, विधानसभा निवडणुकीतील पराभवातून महाविकास आघाडी बऱ्यापैकी सावरली असून, या आघाडीतील सर्वच पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष केंद्रीत केले आहे. स्थानिक निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढवायच्या की स्वतंत्रपणे, यावर निर्णय व्हायचा आहे. दुसरीकडे महायुती म्हणूनच निवडणुका लढविल्या जातील, असे संकेत मिळत आहेत. या निवडणुकांत स्थानिक मुद्दे प्रचारात येणार असले, तरी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात पुन्हा एकदा कलगीतुरा रंगणार असल्याचे दिसून येत आहे. महायुतीसोबत असलेले लहान पक्ष आणि महाविकाससोबत असलेले लहान पक्ष निवडणुकीत काही ठराविक ठिकाणी रंगत आणतील. याशिवाय महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी आणि इतर लहान पक्ष निवडणुकीत रंगत भरत भरतील. सध्या मे महिना सुरू असला, तरी पुढे येणाऱ्या पावसाळ्यातील सण-उत्सवांत राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे. चार महिन्यांत निवडणुका घ्यायच्या असून, गरज पडल्यास मुदत वाढवून घेण्याची मुभा सर्वोच्च न्यायालयाने दिली असल्याने तयारी करण्यास राज्य निवडणूक आयोगाला पुरेसा वेळ आहे. निवडणुका दिवाळीच्या आधी किंवा नंतर होण्याची दाट शक्यता दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाने आता निर्णय दिला असल्याने निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडण्याची शक्यता धूसर झाली आहे. कोरोना महामारी, त्यानंतर प्रभाग रचना आणि ओबीसींचे आरक्षण यांमुळे निवडणुका पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने केलेली प्रभाग रचना तयार केली होती. परंतु, त्यांचे सरकार मध्येच कोसळले. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने नवीन प्रभाग रचना केली. तिला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. आता सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असल्याने पुन्हा नव्याने प्रभाग रचना करायची की महायुती सरकारने केलेली प्रभाग रचना ठेवायची? यावर निवडणूक आयोगाला निर्णय घ्यावा लागेल. यावरुन पुन्हा वाद व्हायला नको, अशी अपेक्षा आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने निकालात काढला आहे. महाविकास आघाडीने वियुक्त केलेल्या आणि महायुती सरकारच्या कार्यकाळात अहवाल सादर करणाऱ्या या आयोगाने ओबीसींची संख्या ३७ टक्के दाखविली होती. मंडल आयोगानुसार ओबीसींची संख्या ५४ टक्के होती. परंतु काही भागात ओबीसींची संख्या कमी असल्याने आरक्षण कमी करण्यात यावे, अशी मागणी काहींनी केली होती. यावरुन ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने बांठिया आयोगाच्या आधीची स्थिती कायम ठेवण्याचा आदेश दिल्याने ओबीसींचे आरक्षण वाचले आहे. यामुळे आरक्षणाचा प्रश्न निकाली निघाला असून, राज्य निवडणूक आयोगाला पूर्वीच्या आरक्षणानुसार प्रभाग, गट, गणांचे आरक्षण निश्चित करावे लागणार आहे. त्यासाठी वेळ लागणार असल्यानेच चार महिन्यांची मुदत निवडणूक आयोगाला देण्यात आली असल्याचे दिसते. काहीही असले, तरी आता निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. निवडणुका रखडल्याने स्थानिक पातळीवरील लोकशाहीच स्थगित झाली होती. स्थानिक पातळीवरील लोकशाही बळकट राहावी यासाठी नियमितपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणे आवश्यक आहे. राज्यघटनेने दिलेल्या निर्देशांचा आदर होणे गरजेचे आहे. असे न्यायालयाने म्हटले आहे. राज्यातील २९ महानगरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समित्यांचा कारभार गेल्या दोन ते चार वर्षांपासून प्रशासकांच्या हाती आहे. याशिवाय १५०० ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय राजवट आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी नसल्याने सुविधांकडे प्रशासकीय राजवटीत नीट लक्ष दिले जात नाही, अशी तक्रार नेहमीची असते. गेल्या तीन-चार वर्षांपासून लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासनातील अधिकाऱ्यांची मनमानी लोकांना सहन करावी लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाही प्रक्रिया पुन्हा रुळावर येणार आहे. नवीन नेतृत्वाला संधी मिळणे, स्थानिक पातळीवरील प्रश्नांना आवाज मिळणे आणि ओबीसी समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळणे यासाठी या निवडणुका महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. येत्या चार महिन्यांत लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर स्थानिक लोकशाही मजबूत होईल. त्याआधी राज्यातील राजकीय वातावरणात चैतन्य निर्माण झालेले पाहायला मिळेल. सर्वच राजकीय पक्षांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, आता त्यांचे कार्यकर्ते कामाला लागणार आहेत. बैठका, जनसंपर्क यावर भर दिला जाईल. निवडणुका होणार असल्याने कामाला लागा असा सल्ला सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख देत असतात. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाआधीच कामाला लागा, असा सल्ला राजकीय पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिलेला होताच. आता तो प्रत्यक्षात आला असून, आता मेहनत घ्या, असे सांगितले जाईल.

# भारतीय ‘हिंदू सिंधीं’नी इस्त्रायलचा आदर्श ठेवावा





भारताभोवतालचे अस्वस्थ वर्तमान
हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

सिंध प्रांताचे पुरातन महत्त्व आपल्याला इसवी सन १९२० मध्ये मोहेंजोदाडो या ऐतिहासिक शहराच्या उत्खननाने समजले. यास आपण हडप्पा संस्कृती म्हणतो. असा मोठा दिव्य इतिहास असणारा सिंध प्रांत. केवळ धर्माच्या नावावर मुस्लिम धर्मीयांचे प्रमाण जास्त आहे म्हणून पाकिस्तानच्या घशात गेला आणि २५ टक्क्यांच्या आसपास असणारे हिंदू-बौद्धधर्मीय मंडळींना आपल्या मूळ मातृभूमीपासून विलग व्हावे लागले.

बहुसंख्य मुस्लिमधर्मीय लोकसंख्या असली तरीसुद्धा मोठ्या प्रमाणात समृद्ध हिंदू व्यापारीवर्ग व सुशिक्षित सिंधी लोक या प्रांतात होते. फाळणीच्या निर्णयानुसार सिंध प्रांत पाकिस्तानात जाणार, याची निश्चित झाल्यानंतर तिथे हिंदू व मुस्लिमेत्तर धर्मीयांवर हल्ले, लूटमार, हत्यासत्रं सुरू झाले. कुमारिका, तरुणींवर बलात्कार सुरू झाले. जीव वाचवून लाखो सिंधी बांधव उर्वरित भारतात निर्वासित म्हणून आले. सिंधी बांधवांनी व्यापार, उद्योग, समाजसेवा, साहित्य, शिक्षण, कला आदींमध्ये आपला पाय रोवला व स्वाभिमानाने उभे राहिले. महाराष्ट्रातील उल्हासनगर हे स्वतंत्र शहर फक्त सिंधी बांधवांसाठी कल्याणजवळ वसविले आहे. आज सर्वच क्षेत्रांत सिंधी बांधवांचे योगदान आहे. अगदी राजकारणातसुद्धा. भाजपचे मुख्य नेते लालकृष्ण अडवाणी, प्रसिद्ध वकील राम जेठमलानी हे ते नेते होत. १९४७ ते १९५० या काळात दहा ते बारा लाख सिंधी हिंदू बांधव भारतात आले. फाळणीच्या वेदना आजही सिंधी बांधव विसरलेला नाही. चौथ्या, पाचव्या पिढीतही या निर्वासित असलेल्या सिंधी बांधवांची तीच भावना आहे. आजच्या घडीला भारतामध्ये निर्वासित सिंधी बांधव तीस लाखांच्यावर आहेत. भारतातील सिंधी लोकसंख्येच्या ३५ टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. प्रत्येक रेल्वे स्टेशनच्या गावात सिंधी बांधवांची नगरे आहेत. पण आजच्या युवा पिढीत आपल्या पूर्वजांच्या मातृभूमीविषयी म्हणजे सिंध प्रांताविषयी ओढ, आतुरता किंवा त्यासंबंधीची आपसात होणारी चर्चा दिसून येत नाही. फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानमधील सिंध प्रांतातील लाखो सिंधी बांधव मिळेल त्या मार्गाने, मिळेल त्या वाहनाने, देशभर जिथे जिथे रेल्वे पोहोचली, स्टेशन आहेत, तिथे उतरून स्थायिक झाले. प्रत्यक्ष निर्वासित झालेले सिंधी बांधव जे आलेत, त्यांच्या भावना रक्तलांछित होत्या. फाळणीमुळे त्यांना हजारो किलोमीटर प्रवास करून अनोळखी प्रांतात राहावे लागले. आयुष्यभर फाळणीचे दुःखद अनुभव ते उराशी कवटाळूनच जगले. पुढील पिढी जी येथेच जन्माला आली. त्यांच्या बाबतीत तसे नव्हते. पहिल्या पिढीचे कमालीचे दुःखद अनुभव इतके टोकाचे होते, की त्या पिढीने ते पुढील पिढीला सांगण्याची हिंमतच केली नसावी. किंवा फाळणीचे कटू अनुभव घेतलेले प्रत्यक्ष निर्वासित आपल्या पाल्यापर्यंत हे पोहोचवण्यात सक्षम ठरले नाहीत. कारण काही सन्माननीय अपवाद वगळता, संपूर्ण भारतभर सिंधी बांधवांनी आपल्या मातृभूमीसाठी आंदोलन केल्याचे दिसले नाही. आलेल्या नवीन पिढीने आपल्या पूर्वजांच्या मातृभूमीविषयी प्रेमाने बोलण्याचे ऐकायला मिळाले नाही. सिंध मातृभूमीची ओढ संबंधित घटना पहावयास मिळाल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर सिंधी बांधवांनी इस्त्रायलचे उदाहरण समोर ठेवायला हवे.

जवळजवळ दोन हजार वर्षे आपल्या मातृभूमीपासून संपूर्ण जगात परागंदा झालेले, पसरलेले ‘ज्यू’ यांनी तेवढेच वर्षे मागच्या पिढीने पुढच्या पिढीला आपल्या जन्मभूमीविषयी, आपल्या मातृभाषेविषयी धगधगती ज्वलंत माहिती दिली. आपल्या स्वातंत्र्याची मशाल पिढ्यान्‌पिढ्या तेवत ठेवली. आपली मातृभाषा हीब्रु, येणाऱ्या प्रत्येक पिढीला शिकवली. ते सर्व मनी विश्वास बाळगून होते की, असा एक दिवस येईल, ज्या दिवशी आपण आपली स्वतःची मातृभूमी मिळवू. आणि पूर्ण जगभर परागंदा पसरलेले आपले सर्व बांधव तिथे जाऊन आपल्या स्वतःच्या मातृभूमीत राहू! हा ‘प्रण’ हा ‘दृढनिर्धार’ दोन हजार वर्षांमध्ये प्रत्येक मागील पिढी पुढच्या पिढीला करून देत होती. आणि शेवटी पिढ्यान्‌पिढ्यांची तपश्चर्या फळाला आली. आणि मे १९४८ म्हणजे, आपला भारत देश स्वतंत्र झाला त्याच पार्श्वभूमीवर संपूर्ण जगात पसरलेल्या ‘ज्यूं’चे स्वतंत्र सार्वभौम इस्त्रायल राष्ट्र जन्माला आले. अरबी पॅलिस्तिनी यांना हाकलून आपले स्वतंत्र राष्ट्र उभे केले. आज रोजी पूर्ण जगात प्रचंड राष्ट्राभिमानी, देशावर प्रेम करणारे नागरिक विचारले तर एकच नाव समोर येते इस्त्रायलचे नागरिक. स्वतंत्र राष्ट्र झाल्यापासून आजपावेतो ते पॅलेस्टिनींसोबत रात्रंदिन संघर्ष करीत आहेत. शेती, विज्ञान, युद्धसामग्री, विमाने आदी क्षेत्रात जगामध्ये नेत्रदीपक असे संशोधन करीत आहेत. एक ज्वलंत लढाऊ वृत्तीचा राष्ट्राभिमानी नागरिकांचा देश कसा असावा तर तो इस्त्रायलसारखाच! प्रत्यक्ष फाळणीचे दाहक अनुभव घेतलेली पिढी आज वयाच्या ८० च्या पुढे असेल. ज्यांना ते प्रत्यक्ष पाहिलेले कटु अनुभव आठवतात अशी पिढी वयाच्या ९० च्या घरात असेल.


सिंधी बांधवांची ही चौथी-पाचवीच पिढी असेल. याचा अर्थ असा नाही की, त्यांनी इस्त्रायलसारखेच करावे. पण संपूर्ण देशातील इतर नागरिकांसमोर, म्हणजे त्यांच्या भावना तर समोर यायला हव्यात. पुढच्या पिढीपर्यंत तर या फाळणीच्या वेदना पोहोचायला हव्यात. बलुचिस्तानचे नागरिक जसे प्रकटपणे भारतामध्ये समावेश व्हावा म्हणून उघड मागणी करत आहे. तसे ‘देशाने सिंध प्रांत मिळवावा व आमचे चार-पाच पिढ्यांचे निर्वासित जगणे संपवावे,’ अशी जाहीर मागणी करण्यास काय हरकत आहे. जनतेच्या जेवढ्या प्रखर भावना असतील त्यावर देशाच्या राजकारणाची दिशा आखणी होत असते. काही प्रयत्न झाले सिंध देश मागणीचे. भारतीय सिंधी निर्वासित बांधवांनी सिंध प्रांताची मागणी स्वातंत्र्यानंतरच्या काळात वेळोवेळी विविध स्वरूपात केलेली आहे. आपल्या सांस्कृतिक, भाषिक आणि सामाजिक अस्तित्वासाठी आवाज उठवला आहे. भारतात सिंधी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश असावा, अशी मागणी अनेकदा झाली. ५० च्या शेवटच्या दशकात व साठच्या प्रारंभी पाकिस्तानचा कब्जा असलेला सिंधू प्रांत मुक्त करावा यासाठी सिंध स्वातंत्र्य चळवळ अंतर्गत आंदोलने, मोर्चे काढण्यात आले. त्यामध्ये मुख्यतः उल्हासनगर, मुंबई, गुजरातच्या कच्छ भागात या आंदोलनाचा समावेश होता. या मागणीचा उद्देश सिंधी समाजाची संस्कृती, भाषा, शिक्षण, व्यवसाय आणि राजकीय हक्क सुरक्षित ठेवणे हा होता. उल्हासनगरमध्ये सिंधूस्थान आंदोलन बरेच दिवस चालले. सिंधी बांधवांनी हे मातृभूमी मुक्तीचे आंदोलन सतत पेटवून ठेवले नाही. केंद्र सरकारवरही त्याचा फारसा परिणाम झाला नाही. आठव्या अनुसूचित सिंधी भाषेचा समावेश आहे इतकेच. आमच्या राष्ट्रगीतात सिंध शब्दाचा उल्लेख आहे. पण आमच्या भारतात ना सिंध आहे ना सिंधू नदी.

भारतातील सिंधी निर्वासितांनी पाकिस्तानातील सिंध प्रांत भारतात समाविष्ट करण्याची मागणी केली होती. या चळवळीमध्ये काही प्रमुख नेत्यांचा सहभाग होता. यामध्ये ‘दयानंद आर्य’ हे प्रमुख सिंधी नेते होते. याप्रमाणेच सिंध प्रांत भारतात मिळावा यासाठी सिंधी नेते ‘अचलचंद आहुजा’ यांनी खूप आंदोलने केली. अचलचंद आहुजा यांचा सिंधी समाजावर फार मोठा प्रभाव होता. त्यांनी सिंधी समाज, भाषा, संस्कृती व परंपरा याकरिता जिवापाड प्रयत्न केलेच. महत्त्वाचे म्हणजे सिंधू स्थान चळवळीद्वारे भारत सरकारकडे सिंधू प्रांताच्या पुनर्निर्मितीची मागणी केली. असेच सिंधी समाजाचे शक्तिशाली नेते यांनी संसदेत आवाज उठवला ते ‘प्रकाश चंद्र पाटणी’. सिंध प्रांताच्या पुनर्वापसीसाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. शंकरबाई या सिंधी महिलेने स्त्रीवादी दृष्टिकोनातून सिंध प्रांताचा भारतात समावेश होण्यासाठी कार्य केले. सिंध प्रांताच्या पुनर्रचनेची मागणी करणारे विजय मल्होत्रा यांचे कार्य नमूद करण्यासारखेच आहे. अशाच प्रकारचे कार्य विदर्भातील सिंधी नेते जनवाणी यांनी स्वतंत्र हिंदुस्थानचा नकाशा तयार करून बुलढाणा जिल्ह्यात आंदोलन केले होते. त्यांना अटकही करण्यात आली होती. भारतातील सिंधी समाजाच्या नेत्यांनी सिंध प्रांताच्या भारतात समावेशासाठी विविध चळवळी राबवल्या. संस्कृती, भाषा आणि सामाजिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी अनेक आंदोलने केली. तरीही भारत सरकारने या मागणीला मान्यता दिली नाही. तरीही सिंधी बांधव, सांस्कृतिक अस्तित्वासाठीची धडपड आणि भाषा आणि संस्कृती सांभाळून आहेत. सिंध प्रांत भारतात मिळवण्यासाठीच्या आंदोलनात सिंदुस्थान चळवळीला नेते लाभले. त्यांनी त्यांच्या परीने प्रयत्न केले. पण सर्वंकश संपूर्ण भारतीय स्तरावर एकाच वेळी भल्या मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभे राहू शकले नाही याची खंत वाटते.

# ‘रवींद्र संगीत’चे रचेते गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची ७ मे २०२५ रोजी १६४ वी जयंती. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर हे भारताचे व आशिया खंडातील नोबेल पुरस्कार मिळवणारे पहिले भारतीय कवी. संपूर्ण जगात आजही रवींद्रनाथ टागोर हे नाव शिक्षणात मूलभूत संशोधन व प्रयोग करून मध्ययुगीन शिक्षणव्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणाऱ्या रुसो, पेस्तोलॉझी, फ्रोबेल या तत्त्ववेत्यांच्या बरोबरीने अत्यंत आदराने घेतले जाते. जगातील अनेक देशांत रवींद्रनाथांची स्मारके, पुतळे आहेत. बंगाली साहित्यावर विशेष प्रभुत्व ठेवणारे रवींद्रनाथ यांच्या गीतांजली व जन - गण-मन या रचना प्रसिद्ध आहेत. भारताचे राष्ट्रगीत (जन-गण) तसेच बांगलादेशाचं राष्ट्रगीत (आमार सोनार बांगला) या दोन्ही रचना रवींद्रनाथ यांच्याच आहेत.

रवींद्रनाथ एक महान कवी तर होतेच, पण थोर लेखक, नाटककार, चित्रकार, संगीतकार होते आणि याहून मोठे शिक्षणतज्ज्ञ होते. रवींद्रनाथांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव देवेंद्रनाथ टागोर आणि आईचे नाव शारदा होते. १९०१ साली रवींद्रनाथांनी शांतिनिकेतन ही शाळा सुरू केली. निसर्गाच्या सान्निध्यात नैसर्गिक पद्धतीने अस्सल भारतीय संस्कृतीचे, भारताच्या विविधतेचे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुलांच्या मातृभाषेतून शिक्षण. स्वतः चे इंग्रजी भाषेवर मोठे प्रभुत्व असूनही त्यांनी मातृभाषेतून शिक्षणाला महत्त्व दिले. विद्यार्थ्यांसाठी रवींद्रनाथांनी असंख्य कविता, गाणी, कथा, नाटके लिहिली. त्यांनी त्यावेळी लहान मुलांसाठी लिहिलेली गाणी, कविता आजही बंगाली शाळांमधून शिकविल्या जातात. त्यांनी निर्माण केलेले संगीत ‘रवींद्र संगीत’ या नावाने भारतीय संगीतातील एक प्रकार म्हणून आजही ओळखला जातो.



अशा या शांतिनिकेतनमध्ये सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडू लागले. मात्र, ही शाळा ब्रिटिशांना हवे असलेले सुशिक्षित गुलाम तयार करत नसल्याने ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना हे शिक्षण पसंत नव्हते. त्यामुळे त्यांनी शांतिनिकेतन बंद पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. तरीही रवींद्रनाथांनी शांतिनिकेतन सुरू ठेवली, वाढवली. रवींद्रनाथांनी आपल्या जवळची सर्व संपत्ती शाळेसाठी खर्च केली. सर्वकाही संपले तेव्हा रवींद्रनाथांच्या पत्नी मृणालिनी देवी यांनी आपल्या अंगावरचे दागिनेही शाळेसाठी विकले. रवींद्रनाथांनी नोबेल पुरस्काराची मिळालेली रक्कमही त्यांना त्यावेळी निकड असलेल्या शांतिनिकेतनमधल्या गटारांच्या बांधकामावर खर्च केली.

शांतिनिकेतन व विश्वभारती या त्यांनी स्थापन केलेल्या जगप्रसिद्ध संस्था. या शिक्षण संस्थांमुळे भारतीय शिक्षण क्षेत्रात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. रवींद्रनाथांची समग्र साहित्यसंपदा अनेक देशांत पसरली आहे. त्यांना गुरुदेव असे संबोधले जाते.

पंकज पाटील
९८५०४३०५७९

१९१३ मध्ये रवींद्रनाथांना जागतिक प्रतिष्ठेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सर्व जगाचे लक्ष त्यांच्याकडे गेले. जगात सर्वत्र त्यांच्या कार्याची, साहित्याची चर्चा होऊ लागली. त्यांचा ठिकठिकाणी सत्कार होऊ लागला. लोकलज्जेस्तव ब्रिटिशांनीही कलकत्ता विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात रवींद्रनाथांना बोलावून त्यांचा सत्कार आयोजित केला. अतिशय उच्च इंग्रजीतून कथा, कविता साहित्य निर्मिती करणाऱ्या रवींद्रनाथांनी या सत्कारावेळी विद्यापीठातील ब्रिटिशांच्या ऐतिहासिक प्रथा, संकेत, औपचारिकता मोडून बंगालीतून भाषण केले. आणि किमती झुंबरांनी सजवलेल्या वैभवशाली दीक्षांत सभागृहात बंदी असलेल्या बंगाली भाषेचे शब्द प्रथमच दुमदुमले. ब्रिटिशांना ते शांतपणे ऐकावे लागले. रवींद्रनाथांनी त्यांना सुनावले, “तुमच्या इंग्रजी शिक्षणाचा भारतातील लोकांना काहीही उपयोग नाही. इथल्या विद्यार्थ्यांना आपल्या भोवतालच्या समाजाशी एकरूप होण्याचे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी मातृभाषेतून शिक्षणाची गरज आहे.” विद्यार्थ्यांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला.

७ ऑगस्ट १९४१ रोजी गुरुदेवांचा मृत्यू झाला. आज सर्व जग रवींद्रनाथांना मानते ते त्यांच्या निसर्गवादी शैक्षणिक विचार तसेच मातृभाषेतून शिक्षणाच्या वैश्विक तत्त्वज्ञानासाठी. जगातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षण संशोधक, शिक्षण अभ्यासक भारताला रवींद्रनाथांचा देश म्हणून ओळखतात. रवींद्रनाथांनी जगाला दिलेल्या मातृभाषेतून शिक्षणाच्या विचारांचे अनुसरण करून जगाने प्रचंड प्रगती केली. जगातील जवळजवळ सर्वच देशांनी मातृभाषेतून शिक्षण त्यांच्या देशातील शेवटच्या माणसापर्यंत केवळ शिक्षणच नव्हे तर विज्ञान, संशोधनही पोहोचवले. शिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत अशा दऱ्या बुजवल्या. अज्ञानाचा अंधःकार दूर केला. कित्येक मागास देश मातृभाषेतून शिक्षणाच्या अंगीकाराने विकसित झाले, अतिप्रगत, महासत्ता बनले. मातृभाषेतून शिक्षणामधून प्रगतीची, विकासाची वाट चोखाळण्यास शिकवणाऱ्या रवींद्रनाथांना प्रणाम.

# युवक समृद्ध तर देश समृद्ध

कोणत्याही देशाची युवा पिढी सक्षम, सुदृढ, निकोप निरोगी व कर्तृत्वसंपन्न असेल तर तो देश जगाच्या पाठीवरील समृद्ध देश समजला जातो. देशातील सक्षम, सुदृढ युवक त्या-त्या देशाची अनमोल संपत्ती असतात.ज्या देशाचे युवक संघटित, एकजूट व कोणत्याही आपत्तीला सामोरे जाण्यासाठी सदैव तत्पर असतात, त्या देशाकडे कोणताही देश वाकड्या नजरेने पाहत नाही. उलट अशा देशाच्या युवकांपासून एकीचे पाठ घेतात.

भारतातील युवा वर्ग हा उद्यमी, उद्योगप्रिय व कर्तृत्ववान आहे. भारतीय युवकांच्या अंगी धैर्य, चिकाटी, प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा आत्मविश्वास आहे. भारतीय युवा वर्ग हा धैर्यशील व संयमी आहे. आज सुशिक्षित बेरोजगारीमुळे युवक काहीसा निराश व हताश आहे, मात्र मनाने अजूनही खचलेला नाही. भारतीय युवक आपल्या अंगच्या कौशल्य व कर्तबगारीने आलेल्या प्रसंगांना सामोरे जाऊन आपल्या बुद्धी कौशल्याने स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता राखून आहे.

युवावर्गाने आशादायी असावे. त्यांनी आपल्या कर्तृत्व व कार्यशीलतेवर विश्वास ठेवावा. युवावर्गाकडे ज्ञान, माहिती व



आत्मविश्वास, दृढ निश्चय असे उत्कृष्ट गुण असतात. त्यामुळे त्यांच्यावर सोपविलेले कार्य ते सहज पार पाडू शकतात. त्यांच्यावर टाकलेली जबाबदारीची कामेही युवक चांगल्या प्रकारे पार पाडू शकतात. युवकांना योग्य व दिशादर्शक मार्गदर्शन समाजातील अनुभवसंपन्न व्यक्तींनी करण्याची नितांत गरज आहे. आजच्या युवकांना कुटुंब, समाज, शैक्षणिक संस्था व सामाजिक कार्यकर्ते व हितचिंतक यांनी सकारात्मक व योग्य मार्गदर्शन करून युवा मने समृद्ध करावीत. युवावर्गानेही आपली मने विचलित होऊ न देता व कोणताही गैरमार्ग न स्वीकारता सुमार्ग स्वीकारून स्वतः समृद्ध व सक्षम व्हावे व देशही समृद्ध करावा.

**- धोंडीरामसिंह राजपूत, ९४२१३१२२४४**


# एका मिनिटाचा आदेश!

निर्णय घ्यायला आणि आदेश द्यायला एक मिनिटही पुरेसा आहे. धर्माधिष्ठित राज्यात धर्मातील नैतिक मूल्ये शिक्षणातून सांगितली गेल्यामुळे राष्ट्रातील नागरिक, राज्यकर्ते, न्यायपालिका आणि पोलीस-सैन्य या नागरिकांच्या सुरक्षा यंत्रणांना धर्माच्या बाजूने म्हणजेच नैतिकतेच्या बाजूने तत्काल निर्णय देणे शक्य झाले असते.

आपल्या धार्मिक कर्तव्याची तर दूर, पण नैतिक कर्तव्यांच्यासाठीही ठोस भूमिका घेण्यासाठी झगडावे लागत असेल तर आजपर्यंत आपले धर्मग्रंथ, ऋषीमुनी, संत, हिंदुत्वनिष्ठ विचारवंत यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या राज्यकर्त्यांची हिंदूंच्या संरक्षणाची हमी देता येत नसेल तर आपल्या वयाची इतकी तपश्चर्या ज्यासाठी झाली किंवा होत आहे ते व्यर्थ गेले, असे आपले पूर्वज म्हणतील. केंद्र शासनाने बंगालमधील सातत्याने होणाऱ्या हिंदू नरसंहारावर, पलायनावर तेथे तत्काळ राष्ट्रपती राजवट आणायला हवी. बंगालच्या मुख्यमंत्र्यांची राजकीय सभागृह किंवा सभागृहाबाहेरील चिथावणीखोर भाषणांसाठी त्यांना राजदंड म्हणून सैन्याने अटक करावी. सैन्याला पीडित हिंदूंच्या रक्षणासाठी आणि जिहादी, दहशतवादी नागरिकांच्या संहारासाठी तत्काळ पाचारण करावे. ही धमक प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि धर्मनिष्ठेमुळेच येऊ शकते. आपली भूमिका स्पष्ट असेल तर कुठलेही नॅरेटिव्ह आड येत नाही. निर्णय एका मिनिटाच्या आत देता येतो.

**भूषण वाळगूसकर, डोंबिवली**

# देहबुद्धीचा त्याग करावा




मानाला कारण अभिमान होय. मी मोठा, असे मनाने घेतले म्हणजे मानाची गरज लागते. हा अभिमानच भगवंताच्या आणि आपल्यामध्ये आड येतो. हा अभिमान घालवायला गुरुआज्ञेत राहणे, त्यांना शरण जाणे आणि त्यांनी सांगितलेली साधने करणे हे उपाय आहेत. पण ही साधने निरभिमानाने झाली पाहिजेत. हा अभिमान फार सूक्ष्म असतो. मी गुरुआज्ञेत राहतो, त्यांनी सांगितलेली साधने करतो, आता माझा अभिमान गेला, हे म्हणणेसुद्धा अभिमानाचेच बोलणे होय. खरे पाहता, अभिमान बाळगण्यासारखे आपल्याजवळ आहे तरी काय? शक्ती, की पैसा, की कीर्ती? जगात आपल्यापेक्षा कितीतरी लोक मोठे आहेत. पण मौज अशी की, भिक्षा मागणाऱ्यालासुद्धा मोठा अभिमान असतो. मी अमक्याच्या इथे भिक्षेला गेलो होतो, त्याने मला हट्‌ म्हटले तेव्हापासून त्याचा उंबरठा नाही चढलो मी असे तो म्हणतो. तेव्हा हा अभिमान आणि अपमान ही काय चीज आहे याचा शोध आपण घ्यायला पाहिजे. याला अगदी मूळ कारण देहबुद्धी. ही देहबुद्धी नाहीशी झाली पाहिजे. मला लोकांनी बरे म्हणावे, मान द्यावा, शिव्या दिल्या तर वाईट वाटते, हे देहबुद्धीला खत घालण्यासारखे आहे. चांगले-वाईट, मान-अपमान सर्व देवाला अर्पण करावे. वस्तुतः कर्तेपणच त्याच्याकडे सोपवावे. म्हणजे त्या कृत्याचे परिणाम मनावर होऊ देऊ नयेत. ही देहबुद्धी, हा अभिमान, जायला सद्‌गुरूचे होऊन राहावे. सद्‌गुरू तुम्हाला नकळत तुमचा अभिमान दूर करतील.

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) | गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### मुख्यमंत्री फडणवीस यांची धोत्रे यांच्या चित्रप्रदर्शनाला भेट

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रसिद्ध चित्रकार शशिकांत धोत्रे यांच्या नवनिर्मित चित्रकृतींच्या प्रदर्शनास भेट दिली. या प्रदर्शनात त्यांनी धोत्रे यांच्या विविध कलाकृतींचे मनापासून कौतुक केले आणि त्यांच्या अप्रतिम चित्रशैलीला दाद दिली. चित्रकार शशिकांत धोत्रे यांच्या कलाप्रदर्शनास भेट देतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेथेच उपस्थित असलेल्या सजना या आगामी मराठी चित्रपटाच्या टीमकडून चित्रपटाचा टीझरही पाहिला. टीझर पाहिल्यानंतर त्यांनी सिनेमाच्या संकल्पनेचे कौतुक करत संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. शशिकांत धोत्रे यांचे चित्रकलेतील योगदान हे महाराष्ट्राच्या कलासंस्कृतीसाठी अत्यंत मोल्यवान आहेच, पण त्याचबरोबर सध्या त्यांच्या आगामी चित्रपटाची म्हणजेच 'सजना'ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहे. प्रेमाच्या विविध पैलूंना उजागर करणाऱ्या आणि प्रेक्षकांना एक नवीन सिनेमॅटिक अनुभव देणाऱ्या या चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे यांनी केलं आहे. हा सिनेमा २३ मे २०२५ पासून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज आहे.




### 'झिम्मा-२' १८ मे रोजी स्टार प्रवाहवर

**मुंबई :** 'झिम्मा २' हा बॉक्स ऑफिस गाजवणारा महाराष्ट्राचा हा लाडका चित्रपट महाराष्ट्राच्या नंबर वन वाहिनीवर पहाता येणार आहे. १८ मे रोजी सायंकाळी ७ वाजता स्टार प्रवाहवर 'झिम्मा २' चा वर्ल्ड टेलिव्हिज प्रीमियर होणार आहे. इरावती कर्णिक लिखित आणि हेमंत ढोमे दिग्दर्शित या चित्रपटसुद्धा पहिल्या भागाप्रमाणेच प्रत्येकाच्या मनात एक नवीन उमेद निर्माण करेल यात शंका नाही. दर्जेदार मालिकांप्रमाणेच अनेक दर्जेदार चित्रपट पहिल्यांदा स्टार प्रवाह वाहिनीवर पहायला मिळतात.

### 'अमायरा'चे शीर्षक गीत प्रदर्शित

**मुंबई :** मुक्ता आर्ट्स निर्मित आणि लोकेश गुप्ते दिग्दर्शित "अमायरा" या बहुप्रतीक्षित मराठी चित्रपटाचं शीर्षक गीत आज प्रदर्शित करण्यात आलं आहे. 'अमायरा' या गाण्यात अजिंक्य देव आणि सई गोडबोले यांची जोडी अनोख्या आणि हलक्या मूडमध्ये दाखवली आहे. सई आणि राजेश्वरी सचदेव या दोघांची जोडी एक आई आणि मुलगी म्हणून आपण पाहू शकतो. गाण्यात सई, अजिंक्य देव आणि पूजा या दोघांशी बिनधास्तपणे खेळते, शरारत करते आणि आयुष्यातील छोटे आनंद साजरे करते. प्रत्येक टॅलेंटेड कलाकाराची ऊर्जा या गाण्यातून, कॅमेरा आणि सुरांच्या माध्यमातून प्रकटते, जे चित्रपटाच्या मूडला सजीव बनवतात. गीतकार आणि संगीत दिग्दर्शकाच्या अप्रतिम सर्जनशीलतेतून जन्मलेलं हे गाणं, नायिका सई गोडबोले हिच्या भावविश्वात डोकावण्याची संधी देतं. या गीतात प्रेम, आणि आशेचा सुरेख संगम आहे, जो प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करतो. अमायरा गाण्याचे संगीत दिग्दर्शक अभिषेक थोंबू आहेत. तर गाण्याचे बोल रोहित राऊतने लिहिले आहेत. अभिनेत्री सई गोडबोले हिने स्वतः आणि श्याम राऊतने आपल्या मधुर आवाजाने हे गीत अधिकच प्रभावी केले आहे.




### 'बंजारा' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई :** सिक्कीमच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर चित्रित झालेल्या 'बंजारा' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, या ट्रेलरमध्ये तीन मित्रांचा भावनांनी भरलेला आणि रहस्यांनी गुंतलेला प्रवास उलगडताना दिसतो. १६ मे रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली आहे. चित्रपटाबद्दल स्नेह पोंक्षे म्हणतो, आपण सगळेच खरंतर 'बंजारा' आहोत. कधी कधी निश्चित स्थळी पोहोचण्याचा नादात आपण प्रवासाचा आनंदच लुटत नाही. आयुष्यात या गोष्टी किती महत्त्वाच्या असतात, हेच दाखवण्याचा प्रयत्न 'बंजारा'मध्ये करण्यात आला आहे. सर्वच वयोगटाला हा चित्रपट जवळचा वाटेल. प्रस्तुतकर्ता शरद पोंक्षे म्हणतात, प्रेक्षकांना जशी चित्रपटाची उत्सुकता आहे, तशीच आम्हालाही आहे. 'बंजारा' मध्यमवयीन प्रेक्षकांना आपल्या जुन्या मैत्रीची आठवण करून देईल. मोरया प्रॉडक्शन्स प्रस्तुत या चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शन स्नेह पोंक्षे यांचे आहे. प्रमुख भूमिकांमध्ये शरद पोंक्षे, भरत जाधव, सुनील बर्वे, स्नेह पोंक्षे, सक्षम कुलकर्णी आणि आदित्य धनराज झळकणार असून, निर्मिती रोहिणी विजयसिंह पटवर्धन यांची आहे.

### सर्वात उंच शैक्षणिक ब्लॉकचे उद्घाटन

**मुंबई :** भारतातील सर्वात उंच शैक्षणिक ब्लॉक असलेल्या महात्मा गांधी शैक्षणिक ब्लॉकच्या भव्य उद्घाटनासह व्हीआयटी-एपी विद्यापीठाने एक महत्त्वाचा टप्पा गाठला. ४५ मीटर उंच आणि ७.६८ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेला महात्मा गांधी शैक्षणिक ब्लॉक आधुनिक स्थापत्य आणि शैक्षणिक नवोपक्रमाचा पुरावा आहे. या अत्याधुनिक सुविधेत प्रगत वर्गखोल्या, व्याख्यान हॉल, गॅलरी जागा आणि ७०० आसनांचे सभागृह समाविष्ट आहे. भारतातील नंबर १ मूव्ही इव्हेंट्स आणि प्रमोशनल कंपनी श्रेयस मीडियाने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित केला.

# वर्षअखेर भारत चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था?

## भारत सध्या ४.३ ट्रिलियन डॉलर्ससह जगात पाचव्या क्रमांकावर

**नवी दिल्ली : डिसेंबर २०२५ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू शकते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जागतिक आर्थिक आकडेवारीनुसार, भारत सध्या ४.३ ट्रिलियन डॉलर्ससह जगात पाचव्या क्रमांकावर आहे. त्याच वेळी, जपानचा जीडीपी सध्या ४.४ ट्रिलियन आहे. आयएमएफच्या मते, जर सध्याचा विकास दर असाच चालू राहिला तर भारत २०२८ पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल आणि जर्मनीला (जीडीपी ४.९ ट्रिलियन) मागे टाकेल.**



दहा वर्षांत भारताची अर्थव्यवस्था दुप्पट झाली आहे. अर्थव्यवस्थेची ही वाढ जगात सर्वात वेगवान आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार, गेल्या दशकात भारताचा जीडीपी वाढला आहे. सध्या भारताचा जीडीपी ४.३ ट्रिलियन डॉलर्स आहे. तर २०१५ मध्ये तो २.१ ट्रिलियन डॉलर्स होता. भारताचा जीडीपी विकासदर असाच राहिला तर दर दीड वर्षाने अर्थव्यवस्थेत १ ट्रिलियन डॉलर्सची भर पडेल.

यासह भारत २०३२ पर्यंत १० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनू शकतो. भारताने जगातील इतर प्रमुख अर्थव्यवस्थांना मागे टाकले आहे, ज्यात चीन (७६ टक्के), अमेरिका (६६ टक्के), जर्मनी (४४टक्के), फ्रान्स (३८टक्के) आणि युके (२८टक्के) यांचा समावेश आहे. आकारमानानुसार अव्वल दोन अर्थव्यवस्था अमेरिका (३०.३ ट्रिलियन) आणि चीन (१९.५ ट्रिलियन) यांनी व्यापल्या आहेत. परंतु, कर्जाच्या बाबतीत, भारत दोन्ही देशांपेक्षा मजबूत स्थितीत आहे.

मार्च २०२५ पर्यंत अमेरिकेचे कर्ज ३६.२२ ट्रिलियन आहे. चीनचे कर्ज २.५२ ट्रिलियन डॉलर्स इतके आहे. तर भारतावर ७१२ अब्ज डॉलर्सचे कर्ज आहे. जीडीपी कमी करण्यासाठी किंवा वाढवण्यासाठी चार महत्त्वाचे इंजिन आहेत. पहिले म्हणजे, तुम्ही आणि मी. तुम्ही जे काही खर्च करता ते आपल्या अर्थव्यवस्थेला हातभार लावते. दुसरे म्हणजे खासगी क्षेत्राची व्यवसाय वाढ.

जीडीपीमध्ये त्याचा वाटा ३२% आहे. तिसरा म्हणजे सरकारी खर्च. याचा अर्थ सरकार वस्तू आणि सेवांच्या उत्पादनावर किती खर्च करत आहे. जीडीपीमध्ये त्याचा वाटा ११% आहे. आणि चौथे म्हणजे, निव्वळ मागणी. यासाठी भारताची एकूण निर्यात एकूण आयातीतून वजा केली जाते, कारण भारतात आयात निर्यातीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे त्याच्यावर नकारात्मक परिणाम होतो.

## वॉरेन बफे बर्कशायर हॅथवे ब्रेक्झ. एन कंपनीच्या सीईओपदावरून पायउतार

**न्यूयॉर्क :** जगातील पाचवे श्रीमंत व्यक्ती आणि दिग्गज गुंतवणूकदार वॉरेन बफे यांनी सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. वॉरेन बफे यांनी बर्कशायर हॅथवे ब्रेक्झ. एन कंपनीच्या सीईओपदावरून पायउतार होण्याची घोषणा केली. वयाच्या ९४ व्या वर्षी वॉरेन बफे यांनी कंपनीची जबाबदारी दुसऱ्या व्यक्तीकडे सोपवण्याचा निर्णय घेतला.

वॉरेन बफे यांनी सीईओपदावरून पायउतार होण्याची घोषणा ओमाहामध्ये बर्कशायरच्या वार्षिक बैठकीत केली. ते म्हणाले की, मला वाटतंय की कंपनीला नवा मुख्य कार्यकारी अधिकारी मिळायला हवा. आता वेळ आलीय की या वर्षाच्या अखेरीस या पदावरून निवृत्त होईल. म्हणजेच वॉरेन बफे २०२५ च्या शेवटी बर्कशायर हॅथवे सोडतील. २०२५ च्या अखेरीस ग्रेग एबेल यांनी जबाबदारी स्वीकारायला हवी, असं ते म्हणाले. ग्रेग एबेल सध्या




या कंपनीत उपाध्यक्षपदावर कार्यरत आहेत. वॉरेन बफेनंतर ते सीईओ होतील. ग्रेग एबेल यांचं वय ६२ वर्षे असून, ते २०१८ पासून बर्कशायरचे उपाध्यक्ष असून, नॉन विमा व्यवसायाचे नेतृत्व करत आहेत. २०२१ पासूनच वॉरेन बफे यांनी उत्तराधिकारी म्हणून ग्रेग एबेल यांना नामांकन दिले होते. बर्कशायर हॅथवेचं बाजारमूल्य १.१६ ट्रिलियन डॉलर आहे. वॉरेन बफे यांनी बर्कशायरमध्ये शेअरधारक राहणार असल्याचं सांगितलं. सर्व निर्णय ग्रेग एबेल घेणार असले तरी त्याला सल्लागार म्हणून काम करणार असल्याचं वॉरेन बफेंनी म्हटलं. वॉरेन बफे यांनी त्यांच्याकडे असलेल्या शेअरची विक्री करणार नाही तर ते शेवटी दान करणार असल्याचं सांगितलं. वॉरेन बफे यांनी वयाच्या ९४ व्या वर्षी निवृत्ती घेणे हे एका युगाचा शेवट मानला जात आहे.

# शासकीय कामात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अनेक टूल्स उपलब्ध

### कृषी आयुक्त सूरज मांढरे

**मुंबई :** शासकीय कामात माहितीचे व्यवस्थापन, वेळेचे नियोजन, कामाचे निरीक्षण आणि अहवाल व्यवस्थापन करण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अनेक टूल्स उपलब्ध आहेत. या टूल्सचा वापर केला तर शासकीय कामकाजात गतिमानता येईल, असे मत कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी व्यक्त केले.



प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी "टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक" अंतर्गत मंत्रालयामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या विषयावर कृषी आयुक्त सूरज मांढरे आणि महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास नाईक यांचे व्याख्यान झाले. यावेळी महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील निवासी आयुक्त आर. विमला यांसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले की, गुगल कीप, एव्हरनोट, मायक्रोसॉफ्ट वन नोट, गुगल ड्राइव्ह, ड्रॉपबॉक्स, क्लिकअप, मायक्रोसॉफ्ट टू डू, गुगल कॅलेंडर, गुगल शीट्स, टेलिग्राम याचा वापर करून आपले काम अधिक गतिमान करता येईल. टेक्नॉलॉजी ही अशी गोष्ट आहे जी कोणताही भेदभाव न करता सर्वांना एका समान पातळीवर आणते. शरीर, रंग, जात, धर्म यांचा फरक न बघता ती सर्वांना उपयुक्त ठरते. मायक्रोसॉफ्ट वन नोट या टूल्सचा जर वापर केला तर शासनाचे अनेक प्रश्न सुटतील. पेन्सिल असलेले टॅब्लेट कामकाजात खूप उपयुक्त आहेत. हार्ड वर्कपेक्षा स्मार्ट वर्कवर भर दिला पाहिजे. शासनाचे काम करत असताना स्वतःदेखील तंत्रज्ञान अवगत करणे अपेक्षित आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

'महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिस' संकेतस्थळाची माहिती देताना श्री. नाईक यांनी सांगितले की, या प्लॅटफॉर्मवर नागरिक कोणत्याही विभागासंदर्भात प्रश्न विचारू शकतात व अधिकाऱ्यांकडून थेट उत्तर मिळवू शकतात. त्याचबरोबर, 'महासंपर्क' ॲप्लिकेशनच्या माध्यमातून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी, लोकप्रतिनिधी यांची माहिती सुलभपणे मिळू शकते, याबाबतची माहितीही त्यांनी यावेळी दिली. प्रशासकीय यंत्रणेते एखाद्या समस्येवर उपाय शोधणाऱ्या तांत्रिक गरज आहे आणि यासाठी तंत्रज्ञान ही प्रभावी साधने उपलब्ध करून देते, असेही श्री. नाईक यांनी सांगितले. महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या विविध योजनांची माहिती देत त्यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम व तंत्रज्ञान यांची सांगड घालण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

## एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंडची उत्कृष्ट कामगिरी

**नाशिक :** एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंड (हा फंड) - जो लार्ज-कॅप, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप समभागांमध्ये गुंतवणूक करणारी एक ओपन-एंडेड डायनॅमिक इक्विटी योजना आहे - या योजनेने विविध बाजारचक्रांमधून गुंतवणूकदारांसाठी दीर्घकालीन संपत्ती निर्माण केली आहे. १ जानेवारी १९९५ रोजी स्थापनेपासून या फंडाने ३१ मार्च २०२५ पर्यंत १८.८२% वार्षिक सरासरी संमिश्र वाढ दर (सीएजीआर) नोंदवली आहे. स्थापनेपासून १,००,००० रुपयांची गुंतवणूक सुमारे १.८४ कोटींवर पोहोचली असती, जी बेंचमार्क निफ्टी ५०० टीआरआय पेक्षा १.५१ कोटींनी अधिक आहे. तसेच, जर स्थापनेपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व्यवसायदिवशी १०,००० रुपयांची ची एसआयपी (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) केली गेली असती (एकूण गुंतवणूक ३६.२० लाख रुपये), तर ती गुंतवणूक ३१ मार्च २०२५ पर्यंत सुमारे २०.२४ कोटी रुपये झाली असती.

मागील तीन दशकांमध्ये या फंडाने अनेक बाजारचक्रांचा यशस्वीपणे सामना करत, मजबूत मूलभूत तत्त्वांवर आधारित गुणवत्तापूर्ण कंपन्यांमध्ये दीर्घकालीन वाढीची क्षमता पाहणारी गुंतवणूक तत्त्वज्ञान प्रभावीपणे सादर केली आहे. उच्च गुणवत्ता असलेल्या व्यवसायांवरील भर, मूल्यांकनातील शिस्त आणि दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टिकोन यामुळे हा फंड गुंतवणूकदारांमध्ये एक विश्वासार्ह पर्याय ठरला आहे.

एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंडने ४ मुख्य स्तंभांवर आधारित एक संरचित जोखमीचे व्यवस्थापन दृष्टिकोन स्वीकारला आहे. नियामक आणि आंतरिक जोखीम सुरक्षा नियमांचे पालन करून फंड आपल्या नियुक्त्या आणि उद्दिष्टांसह सुसंगत राहतो, जे रिअल-टाइम तपासणी आणि सतत निरीक्षणाद्वारे समर्थित आहे. संशोधनावर आधारित गुंतवणूक प्रक्रिया, जी एक इन-हाउस टीमद्वारे समर्थित आहे, ती मात्रात्मक आणि गुणवत्तात्मक दोन्ही बाबींचा समतोल राखते. पोर्टफोलिओ निर्मितीची रणनीती उद्योग चक्र आणि कंपनीच्या स्थितीचा विचार करून पोजिशन साइझिंगचे मूल्यांकन करते. विविध क्षेत्रांमध्ये आणि थीममध्ये विविधता निर्माण करून, तसेच बाजार कॅपिटलायझेशनसमध्ये लवचिकता राखून, फंड आपली प्रगतिशील आणि चांगल्या प्रकारे व्यवस्थापित गुंतवणूकांच्या तत्त्वज्ञानावर ठाम राहतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी, नवनीत मुनोत म्हणाले की, एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंडचा गेल्या तीन दशकांचा प्रवास आमच्या शिस्तबद्ध गुंतवणूक तत्त्वज्ञानाचा आणि गुंतवणूकदारांच्या संपत्ती निर्मितीबाबतच्या अखंड बांधिलकीचा ठोस पुरावा आहे. फंडाने विविध बाजारचक्रांचा यशस्वीपणे सामना केला असून, प्रत्येक वेळेस अधिक मजबूतपणे पुढे आला आहे.

# अतिनील किरणांपासून करा केसांचे संरक्षण

## मेरिकोतज्ज्ञ डॉ. शिल्पा वोरा यांच्या टिप्स

**नाशिक :** वाढते तापमान आणि कडाक्याच्या उन्हासह त्वचेसोबत केसांची काळजी घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. अतिनील किरणांमुळे (यूव्ही रे) केसांमधील ओलावा कमी होऊ शकतो, ज्यामुळे केस कमकुवत होण्यासोबत निस्तेज होऊ शकतात आणि केस तुटू शकतात. यावर उपाय काय? उन्हाळ्यानुसार विशिष्ट हेअरकेअर पद्धत, जी केसांना आतून पोषण देते आणि प्रभावीपणे केसांचे संरक्षण करते. असे मेरिकोतज्ज्ञ डॉ. शिल्पा वोरा यांनी सांगितले.

अतिनील किरणांमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षणासाठी प्रमुख घटक आहे कोकोनट-बेस्ड हेअर ऑइल, ज्यामध्ये केसांचे आतून संरक्षण करण्याची क्षमता आहे. केस कोरडे व प्रदूषित होण्यापासून संरक्षणासंदर्भात मार्गदर्शन करत मेरिको लिमिटेडच्या चीफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑफिसर डॉ. शिल्पा वोरा म्हणाल्या,




'नियमितपणे केसांना तेल लावणे केसांचे अतिनील किरणांमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचे आहे. शिस्तबद्ध हेअर ऑइलिंग रुटिनमुळे केस आतून मजबूत होण्यास मदत होते, ज्यामुळे प्रतिकूल हवामान व वातावरणामुळे होणाऱ्या नुकसानापासून केसांचे संरक्षण होते. उन्हाळ्यामध्ये केसांच्या प्रत्यक्ष अतिनील किरणांपासून संरक्षण करण्यासाठी स्कार्फचा वापर करा. भरपूर प्रमाणात पाणी पीत हायड्रेटेड राहा, ज्यामुळे केसांना आतून पोषण मिळण्यास मदत होते, तसेच केस स्वस्थ व मजबूत राहतात.'

# स्कोडा ऑटो फोक्सवॅगनतर्फे स्थानिक प्रतिभेला संधी

**मुंबई :** स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया प्रायव्हेट लि.ने देशातील उच्च व्यवस्थापनात बदल करताना स्थानिक प्रतिभेवर भर देत आशिष गुप्ता यांची स्कोडा इंडियाचे ब्रँड डायरेक्टर म्हणून नेमणूक केली आहे. आशिष गुप्ता यापूर्वी फोक्सवॅगन पॅसेंजर कार्सचे ब्रँड डायरेक्टर होते. त्यांनी पेट्र जनेबा यांच्याकडून कार्यभार स्वीकारला आहे. तर नितीन कोहली यांची फोक्सवॅगन पॅसेंजर कार्सचे ब्रँड डायरेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते यापूर्वी ऑडी इंडियाच्या सेल्स आणि ऑपरेशन विभागात कार्यरत होते. हे नेतृत्व बदल देशातील प्रतिभा पारखून ती जोपासण्याबाबतची तसेच भारतीय बाजारातील बदल अचूक ओळखण्याच्या नेत्यांना सक्षम बनवण्याची कंपनीची वचनबद्धता स्पष्ट करतात.

आशिष गुप्ता यांच्या पाठीशी दोनपेक्षा जास्त दशकांचा ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील अनुभव आहे. त्यापैकी १२ वर्षांपेक्षा जास्त काळ त्यांनी फोक्सवॅगनमध्ये विविध पदांवर काम केले आहे. ५ वर्षे भारतातील फोक्सवॅगन ब्रँडच्या प्रमुखपदी देखील काम केले आहे. आपल्या या नवीन भूमिकेत आशिष स्कोडाच्या विकास धोरणाला चालना देण्यावर, नेटवर्कची ताकद विस्तारित करण्यावर आणि भारतातील या ब्रँडची उपस्थिती अधिक प्रखर आणि प्रभावी करण्यावर लक्ष केंद्रित करताना दिसतील. नितीन कोहली यांना ऑटोमोटिव्ह सेल्समध्ये २५ पेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे. त्यापैकी १२ पेक्षा जास्त वर्षे त्यांनी स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडियासोबत काम केले आहे. व्यवसाय विकास, धोरणात्मक आखणी आणि क्रॉस फंक्शनल कोलॅबरेशनसमध्ये विशेष नैपुण्यासह नितीन कोहली फोक्सवॅगन ब्रँडला भारतात नवीन उंचीवर घेऊन जाण्यास सज्ज आहे.

मॅनेजिंग डायरेक्टर पीयूष अरोरा म्हणाले, नेतृत्वातील हे परिवर्तन संघटनेच्या अंतर्गत लोकलाइझेशन आणि क्षमतांच्या विकासाच्या बाबतीत आमची निरंतर वचनबद्धता दर्शवितो.

# ॲमेझॉन इंडिया ग्रेट समर सेल सुरू

**नाशिक :** ॲमेझॉन इंडियाने ग्रेट समर सेलसाठी धमाकेदार ऑफर्स जाहीर केल्या आहेत. सॅमसंग एआयच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या बहुप्रतीक्षित सेलमध्ये ग्राहकांसाठी आघाडीच्या ब्रँड्सवरील आकर्षक सवलती उपलब्ध असतील. ग्राहकांना सॅमसंग एआय आणि इंटेलकडून प्रीमियम टेक्नॉलॉजीवर जबरदस्त ऑफर्स मिळतील, तसेच सॅमसंग अप्लायन्सेस आणि टीव्ही, टीसीएल आणि हायसेन्सकडून आधुनिक होम एंटरटेन्मेंट सोल्यूशन्स उत्पादनेही आकर्षक दरात खरेदी करता येणार आहेत. याशिवाय टाटा उत्पादने, मसल ब्लेझ, व्होलीनी, एचयूएल, केलॉग्स आणि बोट यांसारख्या लोकप्रिय ब्रँड्सवरही भरघोस सवलती मिळणार आहेत.

खरेदी, तिकीट बुकिंग किंवा बिल पेमेंट करताना ५,००० पर्यंतचे बंपर रिवॉर्ड्स अनलॉक करा! ग्रेट समर सेलदरम्यान ग्राहकांना ॲमेझॉन पे वापरताना त्यांच्या पहिल्या, पाचव्या आणि दहाव्या व्यवहारावर खास ऑफर्स




मिळणार आहेत. प्राइम मेंबर्स जर ॲमेझॉन पे आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्ड वापरत असतील तर त्यांना मिळेल अमर्यादित ५% कॅशबॅक आणि २,५०० चे वेलकम रिवॉर्ड्ससुद्धा. या सेलमध्ये ग्राहकांना मिळेल फ्लाइट बुकिंगवर २०% पर्यंत बचत आणि हॉटेल्स व होमस्टे बुकिंगवर ३५% पर्यंत खास सूट मिळणार आहे. पात्र ग्राहकांना Amazon Pay Later द्वारे ६०,००० पर्यंत त्वरित क्रेडिट मिळू शकते आणि ते ६०० पर्यंत रिवॉर्ड्सदेखील कमवता येतील. तसेच, ॲमेझॉन पे वॉलेटमध्ये १,००० टाकल्यावर १०० पर्यंत कॅशबॅक मिळवण्याचीही संधी आहे.

# 'अभिजात मराठी' ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा; उदय सामंत यांच्या हस्ते लोगो लॉन्च!

## मराठी मनोरंजनासाठी आणि भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय सुरू!

**मुंबई : महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना दि. ३ ऑक्टोबर २०२४ यश मिळाल्यामुळे मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून १ मे रोजी मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला. या कार्यक्रमात मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत 'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो अनावरण आणि घोषणा करण्यात आली.**

एआय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही आपली मायबोली अभिमानाने उभी राहावी - यासाठी सुमन एंटरटेन्मेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे. जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले, मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे. मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार - हेच आमचं ब्रीदवाक्य आहे.

आज मोबाइल हातात आल्यावर आपण दररोज १-२ चित्रपट हेडफोन लावून पाहतो. जर 'अभिजात मराठी'सारखा मराठीचा स्वतंत्र ओटीटी प्लॅटफॉर्म प्रत्येकाच्या हातात असेल तर त्यातून मराठी भाषेचं संवर्धन, प्रचार आणि उत्तम साहित्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू शकतं. म्हणूनच



हे व्यासपीठ अत्यावश्यक आणि अत्यंत काळानुरूप आहे.

'अभिजात मराठी' हे ओटीटी व्यासपीठ पूर्णपणे मोफत स्वरूपात प्रेक्षकांसाठी उपलब्ध असणार आहे. यावर दर्जेदार मराठी चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपटांचा समृद्ध संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळेल. याव्यतिरिक्त, इतर भारतीय भाषांतील निवडक चित्रपट मराठीत डब करून सादर करण्यात येणार आहेत, जेणेकरून भाषेची अडचण न वाटता सर्वांना दर्जेदार आशयाचा आनंद घेता येईल. तसेच, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आशयासोबत मराठी सबटायटल्स देण्यात येणार आहेत, ज्यामुळे जागतिक कंटेंटही मायबोलीत अनुभवता येणार आहे.

केदार जोशी ह्यांनी सांगितले 'अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, तो आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ आहे. ही भाषा जगायची आहे, टिकवायची आहे - म्हणून हे व्यासपीठ आम्ही निर्माण करतोय! 'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार असून, तो १,००० निवडक प्रेक्षकांसाठी खास प्रिव्ह्यू स्वरूपात असेल. त्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये मराठी भाषा आठवड्याच्या निमित्ताने या प्लॅटफॉर्मचा अधिकृत भव्य लॉन्च करण्यात येणार आहे. हा टप्पा मराठी प्रेक्षकांसाठी आणि संपूर्ण इंडस्ट्रीसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरेल.

सर्व प्रकारच्या मराठी कंटेंटसाठी खुले आवाहन : 'अभिजात मराठी' या व्यासपीठावर प्रसारित होण्यासाठी आपल्या दर्जेदार मराठी कलाकृतींचं स्वागत करण्यात येत आहे. हे व्यासपीठ प्रामुख्याने चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपट यांसारख्या विविध प्रकारच्या कंटेंटसाठी खुले असून, नवोदित आणि अनुभवी निर्मात्यांना एक नवी संधी देण्यासाठी तयार आहे.

गांवकरी
नाशिक, बुधवार,
दि. ७ मे २०२५

# प्रतिमा



सई ताम्हणकरचा एक मराठी चित्रपट, ज्यात ती एका मानसिक आजारातून जाताना दाखवली आहे. एका कार अपघातात ती तिची स्मृती हरवून आपल्या बालपणात जाऊन बसते. तिला शिकवणारे शशी देवधर सर हे कलाशिक्षक असतात आणि तिला ते आवडत असतात. स्पेशल कोचिंगसाठी ती त्यांच्या घरी जाते, तेव्हा तिला समजते की, त्यांचे लग्न झालेले आहे. निरागस वय असते ते. त्या वयात झालेले प्रेमही निरागस. फक्त त्याला या समाजाच्या नियमांची जाण नसते. ना स्वार्थ, ना ईर्षा...



## सौ. शशी देवधर

ज्योत्स्ना डगळे
कौन्सिलर, नाशिक

कुटुंबाप्रति समर्पित असलेले शशी सर यांना बघून तिला अधिकच आनंद होतो. त्यांच्या पत्नीचे व्यक्तिमत्त्व जणू ती जगू पाहते. त्यांची मुलगी... घर हे सर्व जणू तिचेच आहे असे समजू लागते.

कुठेतरी एक आदर्श पती म्हणून ती शशी देवधर सरांची निवड करून बसते मनाच्या चोर कप्प्यात. पुढे तिचे लग्न जिथे होते तिथे तिचा प्रचंड मानसिक आणि शारीरिक छळ होतो. कदाचित त्या-त्या वेळी तिला पती म्हणून तेच शशी देवधर सर आणि त्यांचे कुटुंब आठवत असते. देवधर कुटुंबाचा तिच्या मनावर एक पगडा बसलेला असतो. मनाच्या चोर कप्प्यात.आणि जेव्हा अपघात होतो तेव्हा ती स्वत:ची स्मृती विसरते आणि स्वत:ला सौ. शशी देवधर सांगू लागते.

खरंतर त्या सई ताम्हणकरच्या मनावर म्हणजेच शुभदाच्या मनावर ती प्रतिमा किती बिंबलेली असते की, ती आयुष्यभर विसरू शकत नाही. काही प्रमाणात आपल्यातही अशा व्यक्ती असतात, जी त्यांची काही स्वप्ने बघत असतात तेव्हा ती स्वप्ने त्यांच्या मनावर एक पगडा ठेवून जातात. मग ती स्वप्नातले घर असो की करिअर असो, पती-पत्नी असो वा प्रियकर असो.

आयुष्यात पहिल्यांदा पाहिलेले ते स्वप्न असतं, जे उघड्या डोळ्यांनी बघितले जाते. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील पहिले प्रेम असो, मग त्या प्रियकर वा प्रेयसीची प्रतिमा कायम आयुष्यभर पगडा ठेवून जाते. ते क्षण ते आयुष्य जगण्यासाठी ती व्यक्ती कायम आसुसलेली असते. कल्पनेच्या दुनियेत तो चोरकप्पा उघडून ते आयुष्य ती व्यक्ती कितीतरी वेळा जगलेली असते. मग एखाद्याला डॉक्टर, अधिकारी व्हायचे स्वप्न असू दे, जे अपूर्ण राहिलेले असते. पण ती व्यक्ती त्या स्वप्नाच्या दुनियेत कित्येकदा जगलेली असते.

माणसाच्या आयुष्यात आलेली पहिली व्यक्ती, घटना, प्रसंग तो कधीच विसरू शकत नाही. व्यक्तीनुरूप त्या गोष्टीचा किती पगडा आहे यावर हे त्या गोष्टी अवलंबून असतात.

एखाद्या मुलीच्या आयुष्यात एखादी व्यक्ती आदर्श पती म्हणून ती मानून बसते जशी सौ. शशी देवधरमधील शुभदा...

ती मुलगी भले तिचे लग्न त्या व्यक्तीसोबत जरी नाही झाले तरी त्या मुलीच्या मनात पती म्हणून कायम शशी देवधरच राहिले. इथे ती स्मृती विसरते म्हणून हे लक्षात येते, परंतु प्रत्येक व्यक्तीच्या मनात अशी कोणती तरी एक प्रतिमा कायम जिवंत असते, जी नेहमी कल्पनेच्या जगात जगतही असते. अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यातीलच एक हे सौ. शशी देवधर.

काही जण विसरून जातात, तर काही जण एका भोळ्या आशेवर असतात की, ती व्यक्ती आपल्या आयुष्यात कधीतरी येईल. अशी माणसे त्यांचे दैनंदिन आयुष्य जगत असतात खरे. पण खऱ्या अर्थाने ते तिथेच थांबलेले असतात जिथे ते चोरकप्पा भरून बसलेले असतात. एखादी मुलगी तिचे बालपण कधी जगू शकलेली नसते. लहानपणी तिला कष्ट करावे लागत असतात त्यावेळी तिने पाहिलेली काही लहान मुले जी बागडत असतात, खेळत असतात, ती बालपणाची प्रतिमा ती मुलगी कायम शोधत असते. आयुष्यात जेव्हाही तिला ते प्रसंग जगण्याची संधी मिळते, तेव्हा ती मुलगी भले तिचे आताचे वय काय आहे ते विसरून क्षणात लहान होत असते.

असेच प्रत्येक जण या मनाच्या चोरकप्प्यात जगत असतो. मग ती सर्वच स्वप्ने पूर्ण होणार नसतील, परंतु निदान त्या स्वप्नांशी समरूप काहीतरी प्रत्येकाला मिळायला हवे. निदान आयुष्यात ही स्वप्ने जेव्हाही जगता येतील तेव्हा ती मनसोक्त जगावीत. अगदी वय विसरून लहानही होता आले पाहिजे.

माणसाने जे काही स्वप्न उराशी बाळगलेले असते आणि ते आयुष्यभर जपलेले असते ते पूर्ण करण्याची परमेश्वर प्रत्येकाला संधी देत असतो. फक्त ती संधी मिळते तेव्हा ते जगता आले पाहिजे अगदी वय विसरून. तो मनाचा चोरकप्पा कधीतरी उघडता आला पाहिजे. बघा जमतंय का?

# स्वत:ला सापडणं...

आपल्या आयुष्यात जेव्हा एखादा निर्णय आपण स्वत: घेतो तेव्हा सर्वांत मोठा विरोध अपेक्षित शत्रूकडून नसतो. तो होतो, आपल्याच लोकांकडून. लग्न, करिअर, शहर बदलणं किंवा फक्त आयुष्यात एक वेगळं वळण घेणं... या प्रत्येक निर्णयाला आपल्या सभोवतालच्या लोकांकडून समर्थन मिळेल, ही आपली स्वाभाविक अपेक्षा असते. पण नेमका तिथेच सुरू होतो एक अदृश्य खेळ. तुम्हाला काय वाटतं, जे प्रेमाने हसतात तेच अंतर्मनात तुमच्यावर जलन बाळगतात. हे समजणं इतकं सोपं असतं का?



संदीप चव्हाण

**हा खेळ कुठून सुरू होतो?**

तुम्ही तुमचं आयुष्य स्वतःच्या हिशोबाने घडवू लागलात की, काहींना वाटतं, हे आमच्याशिवाय घडलं. म्हणजे आमचं महत्त्व गेलं. तेव्हा त्यांचं लक्ष तुमच्या आनंदात नाही, तर त्यांच्या अस्तित्वावरचं संकट वाटू लागणारं असतं. मग सुरू होतो एक सुसंस्कृत राजकारणाचा खेळ, ज्यात शब्द सौम्य असतात, पण हेतू विषारी. पुढे काय घडतं? एकेकाळचे मार्गदर्शक टीकाकार होतात, जे आपल्यासाठी सतत फोन करत होते, ते आता गप्प राहतात. कौतुकाच्या नावाखाली सूचक टोमणे मारतात आणि आपल्यासाठी काळजी आहे या बहाण्याखाली मन पोखरणारी मतं दिली जातात तुम्ही हे करताय? एवढ्या लवकर लग्न? काही विचारलं का कुणाला? तो मुलगा/ती मुलगी आपल्यासारख्या घरची वाटत नाही... माझं म्हणणं नका ऐकू, पण पुढे जाऊन त्रासच होणार... हे सगळं स्पष्ट नाकारता येत नाही. कारण ते नाते नावाच्या कडवट साखरेत लपवलेलं असतं. कोण करतं हे? आणि का? ज्यांचं स्वत:चं आयुष्य न सांगता येण्याजोगं असतं, त्यांना दुसऱ्याचं यश झोंबतं. ज्यांनी कधीच स्वत:चा निर्णय घेतलेला नसतो, त्यांना इतरांचा आत्मविश्वास खटकतो.

काही जणांची ओळखच दुसऱ्यांच्या वादात सहभाग घेण्यात असते. कारण तिथेच त्यांना महत्त्व वाटतं.

ते आपले आहेतच म्हणून त्यांचा कंट्रोल आपल्यावर असावा, हा त्यांचा अलिखित नियम असतो. खरं पाहायला गेलं तर आपण त्यांच्या विरोधात काहीही करत नाही, पण आपलं स्वत:चं काही करत असतो, हेच त्यांच्या अस्वस्थतेला पुरेसं असतं.

त्यांना प्रश्न पडतो, तुम्ही आम्हाला न विचारता निर्णय कसा घेतलात? तुमचं आयुष्य योग्य रुळावर जातंय, पण आमचं अजूनही गोंधळात आहे. हे का? आणि त्यातून बाहेर पडतो एक नवीन चेहरा. अहंकारी आप्तस्वकीयांचा. हे सगळं टाळता येतं का? नाही. पण त्यांचा परिणाम टाळता येतो. कसा? त्यांच्या बोलण्याला महत्त्व न देता. त्यांच्या हेतूला समजून घेऊन दुर्लक्ष करा. बोलणं थांबवणं शक्य नसेल, तर ऐकणं थांबवा.

**तुम्हाला ठरवायचं आहे हे नातं नावाचं आहे की मनाचं?**

शांत राहा, पण दुर्बल नको. प्रेमाने, पण ठामपणे आपल्या सीमारेषा ठेवा आणि सगळ्यात महत्त्वाचं तुमचं नातं बाहेरच्या अपेक्षांचं बळी ठरू देऊ नका. शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही स्वत:साठी उभे राहता, तेव्हा काही नाती पडतात, ती प्रेमाने जोडलेली नव्हती, तर वर्चस्वाने बांधलेली असतात आणि अशा नात्यांचं तुटणं म्हणजे तुमचं हरवणं नाही, तर खऱ्या अर्थाने स्वत:ला सापडणं असतं.

# महिलांसाठी टिप्स

नोकरदार महिलांसाठी घर व ऑफिसची जबाबदारी सांभाळणे एक आव्हान असते. खाली अशा काही सोप्या व उपयोगी पाच टिप्स दिल्या आहेत, ज्या वेळेचे उत्तम नियोजन करण्यात मदत करतील.



**आधीच नियोजन करा**

आठवड्याच्या सुरुवातीलाच मुख्य कामांची यादी तयार करा. याते ऑफिसची मीटिंग, डेडलाइन्स, घरातील गरजेची कामे (खरेदी, स्वयंपाक, मुलांचा अभ्यास इत्यादी) यांचा समावेश करा.

**प्राधान्य ठरवा**

कोणते काम अत्यावश्यक आहे आणि कोणते थोडा वेळ थांबू शकते, हे ठरवा. महत्त्वाची कामे वेळेवर पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करा.

**कुटुंबातील सदस्यांची मदत घ्या**

घरातील जबाबदाऱ्या सर्वांनी मिळून वाटून घेतल्या तर तणाव कमी होतो. जोडीदार, मुले किंवा इतर सदस्यांची मदत घ्या. जसे की, भांडी धुणे, कपडे घालणे, डबे भरणे.

**तंत्रज्ञानाचा वापर करा**

रिमाइंडर ॲप्स, शॉपिंग लिस्ट ॲप्स, कॅलेंडर आदींचा उपयोग करून वेळ व कामे अधिक व्यवस्थित करता येतात.

**स्वत:साठी वेळ द्या**

प्रत्येक दिवशी थोडा वेळ स्वतः साठी द्या. व्यायाम, ध्यान, वाचन किंवा आवडती गोष्ट करा. यामुळे मानसिक ताजेपणा व ऊर्जा टिकून राहते.

# जावे त्याच्या वंशा

आजकाल घरातील एकटेपणा तिच्या अंगावर येई. शैलेश तिचा नवरा आणि अन्वी हॉस्पिटलमध्ये. अभय तिचा मुलगा, ऑफिसला गेलेला. घरी नेहमी असलेल्या सासूबाई घरी नाहीत. ती बैचेन झाली. या घराला अन् तिला सासूबाईंची किती सवय झाली आहे, हे तिला नव्यानेच कळत होते. खूप गृहीत धरलं आपण आईंना. मनातून ती हळहळली. परत एकदा अन्वीचे बोलणे तिला आठवले, मॉम आजीची किती काळजी आहे हे दाखवू नकोस. बरोबरच बोलली ती. तिने कधी मला आईंची काळजी घेताना बघितलेच नाही. त्यामुळे आत्ता मला खरंच वाटणारी काळजीही तिला खोटीच वाटत आहे. याला जबाबदार आपणच आहोत, अवंतिकाला वाटले.

अश्विनी बच्चूवार

आठ दिवस झाले होते. अवंतिकाच्या सासूबाई हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होत्या. रूमच्या बाहेर खुर्चीवर बसलेली अवंतिका तिच्या डॉक्टर लेकीची वाट पाहत होती. तिची मुलगी डॉक्टर अन्वी याच हॉस्पिटलमध्ये गायनाकॉलॉजिस्ट होती. आजीला तपासून अन्वी रूमच्या बाहेर आली. आईला बाहेर बसलेले बघताच ती म्हणाली, मॉम, तू गेली नाहीस घरी? तुला म्हटले होते, जा म्हणून. तिच्या त्या रुक्ष आवाजाने गडबडलेली अवंतिका म्हणाली, अगं ते आजी... ॲडमिट...

ओ कम ऑन मॉम, आता असे म्हणू नकोस की, तुला आजीची खूप काळजी वाटत आहे म्हणून तू थांबली आहेस. ॲंड फॉर युवर काइंड इन्फॉर्मेशन, इकडे तिची काळजी घ्यायला खूप लोकं आहेत. सो, तू गेलीस तरी चालेल. इतके बोलून अन्वी तेथून निघाली.

वेगाने तिकडून निघालेल्या अन्वीच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत अवंतिकाने आपली पर्स उचलली एकवार रूमचे दार उघडून सलाईन लावलेल्या आपल्या सासूबाईंकडे पाहिले आणि ती घरी निघाली. अन्वीचे शब्द तिच्या मनातून काही जात नव्हते. घरी आल्यावर कसेबसे दोन घास तिने पोटात ढकलले. आजकाल हा घरातील एकटेपणा तिच्या अंगावर येई. शैलेश तिचा नवरा आणि अन्वी हॉस्पिटलमध्ये. अभय तिचा मुलगा, ऑफिसला गेलेला. घरी नेहमी असलेल्या सासूबाई घरी नाहीत. ती बैचेन झाली. या घराला अन् तिला सासूबाईंची किती सवय झाली आहे, हे तिला नव्यानेच कळत होते. खूप गृहीत धरलं आपण आईंना. मनातून ती हळहळली. परत एकदा अन्वीचे बोलणे तिला आठवले, मॉम आजीची किती काळजी आहे हे दाखवू नकोस. बरोबरच बोलली ती. तिने कधी मला आईंची काळजी घेताना बघितलेच नाही. त्यामुळे आत्ता मला खरंच वाटणारी काळजीही तिला खोटीच वाटत आहे. याला जबाबदार आपणच आहोत, अवांतिकला वाटले.



लहानपणापासून मुलांना आजीनेच सांभाळले आणि आपण... आपण मात्र ऑफिस, काम या सबबीवर मजाच करत राहिलो. मुलांना खुशाल आईंवर सोपवून आपण मस्त शॉपिंग, पार्ट्या, गेटटुगेदर, पिकनिक यातच दंग राहिलो. अवंतिकाला वाईट वाटले. मुलांना केवळ जन्म दिला म्हणून त्यांची बायोलॉजिकल आई मी. पण आईची सगळी कर्तव्ये तर आजीनेच पार पाडली. अन्वी आणि अभयच्या जन्मानंतर कसेबसे सहा महिने घरात काढले. आपण नंतर मात्र कामाचा बहाणा करून जास्तीत जास्त घराबाहेर राहू लागलो. मैत्रिणींसोबत पिक्चरला जाणे, हॉटेलिंग, किटी पार्टी यातच आपला वेळ जाऊ लागला. पहिले पहिले शैलेश आणि आई दोघेही म्हणाले, मुलांसाठी वेळ काढ, त्यांना तुझा लळा लागणार नाही, तुझी ओढ वाटणार नाही, पण आपण ऐकलेच नाही. शेवटी आपण ऐकतच नाही म्हटल्यावर दोघांनीही आपल्याला सांगणे सोडून दिले. मुलांना भरवणे, त्यांची आजारपणे काढणे, त्यांचा जमेल तसा अभ्यास घेणे, त्यांना वेळेत शाळेत पाठवणे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणे हे सगळे आईंनीच केले. इतकेच काय, मुलांच्या शाळेत पेरेंट्स मीटिंगलासुद्धा बऱ्याचदा आईच जात. यात आपण कुठेच नव्हतो. अवंतिकाला लाज वाटली. मुलांनाही आपल्यापेक्षा आजीचाच लळा जास्त. आपल्यापेक्षा जास्त ते मनमोकळेपणाने आजीजवळ बोलतात. आपण दुरावलोच.

अन्वी डॉक्टर झाल्यावर तिच्या पहिल्या पगारातून तिने आपल्यासाठी काही न आणता आजीसाठी साडी आणली होती. किती चिडलो होतो आपण. खरंतर आपण कधीच आईंविषयी कृतज्ञता दाखवली नाही, त्या आपल्या मुलांना सांभाळत आहेत म्हणून आपण नोकरी करू शकत आहोत हेदेखील कधी वाटले नाही. साधी साडी कधी घेतली नाही, की प्रेमाचे दोन शब्द कधी बोललो नाही. आपल्याकडून नाही, पण नातवंडांकडून मात्र प्रेमाची पोचपावती त्यांना नेहमीच मिळाली. अन्वी आणि अभय आजीवर अगदी भरभरून प्रेम करतात. तिची काळजी घेतात.

आत्ता महिन्यापूर्वी अभय पूर्वाला घेऊन घरी आला होता. त्यांचे म्हणे प्रेम होते एकमेकांवर. लग्न करायचे होते त्यांना. पण पूर्वा स्पष्टपणे म्हणाली, खरंतर मला आत्ताच लग्न करायचे नाही, अगोदर करिअर करायचे आहे मला, एकदा लग्न झाले की मुलं आली, मग त्यांना वाढवणे आले, त्यांची आजारपणं काढणे आले यातच वेळ जातो नि करिअर राहतं. मग त्यावर हसून अभय म्हणाला, अगं मुलांची चिंता सोड तू, माझी मॉम आहे की. आम्हाला जसं आमच्या आजीने लहानाचे मोठे केले, तसेच आपल्या मुलांना माझी मॉम बघेल. किती मोठ्याने दचकलो होतो आपण हे ऐकून. मी सांभाळणार? अवंतिकाच्या पोटात गोळा आला. क्षणात तिच्यासमोर सासूबाईंनी मुलांसाठी किती नि काय काय केले ते आले. मला अनुभव नाही काहीच. माझीच मुलं सासूबाईंनी सांभाळली, मी काय यांची मुलं सांभाळणार? पहिल्यांदाच सासूबाईंसमोर तिला फार खुजे असल्यासारखे वाटले. रात्री रूममध्ये आल्यावर पुस्तक वाचत असलेल्या शैलेशला ती म्हणाली, ती पूर्वा फारच स्ट्रेट फॉरवर्ड वाटली मला, तुला कशी वाटली रे?...

तीस वर्षांपूर्वीची अवंतिका...पुस्तकातून जराही डोके वर न काढता शैलेश म्हणाला. सगळे आठवून अवंतिकाला डोके जड पडल्यासारखे वाटले. उद्या कदाचित सासूबाईंना डिस्चार्ज मिळणार होता. सकाळी लवकर जायचे होते. तिथे तिची गरज कोणाला नसली तरी तिला जायचेच होते. सकाळी घाईनेच ती हॉस्पिटलला पोहोचली. रूममध्ये सगळेच होते. शैलेशसुद्धा दिसत होता. यानेही सकाळी जाताना मला सांगितले नाही. अवंतिकाला याचे वैषम्य वाटले. अन्वी, अभय, हॉस्पिटलचा इतर स्टाफ होता आणि पूर्वासुद्धा आलेली होती. पूर्वा सासूबाईंचा हात हातात घेऊन बोलत होती, आजी अभयने खूप सांगितले तुमच्याबद्दल, तुम्ही किती केलं आहे त्यांच्यासाठी. त्याचा खूप जीव आहे हो तुमच्यात. अवंतिकाला तर पूर्वा फारच स्ट्रेट फॉरवर्ड वाटली होती. पण पूर्वाला असे हळवे बोलताना बघून तिला आश्चर्यच वाटले. रूमच्या दाराशी उभ्या असलेल्या अवंतिकाला तिनेच बऱ्याच वर्षांपूर्वी बोललेले वाक्य आठवले, ती सासूबाईंना म्हणाली होती, बाहेर जाऊन मी पैसे कमावते. तुम्ही काय कमावता? याचे उत्तर तिला आज कोणीही न देता समजले होते.


# अंडरआर्मचा काळेपणा कमी कसा करायचा?

## ब्यूटी टिप्स

नेहा खरे, कॉस्मेटोलॉजिस्ट

कपड्यांशी किंवा शेव्हिंगमुळे वारंवार घासल्याने त्वचा जाडसर होते आणि काळसर दिसते.

**शेव्हिंग :** वारंवार ब्लेडने केस काढल्याने त्वचेला सूज येते आणि काळसरपणा वाढतो. डिओड्रंट्स किंवा परफ्यूम्समधील केमिकल्स, काही डिओड्रंट्समध्ये असलेले अल्कोहोल किंवा हार्श केमिकल्स त्वचेला काळं करतात.



**हॉर्मोनल बदल :** पीसीओडी, थायरॉइड समस्या किंवा इन्सुलिन रेझिस्टन्समुळे त्वचेत काळसरपणा येतो.

**ओबेसिटी (लठ्ठपणा) :** वजन जास्त असल्यास घाम जास्त येतो आणि त्वचेचा विकार होऊ शकतो.

**जास्त घाम येणे आणि स्वच्छतेचा अभाव :** घाम आणि बॅक्टेरिया जमा होऊन त्वचा काळसर दिसते.

**आनुवंशिक कारणे :** कधीकधी कौटुंबिक कारणांमुळेसुद्धा अंडरआर्म काळसर होऊ शकते.

**काही औषधे :** काही ॲंटिबायोटिक्स किंवा हार्मोनल औषधांचा त्वचेवर दुष्परिणाम होतो.

**अंडरआर्मचा काळसरपणा वाढू नये म्हणून काय करू नये :** दररोज ब्लेड वापरून शेव्हिंग करू नका. हार्श केमिकलयुक्त डिओड्रंट्स वापरू नका. घट्ट कपडे घालू नका. काळजी न घेता केस काढणे टाळा. त्वचा कोरडी ठेवू नका. हार्श स्क्रब किंवा स्किन पील्स सतत करू नका. सुगंधी पावडर किंवा टॅलक सतत वापरू नका. त्वचा काळसर झाली तरी दुर्लक्ष करू नका.

**काळसरपणा कमी करण्यासाठी घरगुती उपाय**

लिंबू + मध - लिंबाचा रस व मध लावून ५-७ मिनिटांनी धुवा. बेसन + दही + हळद- पेस्ट बनवून १५ मिनिटे लावा. बटाट्याचा रस रोज लावा व १० मिनिटांनी धुवा. ॲलोविरा जेल- दररोज रात्री लावा. चंदन + गुलाबपाणी - पेस्ट अंडरआर्म काळसरपणा कमी करण्यासाठी लावावी. त्वचेच्या प्रकारानुसार उपचार निवडा.

# किचन टिप्स

## कैरीचे पन्हे

उन्हाळ्यात थंडावा देण्यासाठी, तसेच पचनशक्ती वाढविण्यासाठी कैरीचे पन्हे उपयोगी ठरते.

**साहित्य :** ५०० ग्रॅम कैऱ्या, साखर, एक चमचा मीठ.

**कृती :** कैरीची साले काढून त्या अख्ख्या किंवा फोडी करून स्टीलच्या भांड्यातून कुकरमध्ये उकडून घ्याव्यात. थंड झाल्यावर कैरीचा गर व साखर मिक्सरमधून अथवा पुरणयंत्रामधून काढावा. जेवढा गर असेल त्याच्या अडीचपट साखर घातली तर ते व्यवस्थित गोड होते. हे मिश्रण फ्रिजमध्ये ठेवल्यास बरेच दिवस टिकते. पन्हे करताना थोड्या गरात थंड पाणी व किंचित मीठ घालावे आणि प्यायला द्यावे. त्याची चव छान लागते.



## कलिंगडाच्या सालीचे सूप

कलिंगडाची साल अत्यंत गुणकारी, औषधी असते. या सालींचे सूप तर छानच. पांढऱ्या सालीच्या फोडी करा. एका पॅनमध्ये कलिंगडाच्या पांढऱ्या सालीच्या फोडी, चिरलेला एक कांदा, चार मिरे, लवंग, दालचिनी, लसूण हे सगळं पाण्यात शिजवा. त्यात आलंपण टाका. नंतर सगळ्या फोडी मिक्सरमधून पाहिजे तितकं पाणी घालून काढा. त्यात चवीनुसार मीठ, मिरपूड, किंचित साखर घालून सुपाला उकळी आली की, तूप-जिऱ्याची फोडणी करा. कोथिंबीर घालून थोडं अमूल बटर किंवा घरचे तूप घालून सूप सर्व्ह करा.



- आदिती

## पीयूष

दही घालून केलेले गोड पीयूष हे उष्णता घालविण्यासाठी उन्हाळ्यातील अत्यंत उपयुक्त असे पेय आहे.

**साहित्य :** ४ वाट्या गोड ताजे दही, १०० ग्रॅम साखर, किंचित लिंबाचा रस, जायफळ पूड, केशर.



**कृती :** प्रथम दही साखरेसह मिक्सरमधून घुसळून घ्यावे. त्यात किंचित लिंबाचा रस, जायफळ पूड व केशर घालून चांगले घुसळून घ्यावे. हे पीयूष चौघांना पुरेल. ते सर्व्ह करताना त्यात बर्फाचा खडा टाका.

## लस्सी

दही व गुलाबपाणी असलेली गोड लस्सी उन्हाळ्यासाठी अत्यंत उपयुक्त असे थंडपेय आहे.

**साहित्य :** ४ वाट्या गोड दही, १०० ग्रॅम साखर, गुलाबपाणी, मलई.

**कृती :** दह्यात थोडे पाणी घालून जाडसर घुसळून घ्यावे. साखर व दोन टी-स्पून गुलाबपाणी घालून पुन्हा एकदा ते घुसळून घ्यावे व चार ग्लासमध्ये सर्व्ह करावे. सर्व्ह करताना वरून मलई घालण्यास विसरू नका.

